NUTA BULLETIN
OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION
Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001
YEAR : 36 ) 15th August 2011 ( No : 06

# मी संभाजी जाधव, कोल्हापूरहून बोलतोय !

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या स्थापनेपासून अखंडपणे या महासंघाच्या नेतृत्व मंडळाचा अविभाज्य भाग असलेले प्रा. संभाजीराव जाधव यांनी बुधवार, दिनांक १५ जून २०११ रोजी आपली इहलोकीची यात्रा संपविल्यामुळे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या नेतृत्व मंडळाच्या साखळीतील एक महत्वपूर्ण व अत्त्युत्तम कडी निखळून पडली आहे. त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा परिचय करुन देणारा हा लेख

**- प्रा. बी.टी.देशमुख**

"बी.टी! मी संभाजी जाधव, कोल्हापूरहून बोलतोय." अशा वाक्याने टेलिफोनवरील संभाषणाला सुरुवात झाली की समजावे महाराष्ट्रातील प्राध्यापकांच्या व्यावसायिक जीवनामध्ये काही तरी नवी 'झंझट' उभी झालेली आहे. निर्माण झालेल्या या समस्येचे स्वरुप काय आहे? त्यावर काय उपाययोजना केली पाहिजे? उपाययोजनेच्या ठरावाच्या मसुद्यात कोणकोणते मुद्दे असले पाहिजेत, शब्दरचना कशी असली पाहिजे, मसुदा कोण तयार करणार? महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाची बैठक कोणत्या तारखेला बोलाविण्याची विनंती केली पाहिजे? बैठकीच्या अगोदर मसुदा ठरावाच्या प्रति कोण काढणार? तुम्ही कोणा कोणाशी बोलता? मी कोणाकोणाशी बोलू? याचे सारे तपशील फोनवरील या पुढील संभाषणात असत. महासंघाच्या नेतृत्व मंडळातील ५-७ लोकांचे अशा रितीने टेलिफोनवर आपआपसात बोलणे झाले की मसुदा तयार होत असे. नेतृत्व मंडळात समाविष्ट असलेल्या ५-७ लोकांचे उपाययोजनेबाबतचे निदान एवढे बिनचुक असायचे की हा मसुदा महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत काहीवेळा काही दुरुस्त्यांसह, तर अनेकदा एकही दुरुस्ती न होता मान्य केला जात असे. गेली ३०-३५ वर्षे हा क्रम अव्याहतपणे सुरु आहे. **महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या स्थापनेपासून अखंडपणे या महासंघाच्या नेतृत्व मंडळाचा अविभाज्य भाग असलेले प्रा. संभाजीराव जाधव यांनी बुधवार, दिनांक १५ जून २०११ रोजी आपली इहलोकीची यात्रा संपविल्यामुळे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या नेतृत्व मंडळाच्या साखळीतील एक महत्वपूर्ण व अत्त्युत्तम कडी निखळून पडली आहे.**

**२.** सेवानिवृत्त झाल्यावर ५-७ वर्षांनी सन २००५ च्या मे, जून महिन्यामध्ये 'सुटा'त काम करणाऱ्या सर्वस्तरावरच्या नेत्यांच्या व कार्यकर्त्यांच्या बैठकीसाठी संभाजीरावांनी दोन टिपणे तयार केली होती. 'सुटा', महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ (MFUCTO) व अखिल भारतीय प्राध्यापक (AIFUCTO) महासंघाच्या या कामामध्ये संभाजीरावांनी गेली ३०-४० वर्षे किती जीव ओतला होता व व्यावसायिक जीवनाबरोबरच संघटनात्मक जीवनाशी ते किती एकजीव झालेले होते, याचा प्रत्यय या टिपणांवरुन येतो.

**३.** ही दोन टिपणे संगणकावर टंकमुद्रित केली असून त्याच्या छायाप्रति काढून त्यावेळी त्या वितरित करण्यात आलेल्या होत्या, असे दिसुन येते. पहिल्या टिपणावर "**दिनांक ०१.०५.२००५ 'सुटा' बैठक कोल्हापूर : टीपण : कामकाज आढावा व कार्यपद्धत**" असा मथळामजकूर असून दुसऱ्या टिपणाच्या शिर्षस्थानी "**प्रा.संभाजीराव जाधव यांनी पदाधिकाऱ्यांसाठी तयार केलेले टिपण : 'सुटा' बैठक कोल्हापूर १२ जून २००५ : तिसरे टीपण : नेतृत्व पात्रता**" असा मजकूर आहे. सन २००५ मध्ये केंव्हातरी या टिपणाच्या प्रति त्यांनी मला दिल्याचे आठवते. शिर्षस्थ मजकूरावरुन अशी तीन टिपणे असावीत असे वाटते पण माझ्या दप्तरी उपरोक्त दोनच टिपणे उपलब्ध आहेत. गेल्या ८-१५ दिवसामध्ये 'सुटा' मधील सहकाऱ्यांशी चर्चा करुन या दोनशिवाय तिसरे काही टिपण तयार झाले होते काय? याची माहिती घेतली असता असे तिसरे टिपण मिळू शकले नाही.

**४.** संघटनेत काम करणाऱ्या सर्व स्तरावरच्या नेत्यांना, कार्यकर्त्यांना व सभासदांना अतिशय उपयुक्त ठरणाऱ्या विचारांचा अमोल व जीवंत साठा या टिपणातून उपलब्ध असल्याने हे अमुल्य धन प्रकाशित व्हावे असे वाटल्यावरुन ही दोनही टिपणे आज **सहपत्र एक व सहपत्र दोन** म्हणून सोबत प्रकाशित केलेली आहेत. मुळ मजकूर जसाच्या तसा प्रकाशित केला असून संदर्भ सुलभतेसाठी परिच्छेद क्रमांक हे मुद्दाम दिलेले आहेत. सहपत्र एकचे काळजीपूर्वक अवलोकन केल्यास त्यांनी मांडलेला "**सतत सार्वजनिक हिताची दृष्टी ठेवल्यास, पदे केवळ कामांसाठी आहेत, हे आपोआप कळते, पदांचे ग्लॅमर वाटण्याऐवजी कामाचे ग्लॅमर वाटू लागले पाहिजे.**" *(सहपत्र १ परिच्छेद ३)* हा विचार विद्यापीठातून काम करणाऱ्या सर्व शिक्षकांना मार्गदर्शक ठरणारा आहे. संघटनांमध्ये काम करणाऱ्या नेत्याने "**स्वतःच्या महाविद्यालयात संघटनेचे प्रथम काम केले पाहिजे. मग बाहेरील महाविद्यालयातील प्राध्यापकांकडे तसे काम करावे, हे उचित होय.**" *(सहपत्र १ परिच्छेद ४)* एवढे सांगून संभाजीराव थांबत नाहीत तर पुढे "**घरातील ताणतणाव अगोदर संपुष्टात आणल्यानंतरच बाहेरचे ताणतणाव कमी करणे योग्य होईल, न्यायाला धरून होईल. पण संघटनेतील आणि विद्यापीठातील पदे धारण करणारे हळूहळू आपल्या मूळ महाविद्यालयातील प्राध्यापकांपासून दूर गेलेले दिसतात,**" *(सहपत्र १ परिच्छेद ४)* असे निरिक्षण त्यांनी नोंदविले आहे. कोणत्याही बैठकीच्या कामकाजपत्रिकेचा अभ्यास करुन जाण्याच्या गुणाविषयी त्यांनी "**विद्यापीठातील कामकाजांचा अथवा संघटनेच्या बैठकांतील कामकाजांचा अजेंडा पुरेसा वाचून, अभ्यासून, संदर्भ पाहून, इतरांशी चर्चा करुन, आपण किती मांडतो, आणि कॉमन सेन्सवरती किती अवलंबून असतो, हे त्या संदर्भात पाहाण्यासारखे आहे. पूर्व तयारीवर, आपण प्राध्यापक असूनही, आपला पुरेसा विश्वास नसतो,**" *(सहपत्र १ परिच्छेद ६)* असे निरिक्षण नोंदविले असून पूर्णपणे अभ्यास करून येण्याच्या गुणामुळे आपण कसे लाभान्वित होतो हे त्यांनी पुढील शब्दात विदित केले आहे. "पूर्ण अभ्यास करून आपली बाजू मांडली, तर ऐकणाऱ्या समोरच्या माणसास - मग तो कुलपती, कुलगुरू, मंत्री, सचिव वा संचालक असो - वाटू लागते की, **बोलणाऱ्या व्यक्तीने आपल्यापेक्षा जादा विचार केलेला आहे आणि त्याचे म्हणणे मान्य करणे भाग आहे. एवढी आपली सर्व बाजूंनी तयारी (इक्विपमेंट) व्हावयास हवी आहे. तरच, प्राध्यापक संघटनेचे प्रश्न सुटतील आणि त्यांच्या संघटनेचे कार्य उठावदारपणे दिसू लागेल. अशा अभ्यासाला अन्य कसलाही पर्याय नाही, हे सतत ध्यानात ठेवले पाहिजे.**" *(सहपत्र १ परिच्छेद ९)* दबावाच्या अभावात काम करण्याच्या गुणाविषयी ते लिहितात "**उच्च पदस्थांच्यामुळे आपल्या मतांवर विपरित परिणाम होऊ देऊ नये. शासन, प्रशासन, तसेच विद्यापीठ प्रशासन, तेथील अधिकारी यांचे प्रेशर, त्याप्रमाणेच तेथील कामगार - कर्मचारी संघटना पदाधिकारी, संस्थाचालक, प्राचार्य यापैकी कोणाचेही प्रेशर आपली बाजू मांडतांना आपल्यावर राहू देऊ नये. निःशंकपणे विषयाच्या गुणावगुणांवरून आपली बाजू आपण शंभर टक्के वस्तुनिष्ठ पद्धतीने, मला काय अडचणी येतील, कोणाचा काय ग्रह होईल, ह्या बाबी पूर्णतः गौण मानून, मांडली पाहिजे.**" *(सहपत्र १ परिच्छेद ८)*

**५.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने त्यांच्याविषयी आदरभाव व्यक्त करणाऱ्या शोकप्रस्तावात "The young teachers have many lessons to learn from his life and living for the cause of teachers and education." अशी शब्दरचना वापरलेली आहे. या दोन टिपणातील अनुभवसमृद्ध विचार नजरेखालून घालणाऱ्याला ही शब्दरचना केवळ वापरायची म्हणून वापरलेली नाही हे चटकन लक्षात येईल. संघटनेचे काम करणाऱ्या तरुण पदाधिकाऱ्यांनी "**संघटनेच्या कामांसाठी पुरेसा वेळ देणे, ही बाब महत्वाची आहे. निदान, सर्वसामान्य प्राध्यापकांचा विश्वास असेपर्यंत तरी संघटनेत काम करणे, खरोखरच आनंददायक आहे, त्यासाठी वेळेची मर्यादा असता कामा नये.**" *(सहपत्र २ परिच्छेद १७)* हा त्यांचा विचार मनाशी

बाळगला पाहिजे. सहपत्र दोनवरील टिपणामध्ये त्यांनी पुढे असेही नमूद केले आहे की, **"शिकविण्याचे काम संपल्यावर, संघटनेत काम करण्यास भरपूर वेळ मोकळा मिळतो. जो खरोखरच संशोधन करीत असेल, नियमित लेखन करीत असेल अथवा सामाजिक, सांस्कृतिक कार्य करीत असेल, तर त्याने संघटनेत काम नाही केले तरी चालेल.** पण इतरांना जर आपल्या जीवनास काही दिशा द्यावयाची असेल, वेळेचा सदुपयोग करावयाचा असेल, काही स्नेही मंडळी जोडावयाची असतील, काही आत्मिक समाधान मिळवायचे असेल, इतकेच काय पण आरोग्य नीट ठेवायचे असेल, तर त्यांनी संघटनेत अवश्य सहभाग घ्यावा." *(सहपत्र २ परिच्छेद १७)* सचोटी या गुणाविषयी **"सर्व बैठकांना हजर राहाणे, ही एक सचोटी आहे, पण अशा बैठकांना पूर्ण तयारीनिशी जाणे आणि विषय पत्रिकेवरील विषयांबाबत ऐकणाऱ्यांना काही नवी माहिती व दिशा देणे हीही सचोटीच आहे.** आपण पहिल्या सचोटीस उतरतो, पण दुसऱ्या सचोटीत नापास होतो." *(सहपत्र २ परिच्छेद १३)* असे निरिक्षण त्यांनी नोंदविले आहे व पुढे **"एखाद्यात सचोटी आहे, हे कळावयास काहीसा वेळ लागतो, पण ती नाही, हे कळावयास फार वेळ लागत नाही, ती नाही, ही बाब तात्काळ स्पष्ट होते."** *(सहपत्र २ परिच्छेद १४)* हा कठीण विचार त्यांनी सोप्या भाषेत मांडला आहे. संघटनेच्या नेत्यांने अनुयायांच्या दोन पाऊल पुढे असण्याच्या गुणाविषयी त्यांनी मोलाचा सल्ला पुढील शब्दात दिला आहे. "आपण सर्वजण शारीरिक श्रम करतो पण बौद्धिक श्रम शक्यतो टाळतो. त्यामुळे एखाद्या प्रश्नाचं संपूर्ण दर्शनच, अगदी त्याच्या मुळांपासूनचे दर्शन घेण्यासाठी लागणारे सातत्य, चिकाटी आपण मध्येच सोडतो, प्रश्नाची तड लावण्याच्या भानगडीत पडत नाही, **आपल्या अनुयायांच्या पातळीवरच आपण राहतो. दोन पाऊले पुढे राहत नाही, हे अनुयायांनाही तात्काळ जाणवते आणि ते नेतृत्वाचे पाणी जोखतात, ते किती खोल आहे, हे त्यांना जाणवते, त्यांचाही मग तेवढाच प्रतिसाद मिळतो आणि मग पदाधिकारी अशा अनुयायांना दोष देऊ लागतात. इथे प्रथम कमी कोण पडतो हे पाहणे जरूरीचे आहे."** *(सहपत्र २ परिच्छेद १४)*

**६.** संभाजीराव जाधवांनी सन २००५ मध्ये स्वतः तयार केलेल्या उपरोक्त टिपणामध्ये "नोव्हेंबर २००५ मध्ये 'सुटा' स्थापन होऊन बरोबर तीस वर्षे पूर्ण होतील. या प्राध्यापक संघटनेच्या इतिहासाचे लेखन आता होणे आवश्यक आहे. पुरेसा कालावधी झालेला आहे. त्या काळातील सक्रिय प्राध्यापक एव्हाना सेवानिवृत्त होत आलेले आहेत. काळ जसजसा जाईल. तसतसा हा इतिहास अधिकाधिक पुसट होत जाईल. शिवाय, 'सुटा'ची कागदपत्रेही आता क्रमवार, विषयवार लावून झालेली आहेत. लेखन करण्यास दिर्घकाळ लागणार आहे. काळ व परिस्थिती अधिक प्रतिकुल होण्याअगोदर हे काम सुरु होणे आणि संपणेही आवश्यक आहे, निदान पहिला मसुदा तरी तयार होणे जरुरीचे वाटते." *(सहपत्र २ परिच्छेद १८)* अशी इच्छा व्यक्त केली आहे व पुढे "हे काम संभाजी जाधव यांना करावे लागणार आहे. असे दिसते. तेव्हा, सप्टेंबर, २००५ पासून हे काम करण्यासाठी, त्यांना संघटनेच्या दैनंदिन कामातून मुक्त करावे लागेल. व्यक्तिगत प्रकरणे व समस्या, विद्यापीठ/ शासन पातळीवरील वरिष्ठांच्या भेटी/ बैठका / चर्चा, 'प्राध्यापक विश्व' सल्लामसलत, आणि सुटा संघटनेपर्यंतच्या बैठका / चर्चा या सर्वांतून त्यांना ह्या कामासाठी आता मुक्त होणे जरुरीचे आहे. संभाजी जाधव यांचे सध्याचे काम इतर सर्वांनी सांघिकपणे करण्याचे ठरविले पाहिजे, त्याची योग्य रितीने विभागणी करून घेतली पाहिजे. म्हणजे कोठेही पोकळी जाणवणार नाही, कामही अडून पडणार नाही." *(सहपत्र २ परिच्छेद १८)* असे निरिक्षणहि त्यांनी नोंदविले आहे. सन २००५ नंतरच्या ५ वर्षात त्यांना त्या कामासाठी जो निवांतपणा मिळायला पाहिजे होता तसा तो मिळाला नाही असेच पुढच्या घटनाक्रमावरुन दिसून येते. 'सुटा'च्या इतिहास लेखनाबाबत नंतर काय प्रगती झाली? हे कळू शकले नाही. मात्र त्याच दरम्यान (२००५) महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या स्थापनेच्या सुरुवातीच्या काळातील इतिहास नमूद असलेला २५ परिच्छेदांचा **"महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ (एमफक्टो) प्रारंभ व घडामोडी"** या मथळ्याचा त्यांचा एक लेख **"पुक्टो बुलेटीनच्या 'रौप्यसंचित' या विशेषांकात" प्रकाशित झालेला आहे. त्यांच्या मागे लागून त्यांच्या हातून हे काम पूर्ण करुन घेतल्याबद्दल 'पुक्टो'च्या पदाधिकाऱ्यांना मनापासून धन्यवाद दिले पाहिजेत.** हा लेख अतिशय माहितीपूर्ण असून **सहपत्र तीन** म्हणून आज सोबत जसाच्या तसा (परिच्छेदांचे क्रमांकन एवढा भाग सोडला तर) दिला आहे. तारखा, महिने, वर्ष, घटनांचे संदर्भ, व्यक्तीचे व शासकिय कागदपत्रांचे बिनचूक उल्लेख यांनी हा लेख खचाखच भरलेला आहे. त्यादृष्टीने या लेखाचे वाचन केल्यास त्या लेखाच्या संदर्भसमृद्धीची श्रीमंती लक्षात यायला वेळ लागत नाही. ३०-३५ वर्षाचे हे संदर्भ लावून ठेवण्यासाठी जो आटापीटा करावा लागतो त्याची नुसती कल्पना केली तरी त्यामागे संभाजीरावांनी किती जबर मेहनत उभी केली होती या नुसत्या विचाराने

# University Grants Commission
## Bahadurshah Zafar Marg
## New Delhi - 110 002

### MINUTES OF THE 479th MEETING OF THE UNIVERSITY GRANTS COMMISSION HELD ON 8th JULY 2011

The 479th meeting of the Commission was held on 8th July 2011 in which the following were present. :-

1. Prof. Ved Prakash, Chairman
2. Mrs. Vibha Puri Das, Member
3. Mrs. Vilasini Ramachandran, Member
4. Prof. K.Ramamurthy Naidu, Member
5. Dr. Vidya Yeravdekar, Member
6. Prof. Achyutananda Samanta, Member
7. Prof. Meenakshi Gopinath, Member

Prof. Xavior Alphonse, S.J. and Prof. Dr. Sayed E. Hasnain, Commission Members could not attend the meeting and they were given **leave of absence.**

Shri R.D.Sahay, ***Director, MHRD*** also attended the meeting.

The following Officers of the UGC also attended the meeting.

***Secretary,*** Dr. N.A. Kazmi

***Additional Secretary,*** Dr. K.Gunasekaran

***Financial Advisor,*** Shri. A.K.Dogra.

"**2.09 :** To Consider the **representations** received in respect of lecturers appointed in the State of Maharashtra from 19.09.1991 till 03.04.2000.

The Commission **deliberated** on the issue regarding appointment of various teachers in the State of Maharashtra from September 19,1991 until April 3,2000 and resolved that all such appointments made on regular basis by various universities in the state of Maharashtra where the **university has granted exemption** to teachers from the requirement of NET in terms of the UGC Regulations, 1991 and subsequent Notification dated 24th December, 1998 and where the **representation** has been forwarded to Commission seeking further approval in relation to such regular appointments made during the said period w.e.f. September 19,1991 till April 3, 2000 **is approved.**

It further resolved that a communication in this regard be sent to the universities concerned and the state of Maharashtra"

सुद्धा मन थक्क होते.

**७.** शिक्षकांच्या बहूसंघटना अस्तित्वात असणे हे राज्यकर्त्यांना नेहमीच सोईचे असते. तसे नसेल तर अशा संघटना उभ्या करण्याचे प्रयत्न शासनाकडून होतात. महासंघाच्या स्थापनेनंतर असे अनेक प्रयत्न झालेत. महासंघाच्या स्थापनेपूर्वी किंवा स्थापनेच्या वेळी असा एक प्रयत्न झाला होता. याचा एक महत्त्वाचा उल्लेख संभाजीरावांच्या या लेखामध्ये आहे तो पुढील प्रमाणे "**महाराष्ट्रव्यापी विद्यापीठ परीक्षा बहिष्कार पाहून शासनाने सर्व प्राध्यापक संघटनांना चर्चेसाठी निमंत्रणे लेखी पाठविली. त्यांना मार्च १९७५ मध्ये वेगवेगळ्या वेळी व दिवशी बोलाविण्यात आले होते.** त्यावेळीच डॉ. एल.बी.केणी व डॉ. किशोर ठेकेदत्त यांनी ह्या सर्व प्राध्यापक संघटनांना पत्रे पाठवून मरिन लाईन्स स्टेशनजवळ असलेल्या 'किमत रॉय बिल्डिंग'मध्ये एका वेळी एकत्रित येण्याचे आवाहन केले. ह्याप्रमाणे सर्व प्राध्यापक संघटनांचे पदाधिकारी तेथे एकत्रित आले. **डॉ.केणी व डॉ.ठेकेदत्त यांनी सर्व परिस्थिती समजून सांगितली आणि सर्व संघटनांनी शासनाबरोबरच्या चर्चेसाठी एकत्र जाण्याचा ठराव प्रथम तेथे मंजूर झाला आणि त्याप्रमाणे शिक्षणमंत्र्यांना कळविण्यात आले.**" *(सहपत्र ३ परिच्छेद ३)* वेगवेगळ्या संघटनांना वेगवेगळे बोलावून त्यांच्याशी वेगवेगळी चर्चा करण्याच्या शासनाच्या या पवित्र्याने शिक्षकांमध्ये त्यावेळी फार मोठी अस्वस्थता निर्माण झाली होती, याचा मी प्रत्यक्षदर्शी आहे. पुक्टो बुलेटीनच्या याच विशेषांकात महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष प्रा.सी.आर.सदाशिवन यांचा "Formation of MFUCTO'' या मथळ्याचा एक लेख प्रसिद्ध झाला असून त्यांनी सुद्धा या घटनेचा आपल्या लेखात "**However, even at this stage what was done by the Government was to call the different Organizations for discussion on** different dates. A Two day Seminar was arranged in the last week of March 1975 and a Steering Committee was formed which met on 1st April 1975 under the Chairmanship of Prof. V.B.Kamath, one of our veteran leaders. At this meeting a decision was taken not go to the Minister for any discussion separately. A demand was made that all the organizations should be called by the Minister for discussion on the same date and at the same time." *(सहपत्र ४ परिच्छेद २)* या शब्दात उल्लेख केलेला आहे. त्यांच्या लेखातील लागुपुरता भाग **सहपत्र : ४** म्हणून सोबत दिलेला आहे. **शासनाचा संघटनांमध्ये फुट पाडण्याचा हा प्रयत्न यशस्वी होऊ नये म्हणून इतर नेत्यांबरोबर संभाजीराव जाधव हिरीरीने सहभागी होते हे मी मुद्दाम नमुद करीत आहे.**

**८.** प्रा.संभाजीराव जाधव यांचा जन्म ३ सप्टेंबर १९३७ रोजी पारे (ता. खानापूर, जि. सांगली) या खेड्यातील शेतकरी कुटुंबात झाला. तामिळनाडू मधील मदुराई येथे त्यांचा वडीलोपार्जित सराफी व्यवसाय होता. मराठीतून शिक्षणाची आबाळ होवू नये म्हणून वयाच्या १० व्या वर्षी ते परत आले व एकदम चौथ्या वर्गापासून त्यांचे शिक्षण त्यांच्या मुळगावी सुरु झाले. पुढे आठव्या वर्गापासून एम.ए. पर्यंतचे त्यांचे शिक्षण पुणे येथे झाले. पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमधून एस.एस.सी., पुणे येथील एस.पी.कॉलेजमधून बी.ए. (ऑनर्स-इंग्लिश) झाल्यानंतर शेवटी १९६५ साली पुणे विद्यापीठाची एम.ए. (एंटायर इंग्लिश) पदवी त्यांनी प्राप्त केली. आवडीखातर पुढे त्यांनी शिवाजी विद्यापीठाची एम.ए. (मराठी) पदवी मिळविली. शिक्षण पूर्ण केल्यानंतर कोल्हापूर जिल्ह्यातील **वारणा महाविद्यालय, कॉलेज ऑफ कॉमर्स, विवेकानंद कॉलेज व छत्रपती शहाजी कॉलेजमध्ये** प्राध्यापक म्हणून नोकरी केली. १९७६ पासून त्यांनी कोल्हापूरच्या महावीर कॉलेजमध्ये इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून काम केले. दरम्यान १९७१ साली ते विवाहबध्द झाले. सौ. गीता संभाजीराव जाधव यांची त्यांना सामाजिक कार्यात मनोमन साथ असे. प्रा.संभाजीराव १९७५ पासून शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य होते. सिनेटमधील त्यांच्या लोकाभिमुख, अभ्यासू कार्याची पावती म्हणून १९७८ मध्ये ते विद्यापीठाच्या कार्यकारिणीवर निवडून आले होते त्यांना वाचनाचा जबरदस्त छंद होता व त्यांचा स्वतःचा असा विपूल ग्रंथसंग्रह होता. साऱ्या महाराष्ट्राला **त्यांचा जो परिचय आहे तो इंग्रजीचे एक निष्णात प्राध्यापक म्हणून व 'सुटा'चे व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या संस्थापक नेतृत्वमंडळातील एक ज्येष्ठ नेते म्हणून.**

**९.** संघटनेचे पहिले अध्यक्ष डॉ.लिलाधर केणी यांनी अध्यक्ष या नात्याने सन १९८० व ८१ चा दोन वर्षाचा नंतरचा कार्यकाल पूर्ण केल्यानंतर श्री. संभाजीराव जाधव हे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे अध्यक्ष झाले. महासंघाचे दुसरे अध्यक्ष या नात्याने त्यांचा हा कार्यकाळ १९८२ ते १९८५ (दोन वर्षाच्या दोन टर्म) असा होता. त्यानंतर महासंघाचे तिसरे अध्यक्ष प्रा. एकनाथ मांजरेकर व चौथे अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख यांच्या प्रत्येकी दोन वर्षाच्या दोन टर्म संपल्यानंतर १९९४ मध्ये पुन्हा अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांच्यावर आली. अध्यक्षपदाचा त्यांचा हा नंतरचा कालखंड १९९४ ते १९९७ (दोन वर्षाच्या दोन टर्म) असा चार वर्षाचा होता.

**१०.१** "दोन वर्षाच्या दोन टर्मपेक्षा जास्त काळ कोणालाही अखंडीतपणे अध्यक्ष पदावर रहाता येणार नाही" अशी महासंघाच्या घटनेतच तरतुद आहे. 'ब्रेक'नंतरच्या अध्यक्ष पदाचा दोन वर्षाच्या दोन टर्मचा त्यांचा दुसरा कार्यकाळ १९९७ मध्ये संपुष्टात आला. सन १९९७ सुद्धा संपुष्टात येत होते/आले होते. पाचव्या वेतन आयोगाचे वादळ केंद्र शासनाच्या पातळीवर घोंगावत होते. १९९८-९९ या कालखंडात हे वादळ केव्हाही महाराष्ट्राच्या किनाऱ्यावर धडकू शकते अशी स्थिती होती. संभाजीराव घटनेतील तरतुदीप्रमाणे अध्यक्षपद पुन्हा धारण करु शकत नव्हते. कार्यकारी मंडळाच्या आम्ही सर्व सदस्यांनी त्यांना अशी विनंती केली की त्यांनी सरचिटणीस हे पद स्वीकारावे. त्यापूर्वीच्या कोणत्याही अध्यक्षाने (त्यांच्यासह व माझ्यासह) दोन वर्षाच्या दोन टर्म संपल्यानंतर सरचिटणीस पद स्वीकारले नव्हते. पुढचा दोन वर्षाचा संघर्षाचा काळ लक्षात घेता त्यांनी ही विनंती स्वीकारावी असे आम्हा सर्वांचेच मत पडले.

**१०.२** पुर्वोदाहरण नसल्याने त्यांचे मन तयार होईना. सन १९९० मध्ये माझी जळगावच्या अधिवेशनात अध्यक्ष म्हणून निवड झाली होती. त्याप्रसंगाची आठवण मी त्यांना करुन दिली. जळगावच्या अधिवेशनाच्या वेळी कार्यकारी मंडळाच्या अनेक सदस्यांची मी अध्यक्ष व्हावे अशी इच्छा होती. त्यातील काहीनी माझ्याशी बोलणे केले होते. तेंव्हा मी नाही कां म्हणत आहे याचे कारणही मी सांगितले होते. शेवटी सर्वांनी माझ्याशी बोलण्याची ही जबाबदारी संभाजीरावांवर टाकली. मी त्यांना म्हणालो. "**संभाजीराव! माझे कारण लहानसे असले तरी महत्वाचे आहे. सभागृहात "त्या संघटनेचे असे म्हणणे आहे. त्या संघटनेने असे निवेदन दिले आहे**" हे म्हणण्याचा माझा अधिकारच त्यामुळे निघून जातो. लेटर हेडवर मीच अध्यक्ष, मीच निवेदन देणार, मीच प्रश्न विचारणार हे आमच्या शास्त्रात बसत नाही त्यामुळे मला थोडे मोकळे राहू द्या." त्यावर संभाजीराव ठामपणे मला असे म्हणाले की, "बी.टी.! महासंघात नेतृत्व करणाऱ्या माणसांची संख्या व क्रम लक्षात घेता आज तुम्ही अध्यक्षपद स्विकारण्यात तुमच्या कामाचा जसा गौरव आहे तसाच आम्हा सर्वांचा आनंद आहे. नाहीतरी आता शांततेचा काळ आहे. पुढची दोन वर्षे सभागृहात प्रश्न नाही लागले तरी चालेल. सर्वांची इच्छा आहे. तुम्ही नाही म्हणू नका." मी निमुटपणे सम्मती दिली. या प्रसंगाची आठवण करुन देऊन मी त्यांना म्हणालो "संभाजीराव पुढची २ वर्षे (१९९८ व ९९) आंदोलनाची आहेत, सर्वांची इच्छा आहे, सरचिटणीस पद स्विकारण्यास तुम्ही नाही म्हणू नका." संभाजीराव माझ्याकडे पाहून अशा मिस्किलपणे हसले की त्यांची सम्मती मिळाली आहे असे मला वाटले. शिर्षस्थ नेत्यांतील अनौपचारिक चर्चेनंतर सर्वांतर्फे करण्यात आलेली ही विनंती त्यांनी मान्य केली व सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला. पुढे दोन वर्षाच्या दोन टर्मसाठी महासंघाच्या सरचिटणीस या पदावर त्यांनी कार्य केले. **संघटनेच्या या दोनही महत्त्वाच्या पदांवर नेतृत्वाचे सातत्त्य टिकविण्याची गरज म्हणून काम केलेले महासंघाचे ते पहिले अध्यक्ष आहेत.**

**१०.३ 'बदल'या विषयाबाबत २००५ च्या टिपणामध्ये "आजच्या जीवनातील स्पर्धा, लोकशाही सारखी समानता व स्वातंत्र्यावर आधारलेली मूल्ये व सहकाराचे तत्व, अशा संघटनात्मक काम करणाऱ्या व्यक्तीत, म्हणजे त्यांच्या स्वभावात, त्यांच्या दृष्टीकोनात सतत बदल घडवून आणतात.....** हे समजण्यासाठी स्वतःचीच वारंवार पाहणी करणे, निरिक्षण करणे जरूरीचे असते. **आत्मनिरिक्षणाची आवश्यकता असते,** त्याकरिता मात्र दुसऱ्याच्या दृष्टीची गरज असते. स्वतःकडे दुसऱ्यांच्या, ..... दृष्टीने पाहिले पाहिजे..... **आधुनिक व्यवस्थापन शास्त्रात आत्मनिरिक्षण, बदल, निकोप वाढ, सहकार्य या तत्वांना ह्यामुळेच महत्व आले आहे. पाहिजे तर इतरांनी बदलावे, मी बदलणार नाही, अशा दृष्टीचे लोक हळूहळू बाजूला पडतात, मागे राहतात.**" *(सहपत्र १ परिच्छेद १ व २)* हे जे विचार त्यांनी मांडले आहेत ते सोदाहरण स्पष्ट करा, असे जर कुणी म्हणाले तर उपरोक्त बदल सहकाऱ्यांच्या आग्रहावरुन आनंदाने स्विकारणाऱ्या संभाजीरावांचाच उदाहरण म्हणून उपयोग करावा लागेल. संभाजीरावांनी आपल्या वर्तनाने ही पायवाट घालून दिली. "यद् यद् आचरती श्रेष्ठस्थः तद् तद् अनुसरती इतरेजनः" या उक्ती प्रमाणे मोठ्या माणसांनी घालून दिलेली पायवाट इतर लोकांसाठी पायंडा म्हणून उपयोगी ठरते. पुढे ती प्रथा एक चांगली प्रथा म्हणून नावारुपाला आली. **अध्यक्ष व सरचिटणीस ही दोनही पदे त्यावेळेपासून बरोबरीची समजली जाउ लागली.** उत्तम गुणवत्तायुक्त नेतृत्व पात्रता असेल तर त्या नेत्याने आलटून पालटून ही पदे स्विकारण्याची अत्यंत आरोग्यदायी प्रथा त्यानंतर महासंघात सुरु झाली व पुढच्या काळात अनेक चांगल्या नेत्यांच्या नेतृत्व गुणाचा संघटनेला लाभ झाला.

**११.१** सन १९९८-९९ च्या संघर्षमय काळात संभाजीराव हे संघटनेच्या शिर्षस्थ पदावर असले पाहिजे हा जो आग्रह त्यावेळी होता तो किती महत्वाचा

व उपयुक्त होता हे पुढील काळात ठसठशीतपणे दिसून आले व त्यामुळे संघटना व महाराष्ट्रातील प्राध्यापक एका फार मोठ्या संकटातून कसे सावरले गेले? याची माहिती मी देऊ इच्छितो.

**११.२** महाराष्ट्रात पाचव्या वेतन आयोगाची अम्मलबजावणी इतर सर्व वर्गांच्या बाबतीत झाली पण ती प्राध्यापकांच्या बाबतीत झाली नव्हती. २१ जुलै १९९९ पासून **बेमुदत संपावर जाण्याचा** पूर्वीच घोषित केलेला निर्णय, देशात लोकसभेच्या व विधानसभेच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यामुळे **महासंघाला पुढे ढकलावा लागला.** त्याऐवजी जिल्हास्तरावर **२० ऑक्टोबर १९९९ रोजी निदर्शने करण्याचा आणि ८ डिसेंबर १९९९ पासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय** घेण्यात आला. दि. २४ नोव्हेंबर १९९९ रोजी मंत्रिमंडळाचा निर्णय जाहीर झाल्यानंतर सर्व प्रकारे प्रयत्न करुनही त्या **निर्णयाची अधिकृत प्रत किंवा शासननिर्णयाची प्रत मिळविण्यासाठी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे अध्यक्ष, सचिव व इतर पदाधिकारी यांनी केलेले प्रयत्न पूर्णपणे अयशस्वी झाले.** याउलट मंत्रालयातून "विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षक कर्मचाऱ्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारशीनुसार **पाचव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणी लागू करण्याबाबत चर्चा** करण्यासाठी मा. अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्रशिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली व दालनात **गुरुवार, दि. ९ डिसेंबर, १९९९ रोजी** दुपारी ४.०० वाजता बैठक आयोजित करण्यात आली आहे. सदर बैठकीस कृपया उपस्थित रहावे अशी आपणांस विनंती आहे." अशा प्रकारचे निमंत्रणपत्र सरचिटणीस या नात्याने संभाजीरावांना व संघटनेच्या अध्यक्षांना प्राप्त झाले.

**११.३** बेमुदत संप ८ तारखेला सुरु होणार व चर्चेसाठी ९ तारखेला बोलाविले. त्यामुळे महाराष्ट्रातील शिक्षकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला. त्याची प्रतिक्रिया मंत्रालयामध्ये सुद्धा उमटली. ४ डिसेंबर १९९९ रोजी अवर सचिवांनी महासंघाच्या अध्यक्षांना दुसरे एक पत्र पाठवून असे कळविले की, "दिनांक २६.११.१९९९ रोजीच्या पत्र क्रमांक एनजीसी-१२९८/(४६१९)/विशि-४, या पत्रान्वये एमफक्टो संघटनेच्या पदाधिकाऱ्यांबरोबर मा. अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली व दालनात **गुरुवार, दिनांक ९.१२.१९९९ रोजी दुपारी ४.०० वाजता आयोजित केलेली बैठक आता सोमवार, दिनांक ६.१२.१९९९ रोजी दुपारी ४.०० वाजता** मा. अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली व दालनात बोलाविण्यात आली आहे." त्याप्रमाणे ती बैठक झाली व त्या बैठकीत झालेल्या चर्चेचा गोषवारा नमूद असलेले एक पत्र त्याच तारखेला महासंघाला देण्यात आले. त्या पत्रात "उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने माझ्या दालनात आज दिनांक ६.१२.१९९९ रोजी चर्चा केल्यानुसार विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांना ५ व्या वेतन आयोगावर आधारित विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केलेल्या वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा निर्णय शासनाने दिनांक **२४.११.१९९९ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतला आहे व त्यास प्रसिद्धी देण्यांत आली आहे. आपणास या मिटिंगमध्ये वाचून दाखविलेल्या वेतनश्रेणी खालीलप्रमाणे आहे." असे नमूद केले होते.** ज्या गोष्टीला शासनाने आधीच प्रसिद्धी दिली होती त्याच गोष्टी संघटनेला सचिवांनी पत्रान्वये कळविल्या.

**११.४** दुसऱ्या दिवशी, म्हणजे ७ डिसेंबर १९९९ रोजी सकाळी ११.३० वाजता महासंघाच्या कार्यकारी मंडळाची बैठक झाली. महासंघाची एका वाक्याची मागणी "The Government of India's suggestions on "Revision of payscales of teachers in Universities and Colleges, following the revision of payscales of Central Government employees on the recommendations of 5th Central Pay Commission" dated the 27th July, 1998, **as amended by a letter dated 6th November, 1998 be implemented by the State Government with recommended scales of pay,** as a composite scheme with effect from 1.1.1996." अशी होती. या बैठकीत **मा. अपर मुख्य सचिवांच्या पत्राचा विचार करण्यात आला व त्यावर निर्णय घेणारा ठराव** करण्यात आला. **आंदोलन ठामपणे सुरु राहील, मंत्रिमहोदयांच्या बैठकीच्या लेखी कार्यवृत्ताच्या आधारावर या निर्णयाचा पुनर्विचार करता येईल असे या ठरावात म्हटलेले आहे.** तो पूर्ण ठराव पुढील प्रमाणे :-

"1. After taking into consideration the discussion with the Secretary, Higher & Technical Education, Government of Maharashtra (Shri.M.R.Patil) that the Executive Committee of the MFUCTO had on 6th December 1999 in his chamber at Mumbai, and after careful consideration of the contents of the letter dated 6th December 1999 received from him, this meeting of the MFUCTO held on 7th December 1999, **is of the considered opinion that except going on indefinite strike, there is no alternative left for the MFUCTO,** and therefore it resolves to reiterate its decision to start the indefinite strike from 8th December 1999.

2. The above decision may however, **be reconsidered by the Executive Committee of the MFUCTO if written document is received on the basis of discussion with the Hon'ble Minister** for Higher & Technical Education, Maharashtra State."

**११.५** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळामध्ये उपरोक्त ठराव चर्चेला आला तेंव्हा काही सभासदांनी त्याला कडाडून विरोध केला. **"विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केलेली वेतनश्रेणी लागू करण्याचा" उल्लेख सचिवांच्या पत्रात असल्यामुळे आता आंदोलन मागे घेण्यात यावे असे विरोध करणाऱ्यांचे म्हणणे होते.**

**११.६** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या आयोगाने सादर केल्यावर आयफक्टोच्या नेतृत्वाखाली देशभर जो यशस्वी संप झाला त्यातून मिळालेल्या अनेक उपलब्धी केंद्र शासनाच्या ६ नोव्हेंबर १९९८ च्या आदेशात समाविष्ट होत्या. **"केंद्राच्या ६ नोव्हेंबर १९९८ च्या आदेशाप्रमाणे सुधारित केलेल्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या"** अशी शब्दरचना टाकण्यास सचिव नकार देत होते व त्यांच्या पत्रातून त्यांनी तो उल्लेख गाळून टाकला होता. **सरचिटणीस या नात्याने संभाजीराव जाधव यांनी उपरोक्त ठराव सभागृहासमोर मांडला. ठरावाचे शक्तीपूर्ण समर्थन केले. बाजूने व विरोधात जोरदार भाषणे झाली.**

**११.७** महासंघाच्या कार्यकारी मंडळामध्ये चर्चेनंतर बहुधा ठराव एकमताने मंजूर होतात. गेल्या ३०-३५ वर्षात फार कमी वेळा मतदान झाले. त्यादिवशी एकमत होईल असे दिसेना. शेवटी चर्चेनंतर ठराव मतास टाकण्यात आला. १९ बाजूने व ५ विरूद्ध अशा बहुमताने ठराव मंजूर करण्यात आला. सरचिटणीस या नात्याने संभाजीराव जाधव यांच्या सहीने मा. उच्च शिक्षणमंत्र्यांना दुताकरवी त्याच दिवशी (७.१२.१९९९) पत्र पाठविण्यात आले. ते लहानसे पत्र शब्दशः पुढील प्रमाणे :-

"To,

**Shri. Dilip Valse-Patil**
Hon'ble Minister for Higher & Technical Education,
State of Maharashtra Mantralaya, Mumbai 400 032.

Dear Sir,

The MFUCTO Executive Committee is thankful to you for having given us an appointment today, 7th December 1999 at 4 p.m. in your office, to discuss the question of implementation of revised pay scales for university and college teachers and other categories of teachers, in the state of Maharashtra.

After discussion with Shri. M.R.Patil, Secretary, Higher & Technical Education, Government of Maharashtra and also taking into consideration the contents of his letter dated 6th December 1999, the MFUCTO at its meeting held today, 7th December 1999 at 11.30 a.m. in Mumbai, adopted a Resolution which is self-explanatory. **During the discussion, the secretary had stated that there is no deviation from the scheme** contained in the Government of India letters dated 27th July 1998 and 6th November 1998 **which is not reflected in the letter given to the MFUCTO** by him dated 6th December 1999.

A copy of the Resolution is enclosed for your information."

**११.८** श्री. संभाजीराव जाधव यांनी लिहिलेल्या एका लेखात लेखी करार न करण्याच्या १९७५ मधील कटू अनुभवाविषयी पुढील विचार मांडलेले आहेत. "शासनाकडून लेखी करारास मान्यता न मिळाल्याने त्याचे बरेवाईट, बहुतांश वाईट परिणाम पुढे झाले. .... महाराष्ट्र शासनाने युजीसीच्या नव्या वेतनश्रेणी व इतर मान्य मागण्यांबाबत जो आदेश दि. ४ ऑक्टोबर, १९७५ रोजी काढला त्यात अगोदर मान्य केलेल्या मागण्या मोठ्या प्रमाणात बदलून

टाकल्या. स्वतः शिक्षणमंत्र्यांनी विधानसभेत अगोदर केलेल्या निवेदनाप्रमाणे सुद्धा आदेश काढला नाही. **शासनाबरोबर लेखी करार करणे कसे आवश्यक असते याचा प्रत्यक्ष अनुभवच 'एमफक्टो' संघटनेस आला. त्यामुळे पुढील काळात असे अनेक करार करण्यास 'एमफक्टो'ने शासनास भाग पाडले आहे. त्यामागे हा विदारक अनुभव आहे.** शासनातील मंत्री व त्यांचे सचिव हे किती प्रमाणात विश्वासास पात्र आहेत, हेच त्यातून स्पष्ट झाले." *(सहपत्र ३ परिच्छेद ६)"* ७ डिसेंबर १९९९ च्या बैठकीत उपरोक्त ठरावावरील चर्चेचा समारोप करतांना त्यांनी याच स्वरुपाचे विचार पण तपशिलाने कार्यकारी मंडळाच्या बैठकीत मांडले होते.

**११.९** मंगळवार, दिनांक ७.१२.१९९९ रोजी दुपारी मा. उच्च शिक्षणमंत्र्यांशी ४.३० वाजता सुरू झालेली चर्चा रात्रौ ११.३० वाजेपावेतो सुरु होती. सायंकाळी सहा वाजताच्या दरम्यान एक मसुदा उभयपक्षी मान्य झाल्यासारखा ठरला. एक एका वाक्याचे लहान लहान तीन ते चार परिच्छेद असलेला हा मसुदा जेवढ्या वेळात टाईप होऊन यायला पाहिजे होता, तेवढ्या वेळात तो आला नाही. दोन अडीच तासांनी टाईप होऊन आला. त्यात अनेक उलट सुलट बाबींचा समावेश होता. **ठरल्यापेक्षा हा मसुदा पूर्णपणे वेगळा आला होता. विशेष धक्का देणारी बाब म्हणजे फक्त २७ जुलैच्याच केंद्रशासनाच्या पत्राचा उल्लेख त्यामध्ये होता. ६ नोव्हेंबर १९९८ च्या केंद्र शासनाच्या पत्राचा उल्लेख या मसुद्यातून पूर्णपणे गाळण्यात आलेला होता.** याचा अर्थ लक्षात येण्यासाठी महासंघाच्या कार्यकारी मंडळाला (संपूर्ण मसुदा वाचण्यासाठी लागलेला) २ मिनिटाचा वेळ सुद्धा पुरेसा झाला. तेथेच मंत्रालयातच मा.उच्च शिक्षण मंत्र्यांच्या बैठक दालनांत महासंघाच्या कार्यकारीणीची बैठक होऊन **मसुद्यावर विचार करून तो मसुदा फेटाळण्यात आला. रात्रौ १०.०० वाजता संप पुढे चालविण्याचा ठाम निर्णय घेण्यात आला.** मला हेही नमूद केले पाहिजे की सकाळी ज्या ५ सदस्यांनी ठरावाच्या विरोधात मतदान केले ते सर्वच जण या सायंकाळ व रात्रीच्या बैठकीला उपस्थित होते. **रात्रौ १० वाजता आंदोलन सुरु ठेवण्याचा निर्णय एकमताने झाला, कारण ६ नोव्हेंबर १९९८ च्या केंद्र शासनाचा उल्लेख टाळला जात आहे हे सर्वांच्याच लक्षात आले होते.**

**११.१०** संप सुरु ठेवण्याच्या या निर्णयाचा योग्य तो परिणाम झाला. मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी सर्वांना थांबवून घेतले. चर्चा पून्हा सुरु झाली. शेवटी "अग्रिमेंट" झाले. त्याच्या पहिल्या परिच्छेदातच शासनाने "The Government of India's suggestions on "Revision of payscales of teachers in Universities and Colleges following the revision of payscales of Central Government employees on the recommendations of 5th Central Pay Commission" dated the 27th July, 1998 **amended vide a letter dated 6th November, 1998** including UGC's notification dated 24th December, 1998 would be implemented by the State Government with recommended scales of pay, as a composite scheme with effect from 1.1.1996 ....." ही गोष्ट मान्य केलेली होती. माझ्या स्वाक्षरीने १९९९ मध्ये नुटा बुलेटीनमध्ये प्रकाशित झालेल्या "पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारसीवर आधारित केंद्र शासनाने लागू केलेल्या वेतनश्रेण्या विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना लागू करण्याच्या संदर्भात ८ डिसेंबर १९९९ रोजी सुरु होणाऱ्या आंदोलनापूर्वीच्या **घटनाक्रमाचा अहवाल"** या मथळ्याच्या अहवालाच्या शेवटच्या परिच्छेदात "संघटनेचे अध्यक्ष प्रा.सी.आर.सदाशिवन व महासचिव श्री. संभाजी जाधव यांच्या सोबतच प्रा.एकनाथ मांजरेकर यांनी विचारांवर ठाम राहून महाराष्ट्रातील प्राध्यापकांचे हित डोळ्यासमोर ठेवून ज्या दमदारपणे या काळात नेतृत्व केले त्याबद्दल त्यांचे मानावे तेवढे आभार थोडेच आहेत." असे नमूद केले होते. *(1999 NB P171)* **"लेखी करार झाल्याशिवाय आंदोलन मागे घेतले जाणार नाही" असा ठाम विचार कार्यकारी मंडळामध्ये मांडणाऱ्या संभाजीरावांनी 'ॲग्रीमेंट'वर संघटनेच्या वतीने ७ डिसेंबर १९९९ रोजी ज्यावेळी सही केली त्यावेळी सरचिटणीस म्हणून का होईना पण संभाजीराव नेतृत्वपदी असले पाहिजे हा आम्ही २ वर्षापूर्वी धरलेला आग्रह किती यथार्थ होता हे सर्वांच्याच लक्षात आले.** हजारो लोक मैदानात संघर्ष करण्यासाठी उतरलेले असतात अशा वेळी त्यांचे व त्या आंदोलनाचे भवितव्य काही मोजक्या नेत्यांच्या नेतृत्वगुणावर विसंबून असते. त्यापैकी एखाद्या नेत्याने जरी 'झोल' खातो म्हटले तरी त्याचे सर्वांगानी किती विपरित परिणाम झाले असते याचा नुसता अंदाजच करावा लागतो. ७ डिसेंबर १९९९ च्या त्या संकटातून महासंघ यशस्वीरित्या बाहेर पडण्यात संभाजीरावांच्या नेतृत्वातील कणखरपणाचा फार मोठा भाग होता.

**११.११** जी गोष्ट १९९९ ची तीच गोष्ट २००९ साली सुद्धा घडली. सन १९९९ मध्ये राज्यस्तरावरचा संप टळला. झाला नाही. सन २००९ मध्ये बेमुदत काम बंद आंदोलन सुरु झाले व ते ४४ दिवस चालले. सन २००९ मध्ये संभाजीराव कोणत्याही पदावर नव्हते. साधे महासंघाच्या कार्यकारी मंडळाचे सदस्यही नव्हते. निवृत्त झाल्यानंतर सुटाच्या प्रतिनिधीत त्यांचे नाव समाविष्ट करण्यास त्यांनी नकार दिला. मात्र या सर्व वर्षात महासंघाच्या कार्यकारी मंडळाने विशेष ठराव करुन "कायम निमंत्रित" म्हणून येण्याविषयी त्यांना विनंती केली होती व ती त्यांनी मान्य केली होती. त्यांच्या समृद्ध अनुभवाचा व अभ्यासपूर्ण सहभागाचा महासंघाला सन २००९ च्या आंदोलन काळात खूपच लाभ झाला. महासंघाच्या इतिहासांत पहिल्यांदा उच्च शिक्षण सचिवांनी **"ॲग्रिमेंट होणार नाही, आम्ही काय ते तुम्हाला पत्राने कळवू"** अशी भूमिका घेतली. एकतर्फी पहिले पत्र पाठविले, दुसरे पाठविले, तिसरे पाठविले. शासनाने तीन पत्रे पाठविली तेंव्हा आता आंदोलन मागे घ्यावे असा महाराष्ट्रभर गलका सुरु झाला. **"ॲग्रिमेंट होणार नसेल तर आंदोलन मागे घेणार नाही" अशी ठाम भूमिका घेणाऱ्या नेत्यात संभाजीराव प्रमुख होते. त्यांच्या नेतृत्व गुणाचा २००९ च्या संकट काळात महासंघाला खूपच फायदा झाला.**

**१२.** एप्रिल, १९८४ मध्ये 'एआयफक्टो' या अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाचे ते उपाध्यक्ष होते, त्या पदावर ते जवळ जवळ बारा वर्षे होते. त्याचदरम्यान ॲआयफक्टोच्या एका शिष्टमंडळामधून रशिया व पूर्व जर्मनीस भेट देण्याचा त्यांना योग आला. रशिया व पूर्व जर्मनीमध्ये शिक्षण व्यवस्था नेमकी कशी आहे? पूर्व प्राथमिक ते विद्यापीठ स्तरापर्यंत अभ्यासक्रम कसे आहेत, शिक्षकांना प्रशिक्षण कसे दिले जाते, संशोधन करण्यास कसे प्रोत्साहन दिले जाते, शिक्षणावर कसे ३० टक्क्यांहून (एकूण उत्पन्नाच्या) जास्त रक्कम खर्च करतात. इत्यादी बाबी त्या त्या प्रकारच्या संस्थामध्ये जाऊन, इतकेच काय पण प्रत्यक्ष चालू असणाऱ्या वर्गात बसून समक्ष अनुभवच त्यांनी घेतला होता. तसेच, ह्या दोन देशांत शिक्षकांच्या (पूर्व प्राथमिक ते विद्यापीठ स्तरांवर) संघटना कशा बांधलेल्या आहेत, त्यांचे कामकाज प्रत्यक्षात कसे चालते. हेही प्रा. संभाजीराव जाधव यांनी तिथे अभ्यासिले होते. आपल्या भारतातील ह्याबाबतची वस्तुस्थिती व ह्या दोन पुढारलेल्या युरोपियन देशांतील परिस्थिती यांचा तुलनात्मक दृष्टीने विचार करणे त्यामुळे त्यांना शक्य होत असे. आपल्या मोठ्या कन्येकडे इंग्लडमध्येही ते ऑगस्ट २००४ ते जानेवारी २००५ या काळात मुक्कामी होते. तेथील एकूण शैक्षणिक पद्धती आणि समाज जीवन यांचे संभाजीरावांना त्यामुळे अगदी बारकाईने निरीक्षण करता आले. **जातील तेथे काही तरी नवीन शिकतील, वाचतील व सांगतील देखील असा त्यांचा स्वभाव बनला होता.**

**१३.१** 'सुटा' आणि संभाजीराव यांच्याबद्दल काय लिहावे? संघटना आणि संघटनेचा अभिन्नजीव नेता याचे उदाहरण द्यायचे झाल्यास उदाहरणार्थ म्हणून सुटा आणि संभाजीराव यांचेच उदाहरण द्यावे लागेल.

**१३.२** १९७४-७५ मध्ये शिवाजी विद्यापीठ क्षेत्रामध्ये सुटाची स्थापना करण्यामध्ये ज्या नेत्यांनी पुढाकार घेतला त्या नेतृत्वमंडळामध्ये ते अग्रभागी होते. अनेक वर्ष ते त्या संघटनेचे अध्यक्ष होते. सर्वसामान्य प्राध्यापकांचा अमर्याद विश्वास व प्रयत्नांस भरपूर फळ सतत येत असल्यामुळे प्राध्यापक संघटनेत दीर्घकाळ काम करण्यात आनंद आहे, तो सेवानिवृत्तीनंतरही आहे. त्यासाठी संघटनेतील एखादे पद लागते असे नाही, असे संभाजीराव नेहमी म्हणत असत. हाच विचार त्यांच्या टिपणामध्ये त्यांनी पुढील शब्दात मांडला आहे.

" 'सुटा' या संघटनेत काही वर्षे सक्रीय काम केलेल्या प्राध्यापकांनी स्वतःस संघटनेच्या कामापासून कधीही अलीप्त ठेवू नये. पद असो वा नसो, आपले हे एक धर्मकृत्य आहे, असे मानून निरलसपणे वयाच्या सत्तराव्या वर्षापर्यंत काम करावे. काम सतत जास्त असते व काम करणारे कमी असतात. संघटनेस सर्वांची गरज असते. ती सर्व प्राध्यापकांनी भागविली पाहिजे, त्यासाठी वाटेल ते काम करण्याची निरपेक्ष बुद्धीने तयारी ठेवली पाहिजे. त्यात एक प्रकारचे दुर्मिळ समाधान निश्चित आहे." *(सहपत्र : १ परिच्छेद १०)* 'सुटा'तील कोणते पद किती काळ त्यांच्याकडे होते हा प्रश्न त्यांच्याबाबतीत गैरलागू होता. **संघटनेच्या स्थापनेपासून तर जिवनाच्या अखेरपर्यंत ते या संघटनेचे शिर्षस्थ नेते होते असेच म्हणावे लागेल.**

**१३.३ 'टीबीएफ' म्हणजे 'टिचर्स बेनेव्हॉलन्ट फंड'** या नावाची एक व्यवस्था सुटामध्ये त्यांनी सुरु करविली. प्रत्येक प्राध्यापकांने फक्त रुपये १२५० (बाराशे पन्नास) देऊन 'टिबीएफ' चे सदस्य व्हायचे त्यानंतर पुन्हा कसलीही वर्गणी नाही. आजच्या धावपळीच्या काळात कोणावर कसा प्रसंग केंव्हा येईल, हे कोणालाही सांगता येत नाही. एखाद्या प्राध्यापकाचा कशानेही मृत्यू झाला, तर त्याच्या वारसास तातडीने (अगदी एक दोन दिवसांत) २५,००० रुपये रोख डी.डी.ने दिले जाण्याची सोय या व्यवस्थेमधून स्थापित करण्यात आली. सभासद झाल्यावर प्राध्यापकास एक वर्ष ही योजना लागू राहत नाही, प्रत्येक वर्षागणिक रु. ५०० वारसांना दिले जातात. आजपर्यंत

'सुटा'तर्फे लाखो रुपये या योजनेखाली दिवंगत प्राध्यापकांच्या वारसांना देण्यात आलेले आहेत. **अशी व्यवस्था महाराष्ट्रातील इतर कोणत्याही संघटनेच्या कार्यक्षेत्रात उपलब्ध नाही.**

**१३.४ 'सुटा' प्राध्यापक संघटनेच्या कोल्हापूर जिल्हा शाखेने आपली म्हणून प्राध्यापकांकरिता एक पतसंस्थाही काढली आहे.** 'टिबीएफ' प्रमाणे ही पतसंस्थाही शासनाच्या नियमानुसार नोंदविली आहे. प्राध्यापकांना लागणारी आर्थिक तरतूद घरबांधणी, इतर खरेदी इत्यादीसाठी कमीत कमी व्याजावर आपल्या सभासदांना रक्कम प्रदान करणारी ही पतसंस्था आहे. एका वेळी जास्तीत जास्त कर्ज रुपये साडेतीन लाख दिले जाण्याची व्यवस्था या संस्थेमार्फत करण्यात आलेली आहे.

**१३.५** मुळात सुटाच्या कार्यक्षेत्रामध्ये कोल्हापूर, सातारा, सांगली व सोलापूर हे चार जिल्हे. आपल्या शिक्षक सभासदांच्या भरवशावर उभे केलेल्या अर्थबळातून **सुटा च्या चारही जिल्ह्यात सुटाची चार स्वतंत्र स्वमालकीची कार्यालये कार्यरत आहेत,** 'सुटा'या संघटनेशी तिच्या चार हजार सभासदांचे किती घनिष्ठ, जिव्हाळ्याचे व जवळचे नाते जोडले गेले आहे, ह्याचे हे स्पष्ट द्योतक आहे. सातारा, सांगली व सोलापूर येथील सुटाची जिल्हा कार्यालये एस.टी.स्टँडजवळ आहेत. श्री. संभाजीरावांनी अगत्यपूर्वक दिलेल्या निमंत्रणाचा स्विकार करून कोल्हापूर कार्यालयाच्या उद्घाटनासाठी त्यावेळी मी मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होतो. कोल्हापूरमधील कार्यालय शहरात, मध्यवर्ती ठिकाणी आहे. ही बाब प्रथम केवळ सुटाच्या कार्यक्षेत्रात घडलेली आहे. **इतरत्र कोणत्याही घटक संघटनेच्या कार्यक्षेत्रात अशी जिल्हावार स्वमालकीची कार्यालये अद्यापि उभी राहिलेली नाहीत. गुणदान पद्धतीने क्रमांक देवून महाराष्ट्रात या कामाबावतीत क्रम लावले तर संघटना म्हणून 'सुटा' व संघटनेचा नेता म्हणून संभाजीराव जाधव यांनाच पहिला क्रम द्यावा लागेल.** याशिवाय शिवाजी विद्यापीठात सुटा कार्यालयासाठी मोकळी जागा मिळविण्याचे प्रयत्न त्यांच्या पुढाकाराने सुरु झाले होते. त्यासाठी प्राध्यापक सदस्यांनी ह्या अगोदरच वर्गणी दिलेली आहे. सुमारे पंचवीस लाख रुपये खर्च करून नवीन कार्यालय 'सुटा' च्या अधिक व्यापक कार्याकरीता उभे केले जाण्याची योजना त्यांच्या मार्गदर्शनात आखण्यात आलेली आहे. त्यात प्राध्यापकांना राहण्यासाठी काही स्वयंपूर्ण खोल्या, सभेसाठी एक सभागृह, ग्रंथालय, संशोधन साधने इत्यादी सोई करण्याचे त्यामध्ये नियोजन आहे.

**१३.६** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने (MFUCTO) सन १९७६-७७ च्या सुमारास एक महत्त्वाचा धोरणात्मक निर्णय घेतला होता. विद्यापीठाचे प्रशासन हे प्राध्यापकांच्या म्हणजेच प्राध्यापकांच्या संघटनांच्या बाबतीत सतत प्रतिकुल निर्णय घेत रहाण्याची प्रथा बंद व्हावी. तेथे कायद्यानुसार व नियमानुसार काम चालावे यासाठी अशा **प्राध्यापक संघटनांनी विद्यापीठाच्या निवडणूकात सहभागी व्हावे.** ह्या धोरणात्मक निर्णयानुसार 'सुटा' संघटनेने सन १९७८ पासून शिवाजी विद्यापीठाच्या निवडणूकांमध्ये अशा सहभागास प्रारंभ केला. त्यानंतर पुढे सतत असा सहभाग घेतला. सन २००१ च्या दरम्यान त्या विद्यापीठाच्या एकूण १२-१३ अधिकारी मंडळावर बहुसंख्येने 'सुटा' या संघटनेचे अधिकृत सदस्य होते, अधिसभेत ५०, विद्वत सभेत ४५ आणि व्यवस्थापन परिषदेवर १० सदस्य 'सुटा' तर्फे निवडून गेले होते. पुढे पुढे प्रश्न कायद्यात प्राध्यापकांना अनुकूल तरतुदी करण्याचा राहिला नाही, त्या बहुशः झालेल्या होत्या, खरा प्रश्न होता तो ह्या तरतुदींच्या परिणामकारक व तातडीने होणाऱ्या अंमलबजावणीचा, अशा अंमलबजावणीच्या आड येत होते, शासन धार्जिणे कुलगुरू, शासन अधिकारी आणि विद्यापीठातील संस्था धार्जिणे प्रशासन, ह्या सर्वांच्या दीर्घकालीन, गैर व भ्रष्ट व्यवहारास आळा बसवावयाचा तर **शिक्षक संघटनाचा विद्यापीठ प्रशासनातील सहभाग महत्वाचा ठरतो हे लक्षात घेवून या धोरणाची प्रभावी अम्मलबजावणी सुटा क्षेत्रात करण्यामध्ये संभाजीरावांचे नेतृत्व शेवटपर्यंत कार्यरत होते व उत्तम यश मिळवित होते.**

**१३.७** प्राध्यापकांच्या हितसंबंधाचा विचार करून **'सुटा'ने 'प्राध्यापक विश्व', या नावाचे एक नियतकालीक अनेक वर्षे चालविले आहे.** प्राध्यापक विश्वची कायमची वर्गणी रु. ६०० (सहाशे) ठेवण्यात आली असून आता ते मासिक स्वरुपात निघते. पूर्वी ते त्रैमासिक होते आणि अगदी सुरुवातीस तर ते अनियमित प्रकाशन पण विनामूल्य होते. आता त्यात मुख्यत्वे करून शासन आदेश (जी.आर.) विद्यापीठ परिपत्रके, शासकीय निदेश, विद्यापीठ अनुदान मंडळाची प्रपत्रे इत्यादी मजकूर छापला जातो. ह्या प्राध्यापक विश्वामुळे शिक्षकांना कायदेकानून, त्यातील विविध तरतुदी, नियम, पोटनियम यामुळे कायद्याची बाजू नेमकी काय आहे, याचे ज्ञान होऊ शकते.

**१३.८** गेल्या ३०-३५ वर्षामध्ये 'सुटा' संघटनेच्या मालकीच्या स्थावर मालमत्ता मुख्यालयी व जिल्ह्याच्या ठिकाणी संभाजीरावांच्या नेतृत्त्वात तयार झाल्या. संघटनेजवळ उपलब्ध असलेल्या या स्थावर व जंगम मालमत्ता सुरक्षित रहाव्यात म्हणून सुटाच्या घटनेमध्ये त्यांनी विधिवतरित्या दुरुस्ती करविली व सुटाच्या घटनेत ३०(अ) हे जादाचे कलम जोडले. ते पुढील प्रमाणे :- "**(30. A) Board of Trustees :** There shall be a Board of trustees consisting of five eminent persons of the Union or outside the Union. The trustees shall elect one of them as the Chairman. It shall be a permanent body and its members, shall be nominated by the SUTA General Council within the period of six months from the date of passing this amendment. The Board of Trustees shall be the custodian of all the properties of the Union and its District Units. No. Property shall be disposed of or sold out or leased out by the General Council of the SUTA unless the unanimous resolution passed by the Board in its meeting. The Chairman shall convene the meeting once in the year. A vacancy on the Board is to be filled in by the SUTA General Council." एवढ्या प्रकारच्या स्थावर व जंगम मालमत्तांची उभारणी केल्यानंतर त्या मालमत्तांची काळजी घेणारी तरतुद संघटनेच्या घटनेतच नमूद करण्याची काळजी घेणारी तरतुद महाराष्ट्रात इतरत्र कोठे असेल असे वाटत नाही.

**१४.** सन १९८० मध्ये विदर्भ पदवीधर मतदार संघातून माझी विधानपरिषदेवर निवड झाल्यानंतर त्या सदस्यत्वामुळे शिक्षकांचेच नव्हे तर समाजाच्या सर्व स्तरातील प्रश्न सुटण्यास मोठीच मदत होते हे लक्षात आल्यानंतर असा प्रयत्न सर्वच घटक संघटनांच्या स्तरावर करण्यात यावा अशी प्रबळ भावना महासंघाच्या नेतृत्वमंडळामध्ये निर्माण झालेली होती. या प्रयत्नाचा एक भाग म्हणून सन १९८४ मध्ये 'सुटा' संघटनेने संभाजीराव जाधव यांना पदवीधर मतदार संघातून महाराष्ट्र विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी एकमताने उभे केले होते, सर्वांनी खूप प्रयत्नही केले, यश मिळेल अशी आशा देखील सर्वांना वाटत होती. पण वेगवेगळ्या कारणांनी हे यश त्यावेळी मिळविता आले नाही. **या अपयशामुळे संभाजीराव कधी निराश झालेले कोणी पाहिले नाहीत, संघटनेसाठी सन १९७५ पासून गेली ३०-३५ वर्षे संभाजीराव जाधव सातत्याने वाचताहेत, बैठकांना हजर राहाताहेत, अनेकांशी बोलताहेत, अनेकांबरोबर, तसेच एकटेही सर्व महाराष्ट्रभर फिरताहेत. त्यात कशामुळेही कधी खंड पडलेला नव्हता,** ना कुटुंबातील जबाबदारीमुळे, ना नोकरीतील नियमांमुळे, ना प्रकृती अस्वास्थामुळे! या सर्व बाबी त्यांना पूर्णतः समतोल ठेवता आलेल्या आहेत, ही विशेष बाब ध्यानात घेण्यासारखी आहे.

**१५. विनम्र व अभ्यासू स्वभाव, कायम खालच्या पट्टीतला पण करारी आवाज, मुत्सद्दी विश्लेषण, वादसंवादातील चातुर्य व संघटना कौशल्य यामुळे प्रा.संभाजी जाधव हे महाराष्ट्रातल्या प्राध्यापक चळवळीचे एक प्रमुख मार्गदर्शक राहिलेले आहेत.** सेवानिवृत्त होऊन १०-१२ वर्षाचा काळ लोटला असता तरी ते शेवटपर्यंत संघटनेत सक्रीय होते. प्राध्यापकांच्या समस्यांची त्यांना उत्तम जाण असल्यामुळे व त्या सोडविण्याचे मार्गही त्यांना माहीत असल्यामुळे ते सतत शासन व विद्यापीठ अधिकाऱ्यांबरोबर अशा समस्यांबाबत चर्चा करीत असत, त्यांना प्राध्यापकांच्या समस्यांमधील बारकावे व न्यायाची बाजू परिणामकारकपणे समजून सांगत असत, व प्राध्यापकांना जास्तीत जास्त न्याय मिळवून देत असत, असे काम करतांना त्यांच्या मनात कसलेही पूर्वग्रह नसत, राग वा द्वेष नसे, वस्तुनिष्ठ दृष्टीने विचार करीत असल्यामुळे संभाजीरावांच्या मांडणीत कधी गोंधळ वा व्यक्तिगत भाग नसे. इतरांनी कोणत्याही दृष्टीने त्यांच्याकडे पाहिले, कसलेही आरोप-प्रत्यारोप केले, तरी संभाजीराव कधी विचलित होत नसत, ते कोणासही शत्रू म्हणून मानीत नसत, सर्वांशी मोकळेपणाचे, विश्वासाचे, स्नेहाचे नाते व सबंध ठेवीत असत.

**१६.** अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या (AIFUCTO) नेतृत्वाखाली अनेक संघर्ष भारतभर उभे केले गेले. देशभरातील प्राध्यापकांना त्याचे लाभहि खुप मिळाले. एवढ्या मोठ्या खंडप्राय देशामध्ये एवढा मोठा संघर्ष उभा करायचा तर त्या काळात केंद्रस्थानी त्यासाठी खर्चसुद्धा मोठ्या प्रमाणात येतो. त्यासाठी स्वेच्छाधिन सहभाग म्हणून संघर्ष निधी उभा केला जातो. **दिल्लीसारख्या ठिकाणी अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाची इमारत नाही, कार्यालय नाही, थांबण्या-राहण्याची व्यवस्था नाही.** म्हणून एक इमारत निधीची योजना जाहीर करण्यात आली होती. सर्वच संघटनांनी या कामी कमी जास्त हातभार लावला असला तरी संभाजीरावांच्या नेतृत्वाखाली 'सुटा' या संघटनेने सर्व शिक्षकांच्या सहभागातून जवळ जवळ ३ लक्ष रुपयाचा निधी, संघर्ष निधी म्हणून व १ लक्ष रुपयाचा निधी इमारत निधी म्हणून आयफक्टोच्या सुपूर्त केला होता. **महाराष्ट्रातून या कामी सर्वात जास्त अर्थबळ उभे करुन देणारा नेता व संघटना म्हणून संभाजीराव व सुटाचाच उल्लेख करावा लागेल.**

**१७.** सबंध महाराष्ट्रात विख्यात असलेले कोल्हापूरातील डाव्या चळवळीतील एक ज्येष्ठ नेते म्हणजे कॉ. गोविंदराव पानसरे. गेली ६०-६५ वर्षे गोविंदराव महाराष्ट्रातील पुरोगामी विचारांचा झेंडा खांद्यावर घेवून महाराष्ट्राच्या राजकारणात सक्रिय आहेत. भारतीय स्वातंत्र्य आंदोलन, गोवा मुक्ती संग्राम, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ यामध्ये हिरिरीने भाग घेतलेल्या गोविंदरावांनी वयाची पंच्याहत्तरी पार केलेली. त्यांच्या कार्याचा आदर आणि सन्मान करण्यासाठी त्यांच्याशी संबंधित संघटनांनी, त्यांच्या सहकाऱ्यांनी आणि त्यांच्या असंख्य चाहत्यांनी त्यांच्या वयाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल काही पावले उचलली होती. या निमित्ताने उभ्या केलेल्या आर्थिक पाठबळातून त्यांना सन्मानित करावे आणि त्यांच्याविषयीची कृतज्ञता व्यक्त करावी असा हेतू होता. मुख्यत्वे त्यांनी आपल्या प्रकृतीची उत्तम काळजी घेण्यासाठी या निधीचा वापर करावा अशी त्यांच्या चाहत्यांची इच्छा होती. **संभाजीरावांनी संघटनेतील आपल्या सर्व सहकाऱ्यांची बैठक बोलाविली आणि या कामी जवळ जवळ १ लक्ष रुपयाचा निधी गोळा करुन समितीच्या सुपूर्त केला.** कॉ. गोविंदराव पानसरे यांच्या विचारांची डावी बाजू इतकी धारदार होती की त्यांनी वैयक्तीक पातळीवर अशा स्विकारास नकार दिला व "गेली जवळपास नव्वदहून अधिक वर्षे डाव्या चळवळीत, साम्यवादी पक्षात अनेक कार्यकर्ते निरलसपणे आपले आयुष्य वेचत आहेत. यातल्या अनेकांनी केलेल्या त्यागाची आजच्या सर्वार्थाने भ्रष्ट झालेल्या राजकारणात, समाजकारणात आणि सांस्कृतिक चळवळीत आपण कल्पनाही करू शकत नाही. त्यांच्या या कार्याची नीट नोंदही नाही. आज त्यातले बहुसंख्य हयात नाहीत. **त्या इतिहासाची नोंद होणे, जी चरित्रात्मक माहिती उपलब्ध आहे ती एकत्रित करणे आणि अधिक माहितीसाठी प्रयत्न करणे हा त्यांच्याविषयीची कृतज्ञता व्यक्त करण्याचा मार्ग तर आहेच, पण त्याहूनही येत्या पिढ्यांसाठी या प्रेरणा देणाऱ्या इतिहासाची नोंद होणे गरजेचे आहे.**" असा विचार मांडून कॉ. गोविंदराव पानसरे अमृतमहोत्सव समितीच्या मार्फत अशा अनेक पुस्तकांच्या प्रकाशनाचा प्रकल्प गोविंदरावांच्या मार्गदर्शनाने हाती घेतला गेला. विदर्भातील आदरणीय ज्येष्ठ नेते स्व. भाई सुदाम देशमुख यांच्या जीवनावर आधारित "**कॉ. सुदाम देशमुख जीवन आणि कार्य**" हे पुस्तक या मालिकेतील चौथे प्रकाशन होय. अशा प्रकारची जवळपास ५० च्या वर पुस्तके या समितीने प्रकाशित केलेली आहेत. **अशा एका चांगल्या संकल्पात सहभागी होण्याचे भाग्य त्या भागातील प्राध्यापकांना मिळाले ते श्री संभाजीरावांच्या पुढाकारानेच होय.**

**१८.१** कामगार चळवळीमध्ये तसेच शिक्षक- प्राध्यापकांच्या संघटनामध्ये काम करणाऱ्या सर्वांनाच याची माहिती आहे की प्रश्न सोडविण्याचे अनेक मार्ग असतात. चळवळी व आंदोलने हा संघर्षाचा मार्ग सर्वोत्तम मानला गेला असला तरी तो सर्वकाळीचा उपाय म्हणून सर्वोपरी वापरता येत नाही. शांततेच्या काळांत आपल्या व्यावसायिक जीवनाविषयी सहानुभूती वा ममत्व असलेल्या विधानमंडळ सदस्यांची मदत घेऊन सांसदिय आयुधांच्या माध्यमातून अशा संघटना आपले काही प्रश्न सोडवून घेतात. अर्थात अशा विधानमंडळ सदस्याने सांसदिय आयुधांचा वापर करावा म्हणून त्यासाठी आवश्यक असलेली निवेदने, तक्रारी, सहपत्रे समाविष्ट असलेली आधारभूत कागदपत्रे तयार करणाऱ्या नेत्यांची उपलब्धता यासाठी संघटनेमध्ये आवश्यक असते. शिवाय ज्या विधानमंडळ सदस्यांच्या मार्फत आपण प्रश्न मांडू इच्छितो, त्या सदस्याच्या मनामध्ये प्रश्नोक्त बाबी विषयी जिव्हाळा असावा लागतो, केवळ असा जिव्हाळा असून चालत नाही तर ते प्रश्न मांडण्याची तीव्र इच्छा त्याच्या मनामध्ये असावी लागते, अशी केवळ तीव्र इच्छा असून चालत नाही तर त्या विधानमंडळ सदस्याजवळ सांसदिय आयुधे हाताळण्याचे किमान कौशल्य असावे लागते. **वर नमूद केलेल्या बाबीपैकी एखादी गोष्ट जरी कमी असली तरी प्रश्न सोडविण्यासाठी सांसदिय आयुधांचा वापर मग तेवढा प्रभावी ठरत नाही. शांततेच्या काळामध्ये चळवळी व आंदोलनात्मक संघर्ष ज्यावेळी शक्य नसतो तसेच विधानमंडळामार्फतसुद्धा प्रश्न सुटत नाही असे वाटते त्यावेळी न्यायालयीन संघर्षाचा मार्ग समस्या सोडविण्याचा रामबाण उपाय म्हणून देशभर अनेक संघटनांनी अमलात आणल्याचे आपल्याला दिसून येईल.** या मार्गाचा वापर करावयाचा असेल तर घटना व कायद्याच्या ज्ञानाबरोबरच रस्त्यावरच्या संघर्षातून सुटू शकणारे प्रश्न कोणते? न्यायालयीन संघर्षातून सुटू शकणारे प्रश्न कोणते? यातील फरक बिनचूकपणे ओळखणाऱ्या नेत्यांची संघटनेजवळील उपलब्धता ही बाब या मार्गाच्या वापरासाठी सर्वात महत्वाची असते. सामाजिक बांधीलकी जोपासणाऱ्या व व्यावसायीक संघटनांविषयी जिव्हाळा असलेल्या तज्ञ विधिज्ञांशी असलेली जवळीक ही सुद्धा याबाबतीत खूपच महत्वाची बाब असते. अशा न्यायालयीन संघर्षासाठी लागणारा निधी ही काही आजकाल फार लहान बाब राहीलेली आहे, अशातला भाग नाही पण संघटनेचे नेतृत्व हे विश्वासपात्र असेल तर ती काही फार मोठी गोष्ट नसते.

**१८.२** संभाजीरावांनी स्वतः असे लिहून ठेवले आहे की, "**दि. १५.११.१९७५ रोजी उच्च न्यायालयाने दि. ४ ऑक्टोबर, १९७५ रोजीच्या शासन आदेशा (जी.आर.ला) च्या अंमलबजावणीस स्थगिती दिली. त्यावेळी प्रसिद्ध कामगार वकील के.टी.सुळे, ॲड. के.के. संघवी, ॲड. मदन फडणीस इत्यादींनी 'एमफक्टो' प्राध्यापक महासंघाची बाजू उच्च न्यायालयात समर्थपणे मांडली, राजकीय आणिबाणीच्या एकूण वातावरणात महाराष्ट्र शासनास प्रचंड धक्का देणारा हा स्थगितीचा निर्णय होता, यात शंका नाही**, सबंध प्राध्यापक वर्गाने तर एका मोठ्या संकटातून वाचलो म्हणून एक दीर्घ निःश्वास सोडला. महाराष्ट्रातील तीस बत्तीस हजार प्राध्यापक मनाने एकमेकाजवळ आले. **आपण सांघिक प्रयत्न केले. आणि ह्या प्रयत्नांचे नेतृत्व करणारी प्राध्यापक मंडळी समर्थ असतील, तर संकटाचा महासागरही आपण ऐक्याच्या जोरावर पार करु शकतो, याचा प्रत्यक्ष अनुभवच राज्यातील सर्व प्राध्यापकांनी घेतला, सर्व शिक्षण संस्थामधील प्राध्यापकांना आत्मविश्वास वाटू लागला.**" *(सहपत्र तीन परिच्छेद १२)*

**१८.३** या न्यायालयीन संघर्षाविषयी त्यांनी असेही नमूद केले आहे की, "**ॲड. के.टी.सुळे यांनी महाराष्ट्रातील सर्व प्राध्यापक वर्गास उच्च न्यायालयाच्या माध्यमातून एकाहून एक श्रेष्ठ दर्जाच्या सवलती मिळवून दिल्या, त्या कामात त्यांचे भाचे ॲड. मदन फडणीस यांचेही सहकार्य अभूतपूर्व लाभले, ह्या दोघा ॲडव्होकेट असणाऱ्या मामा भाच्यांनी 'एमफक्टो'या प्राध्यापक संघाच्या निम्म्याहून जादा लढाया पूर्ण यशस्वी केल्या. त्यावेळी राजकीय वातावरण आणिबाणीमुळे दहशतीचे होते.** ...... **अशा आणिबाणीने पूर्णतः ग्रासलेल्या प्रतिकुल वातावरणात ॲड सुळे व ॲड. फडणीस यांनी प्रथम दि. ४ ऑक्टोबर, १९७५ च्या शासन आदेशास स्थगिती मिळविली.** पुढे लगेच ऑक्टोबर, १९७५ व मार्च एप्रिल १९७६ च्या विद्यापीठ परीक्षांचा मेहनताना दि. ६.३.१९७६ रोजी उच्च न्यायालयातून मिळवून दिला. असा मेहनताना देण्याची शंभर वर्षाहून अधिक काळ चालत आलेली प्रथा, विद्यार्थ्यांकडून विद्यापीठांनी अगोदरच घेतलेली परीक्षा फी आणि सर्व प्राध्यापकांना परीक्षेच्या कामाचे समान वाटप करण्यातील व्यवहार्य अडीअडचणी इत्यादी मुद्यांच्या आधारे प्राध्यापकांना कायमचा मिळवून दिलेला विद्यापीठ परीक्षांच्या कामांचा मोबदला आणि त्याहूनही असे परीक्षा काम प्राध्यापकांना सक्तीचे करता येत नाही असा न्यायालयाचा निर्णय ही फार महत्वाची बाब ठरलेली आहे. **नंतरच्या एका तारखेस ॲड. सुळे साहेबांनी दि. १ जानेवारी १९७३ पासून मिळणाऱ्या रु. ७००-१६०० या नव्या वेतनश्रेणी पोटी रु. ७५० आगाऊ (ॲडव्हान्स) वाढ सर्व प्राध्यापकांना मिळवून दिली. (त्यावेळी रु. ७५० ही रक्कम प्राध्यापकांच्या दीड ते दोन महिन्यांचे वेतनाइतकी होती)**" *(सहपत्र तीन परिच्छेद १३)*

**१८.४** ॲड. के.टी. सुळे यांच्याविषयी संभाजीराव जाधव यांनी पुढील शब्दात आदरभाव व्यक्त केलेला आहे. "ॲड. के.टी. सुळे हे आपल्या व्यवसायात ज्येष्ठ ॲडव्होकेट्सपैकी एक होते. त्यांच्या व्यक्तिमत्वाचा आणि त्यांच्या केस मांडण्याच्या पद्धतीचा न्यायाधिशांवर आपोआपच गंभीर परिणाम होत असे. एका रविवारी देखील न्यायाधिशांनी ॲड. सुळेसाहेबांचे ह्या केस संदर्भातील म्हणणे ऐकण्यासाठी तारीख दिली आणि म्हणणे ऐकून घेतल्यावर निर्णयही दिला होता. तो निकाल म्हणजेच परीक्षेचा मेहनताना देण्यासंबंधीचा होय. वकिलांच्या व्यक्तिमत्वाचा न्यायाधिशांवर इतका परिणाम झाल्याची उदाहरणे अगदी दुर्मिळच होत. **अखेरीस एकदा न्यायाधिशांनी महाराष्ट्र शासनाचे त्यावेळचे शिक्षण सचिव श्री. डी.एम. सुकथनकर यांना स्पष्टपणे सांगितले. ॲड.सुळे यांनी प्राध्यापकांसाठी जे जे मांडले आहे, ते ते सर्व युजीसीच्या म्हणण्यानुसारच मांडलेले आहे. युजीसीच्या मार्गदर्शक तत्वाबाहेर जाऊन काहीही सांगितलेले नाही.** महाराष्ट्र शासनास २० टक्के रक्कम प्राध्यापकांच्या नव्या वेतनापोटी द्यावी लागत आहे. म्हणून महाराष्ट्र शासनास यूजीसी बाहेरील अटी नव्याने घालता येणार नाहीत, युजीसीचा जन्मच मुळी प्राध्यापकांच्या सेवाशर्ती व इतर बाबी संबंध देशभर समान करण्यासाठी झालेला आहे. **भारतीय लोकसभेने तसा कायदा सन १९५६ मध्ये केलेला आहे. तो शासनाने प्रथम अभ्यासावा. सद्यपरिस्थितीत म्हणजे आणिबाणीच्या काळात शासनाने 'एमफक्टो'या प्राध्यापक महासंघाबरोबर तातडीने चर्चा करावी आणि तडजोड घडवून आणावी, अन्यथा ह्या याचिकेचा निकाल आजच लागल्यासारखा आहे**, असे स्पष्टपणे महाराष्ट्र शासनास सुनावले. **त्यामुळे शासनास आपण केलेल्या गंभीर चुका ध्यानात आल्या आणि म्हणून शासनाने दि. ६.९.१९७६ रोजी 'एमफक्टो'बरोबर बोलणी करण्याचे मान्य केले आणि याचिकेचे कामकाज स्थगित ठेवले गेले**, 'एमफक्टो' या प्राध्यापक संघटनेने मिळविलेले हे एक अपूर्व यश होते, ह्यात शंकाच नाही."

**१८.५** संभाजीरावांचा सुरूवातीपासूनच या न्यायालयीन संघर्षाशी संबंध आला. त्यांनी जे लिहून ठेवले आहे ते काळजीपूर्वक वाचल्यास संघटनेचा नेता व या संघर्षातील विधीसहाय्य करणारा संघटनेचा विधिज्ञ यांना परस्पराविषयी वाटणारा जिव्हाळा, स्नेहबंध व मुख्य म्हणजे विश्वास किती मोठ्या प्रमाणात आमच्या संघटनेला सुरुवातीपासून उपलब्ध होता हे यावरुन दिसून येते. "**ॲड सुळे आणि ॲड. मदन फडणीस यांची ह्या कामातील कामगिरी केवळ शब्दातीत अशीच मानावी लागते, दोघांनीही आपले काम विनामोबदला केले, हे तर**

**आणखी शब्दातीत आहे, ह्यात कसलीच शंका नाही! महाराष्ट्रातील प्राध्यापकांवरील ह्या दोघांचे ऋण कधी फिटणार देखील नाही, अशा कायम स्वरूपाचे ते आहे."** असे संभाजीरावांनीच लिहून ठेवलेले आहे. (सहपत्र तीन : परिच्छेद १४) पुढे सारे स्थिरस्थावर झाल्यावर संभाजीरावांनी आपल्या सहकाऱ्यांना याची कल्पना दिली. ॲड. मदन फडणीस यांना अगत्यपूर्वक कोल्हापूरला सहकुटुंब बोलाविले. आपल्या संघटनेच्या प्रमुख नेत्यांची एक बैठक आयोजित केली. **ॲड. मदन फडणीस यांच्या सन्मानार्थ भोजन समारंभाचे आयोजन केले व एका लहानशा समारंभात जवळ जवळ एक लक्ष रुपयाचा 'मेहनताना निधी" ॲड. मदन फडणीस यांना समारंभपूर्वक प्रदान केला.**

**१८.६** "सिनिअर स्केल व सिलेक्शन"ग्रेडमध्ये स्थाननिश्चिती करतांना शारीरिक शिक्षक व ग्रंथपाल यांची पूर्वीची सर्व सेवा धरण्याचे आदेश उपसचिवांच्या सहिने ६.१.१९९० रोजी निघाले होते. त्याप्रमाणे त्यांची सर्व सेवा धरुन स्थाननिश्चिती करण्यात आली. **पुढे वर्षा दोन वर्षांनी यांची सर्व सेवा धरलीच कशी?** असा प्रश्न मंत्रालयातील एका "बोहा (सहा) रिया"ने निर्माण केला. नवे आदेश निघाले. "रिकव्हरी करा" असे फर्मान सुटले. सबंध महाराष्ट्रभर खळबळ माजली. संभाजीरावांनी सुटाच्या क्षेत्रातून अशा सर्व शिक्षकांना एकत्र केले, धीर दिला. उच्च न्यायालयात ५५९ ऑफ १९९५ ही याचिका दाखल झाली. " Shivaji Eknathrao Jagtap R/O Plot No. 1 B-2 Bapuji Salunkhe Nagar, Post Bhindiwadi Satara, District Satara, Maharashtra Petitioner ***Versus*** State of Maharashtra Through its Principal Secretary Higher & Technical Education Deptt. Mantralaya Mumbai-32 Maharashtra Respondent" हे यामध्ये वादी व प्रतिवादी होते. **या प्रकरणात स्थगनादेश मिळाला. स्थगनादेश एकदा येथे मिळाल्यामुळे पुढे तो धडाधड अनेक ठिकाणी अनेकांना मिळाला. रिकव्हरी थांबली. 'स्टेटस्को' कायम राहीला. पुढे मा. उच्च न्यायालयाने दिनांक ५ जुलै २००४ रोजी शिक्षकांच्या बाजूने अंतिम निर्णय दिला.** उपसचिवांने सर्व सेवा धरावी असा आदेश काढावयाचा, त्याप्रमाणे सर्व सेवा धरून स्थाननिश्चिती करावयाची, पुढे २-३ वर्षाने सेवा धरू नका असे सचिवांनी म्हणायचे हे बरोबर नाही. मा. उच्च न्यायालयाने उपसचिवांचे मुळ आदेश कायम ठेवले. "राज्यशासनाच्या उपसचिवाने काढलेल्या ६.१.१९९० च्या आदेशाला, तसेच मा. उच्च न्यायालयाच्या ५ जुलै २००४ च्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाने, एकतर्फी, स्थगनादेश द्यावा" अशी विनंती करणारी एक याचिका (Special Leave petition (Civil) No. 2841 of 2006) राज्य शासनाने सर्वोच्च न्यायालयात २३ जानेवारी २००६ रोजी दाखल केली होती. **आपल्याच उपसचिवाचे आदेश स्थगित करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात धाव घेण्याची नामुष्की राज्यशासनावर आली होती.** सर्वोच्च न्यायालयातील मा. न्यायमुर्ती डॉ. ए.आर.लक्ष्मणन व अल्तमश कबिर यांच्या खंडपिठाने "State of Maharashtra & ANR. .......*Petitioner(s)* ***Versus*** Shivaji Eknathrao Jagtap &Ors. ...... *Respondent(s)* " या प्रकरणातील "Review petition (C) No(s). 251 of 2007 in SLP (C) No. 18832/2006 " ही महाराष्ट्र शासनाची पूनर्विलोकन याचिका १५ मार्च २००७ रोजी फेटाळून लावली. ती पुढील शब्दात :- "**Review petitions are dismissed."** **'इतर शिक्षक' व 'शारीरिक शिक्षक व ग्रंथपाल' यांच्याबाबतीत चौथ्या वेतन आयोगाच्या वेळी स्थापित झालेली वेतन संरचनेची समतुल्यता, पाचव्या वेतन आयोगाच्या वेळी संपूर्ण देशभर पूर्णपणे ढासळली असतांना महाराष्ट्रात या समतुल्यतेच्या बुरुजाची एकही वीट इकडची तिकडे सरकली नाही. याचे श्रेय या न्यायालयीन संघर्षाला आहे. या संघर्षामध्ये संभाजीराव जाधवांच्या नेतृत्वाखाली 'सुटा'ने केलेली कामगीरी निश्चितच गौरवास्पद आहे.** हे न्यायालयीन प्रकरण चालु असतांना 'टायपिंग खर्च' म्हणून व अल्पसा मेहनतांना म्हणून आपल्या वकिलांना काय अल्पशी रक्कम दिली असेल तेवढीच. पण पुढे सारे स्थिरस्थावर झाल्यावर संभाजीरावांनी आपल्या सहकाऱ्यांना याची कल्पना दिली. ॲड. मदन फडणीस यांना पुन्हा दुसऱ्यांदा अगत्यपूर्वक सहकुटूंब कोल्हापूरला बोलाविले. आपल्या संघटनेच्या प्रमुख नेत्यांची एक बैठक आयोजित केली. ॲड. मदन फडणीस यांच्या सन्मानार्थ भोजन समारंभाचे आयोजन केले व एका लहानशा समारंभात जवळ जवळ एक लक्ष रुपयांचा 'मेहनताना निधी" ॲड. मदन फडणीस यांना समारंभपूर्वक दुसऱ्यावेळी प्रदान केला.

**१८.७** 'सिलेक्शन ग्रेड'मध्ये ५ वर्षाची सेवा पूर्ण केलेल्या प्राध्यापकांला रुपये १४९४० च्या टप्प्यावर वेतन निश्चिती दिली जावी, अशी तरतुद होती. त्याप्रमाणे महाराष्ट्रात सुरळीत सुरू होते. पुढे **"१ जानेवारी १९९६ रोजी सिलेक्शन ग्रेडमध्ये स्थानापन्न असलेल्या अधिव्याख्यात्यालाच ही सुविधा आहे. १ जानेवारी १९९६ नंतर ज्याला सिलेक्शन ग्रेड मिळाली असेल त्याला ही सुविधा लागू होणार नाही"** असे आदेश महाराष्ट्रात निघाले. काही ठिकाणी 'रिकव्हरी' काढण्याचा प्रयत्न सुरु झाला. नवीन लोकांना ही वेतननिश्चिती देणे बंद झाले. केरळच्या मंत्रालयातील एका 'बोहा (सहा) रिया'ने तेथे तसेच आदेश काढले. केरळमधील अनेक प्राध्यापक उच्च न्यायालयात गेले. तेथील उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने प्राध्यापकांच्या बाजूने निर्णय दिला. महाराष्ट्रातील 'बोहा (सहा) रिया' मात्र ऐकायला तयारच नव्हते. सुटाच्या कार्यक्षेत्रातील अशा सर्व शिक्षकांना संभाजीराव जाधवांनी एकत्र केले व त्यासाठीचा न्यायालयीन संघर्ष उभा केला. "IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY CIVIL APPELLATE JURISDICTION : WRIT PETITION NO.3324/2010" या प्रकरणातील याचिका त्यातून उभी राहिली. "SHIVAJI UNIVERSITY TEACHERS ASSOCIATION and Ors. Petitioners ***VS.*** The University Grants Commission and Ors. " हे यामध्ये वादी व प्रतिवादी होते. ८ एप्रिल २०११ रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपिठाने याबावतीत " Accordingly, we dispose of this petition on the same terms as in the case of University Grants Commission Vs. B. J. Vincent,Muttikkal House,Sakthi and Ors. in W.A.No.1394/ 2008 and companion matters(Kerala Highcourt at Kenakulam) . In other words the Writ Petition is made absolute in terms of prayer clause (a) and (b) with no order as to costs." असा निर्णय दिला. रिकव्हऱ्या थांबल्या, ज्यांना दिले नसेल त्यांना द्या. असे आदेश न्यायालयाने दिले. **कोल्हापूरच्या मंडळींनी एकदा हा आदेश मिळविल्यावर धडाधड अनेक ठिकाणी तत्सम आदेश न्यायालयातून मिळविले गेले. हा न्यायालयीन संघर्ष सुटाच्या नेतृत्वाखाली व संभाजीरावांच्या पुढाकाराने उभा झाला पण त्यानंतर पुढे महाराष्ट्रातील सर्व प्राध्यापक त्यातून लाभान्वित झाले.**

**१८.८ महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या संघर्षाने खचाखच भरलेल्या गेल्या ३०-४० वर्षाच्या इतिहासात "न्यायालयीन संघर्ष" या आयुधांचा वापर करणाऱ्या नेत्यांची "गुणप्रदान करण्याच्या पद्धतीने गुणवत्ता यादी" तयार केली तर त्या यादीमध्ये संभाजीराव जाधवांचा प्रथम क्रमांक लागेल हे निःसंशय होय.**

**१९.१** संभाजीरावांच्या सोबत एखाद्या समितीवर काम करणे हा एक मोठाच विलोभनीय अनुभव असायचा. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे प्रतिनीधी म्हणून दोन राज्यस्तरीय समित्यांवर काम करण्याची आम्हा दोघांना संधी मिळाली होती. संघटनेची भूमिका मांडतांना अनेकदा तेच तेच मुद्दे रटाळ पद्धतीने काही लोक मांडत असतात. ऐकणाऱ्यालाही कंटाळा येतो व बोलणारा सुद्धा कंटाळा न करता कर्तव्य म्हणून बोलत आहे असे वाटत राहते. याउलट मुद्दा तोच असला तरी अतिशय मेहनतीने अभ्यास करून नवी आकडेवारी, नवे संदर्भ, नवे पुरावे, नवी उदाहरणे, ठावूक नसलेले न्यायालयांचे संबंधित निर्णय, इतर राज्यातले कायदेकानून, याची अशी काही बरसात त्या समितीत केली जात असे की ते म्हणणे प्रतिपक्षाला मान्य करावेच लागत असे. "**पूर्ण अभ्यास करून आपली बाजू मांडली, तर ऐकणाऱ्या समोरच्या माणसास - मग तो कुलपती, कुलगुरू, मंत्री, सचिव वा संचालक असो - वाटू लागते की, बोलणाऱ्या व्यक्तीने आपल्यापेक्षा जादा विचार केलेला आहे आणि त्याचे म्हणणे मान्य करणे भाग आहे. एवढी आपली सर्व बाजूंनी तयारी (इक्विपमेंट) व्हावयास हवी आहे. तरच, प्राध्यापक संघटनेचे प्रश्न सुटतील आणि त्यांच्या संघटनेचे कार्य उठावदारपणे दिसू लागेल. अशा अभ्यासाला अन्य कसलाही पर्याय नाही, हे सतत ध्यानात ठेवले पाहिजे.**" हे त्यांनीच लिहून ठेवले आहे. (सहपत्र एक परिच्छेद ९) हे उदाहरणासह स्पष्ट करा असे म्हटले तर संभाजीरावांचाच उदाहरण म्हणून उपयोग करावा लागेल.

**१९.२** संघटनेशी झालेल्या मतैक्य पत्रात मान्य झाल्यामुळे २५ मे, १९७७ रोजी "Constitution of a Committee for formulation of a scheme to ensure prompt and full payment by the College Managements of the due salaries and allowances of the Teaching and non-Teaching Staff in Non-Government affiliated Colleges in Maharashtra." या मथळ्याच्या शासन निर्णयाप्रमाणे एक राज्यस्तरीय समिती शासनाने नेमली होती. अकरा सदस्यांच्या या समितीचे अध्यक्ष संचालक, उच्च शिक्षण हे स्वतः होते व या अकरामध्ये सर्वश्री. बी.टी.देशमुख, संभाजीराव जाधव, श्रीमती नलीनीताई तारळेकर व श्री वसंत पुजारी असे आम्ही चार महासंघाचे प्रतिनिधी म्हणून या समितीवर होतो. "अनुदानाचे नविन सुत्र शासनाच्या विचाराधीन आहे. ते नवे सुत्र शासन जोवर मान्य करत नाही तोवर सॅलरी स्किम वगैरे आपल्याला काही करता येणार नाही." अशी उच्च शिक्षण संचालकांची मांडणी होती. त्यावर जबर संघर्ष करून उपयुक्त शब्दरचनेचा एक मसुदा आम्ही सूचविला. तो पुढील प्रमाणे:-

"Pending the revision of the existing grant-in-aid formula the shortfalls in the Salary Account under the scheme will have to be made good so as to bridge the gap and enable colleges to meet their annual expenditure on salaries and allowances of their employees over the year fully and regularly."

**१९.३** मसुदा समितीला तो मान्य करावा लागला. तो तसाच्या तसा समितीच्या अहवालांत परिच्छेद ६ मध्ये असलेला आपल्यास आजही दिसून येईल. पुढे मोठ्या आंदोलनानंतर सॅलरी स्कीमचा शासननिर्णय निघाला. त्या शासननिर्णयाचा पाया समितीच्या या अहवालाच्या उपरोक्त परिच्छेदात आहे हे कोणाच्याही सहज लक्षात येईल. समितीच्या कामात संघटनेला यश मिळवावयाचे असेल तर निदान काही प्रतिनिधींच्या अंगी 'मसुदाकारी' हा गुण असला पाहिजे व दुसरे म्हणजे किमान भाषाप्रभूत्व त्यांच्या गाठीशी असले पाहिजे. संभाजीराव जाधवांच्या पदरी हे दोनही गुण विपूल प्रमाणामध्ये असल्यामुळे संघटना अनेक अंगानी लाभान्वित झाली. त्यांनी स्वतःच असे लिहून ठेवले आहे की "**कोणी कोणते मुद्दे मांडावयाचे हे देखील अगोदर बैठकीत ठरवून शासनाबरोबर चर्चा करावी लागते व अखेरीस करारही करावे लागतात. त्यामुळे असे संघटना प्रतिनिधी अभ्यासू, प्रगल्भ जाणिवेचे असावे लागतात, तसेच एखादा मुद्दा एकंदर राष्ट्रीय अथवा जागतिक पातळीवरून मांडावा लागत असल्यामुळे त्यांना खूप वाचन, अभ्यास व तयारी करावी लागते. करारांचे प्रारूप (ड्रॉफ्टस) तयार करण्याची सवय व सराव असणारे हे प्रतिनिधी असतात, असे हे प्रतिनिधी प्राध्यापक संघटनेचा एक अमूल्य ठेवा ठरतात, यात शंकाच नाही. ते तसे एमफक्टोच्या प्रारंभापासून आजपर्यंत सतत लाभले, हे ह्या संघटनेच्या भाग्याचे लक्षण आहे**" *(सहपत्र ३ परिच्छेद २३)* संभाजीरावांचे उपरोक्त विधान सोदाहरण स्पष्ट करा असे कोणी म्हटले तर संभाजीरावांनाच उदाहरण म्हणून पुढे करावे लागेल.

**१९.४** दिनांक २८ जुलै रोजी मा. शिक्षण मंत्री व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे कार्यकारी मंडळ यांच्यात चर्चा झाली. या चर्चेमध्ये काही बाबीवर मतैक्य झाले. शासनाचे उपसचिव श्री.व्ही.ए.पंडीत यांनी २९ जुलै १९८६ रोजी पत्र लिहून "Minutes of the discussions that are held by the Minister (Education) with the representatives of the MFUCTO on 28th July 1986 to discuss their demands." या मथळ्याचे कार्यवृत्त संघटनेकडे पाठविले. त्यात पाचव्या क्रमांकावर संघटनेने मांडलेला मुद्दा पुढील प्रमाणे होता. "**POINT RAISED** (E) : The question of protection in service to teachers of various categories who suffer from insecurity as a result of being rendered surplus, reduction in workload, closure of subject, class, faculty, etc. etc." या मुद्यावर शासनाशी झालेले मतैक्य पुढील प्रमाणे नोंदविले होतेः- "**AGREEMENT** (E) : A Five-Member Committee consisting of 2 Govt. Officers, 1 Representative of University and 2 Representatives of the MFUCTO will be set up to examine and recommend upon all the problems arising out of insecurity of service and any anomalics. This Committee will finalize its report within 2 months and Govt. will take suitable decisions within a further period of 2 months."

**१९.५ दोन महिन्यात समितीने अहवाल द्यावा व त्यानंतर दोन महिन्यात शासन त्या अहवालावरील कारवाई पूर्ण करील असे ठरले असतांना त्यानंतर वर्षभर त्यावर समिती नेमण्याची कारवाई सुद्धा पूर्ण झाली नाही.** त्यामुळे पुढे तणाव वाढत गेला. सप्टेंबर १९८७ च्या शेवटच्या आठवड्यात काम बंद आंदोलन सुरु करण्याचा निर्णय महासंघाने घेतला. २३.०९.१९८७ रोजी मा. शिक्षण मंत्र्यांशी चर्चा झाली. सचिवांच्या सहिने मंत्रिमहोदयानी दिलेली आश्वासने समाविष्ट असलेले एक विवरणपत्र महासंघाला त्या दिवशी देण्यात आले. त्यातील ५ वा मुद्दा पुढील प्रमाणे होता. "**5. Implementation of Agreement of 29.7.1986. :** Government would expeditiously implement the un-implemented parts of the Agreement dated 29.7.1986. However, 5-members Committee as contemplated in item 1(E) of Agreement dated 29.7.1986 would be constituted within 3 weeks of withdrawal of strike."

**१९.६** त्याप्रमाणे पुढे १५.१०.१९८७ च्या शासन आदेशान्वये पाच सदस्य समिती स्थापन करण्यात आली. यात दोन शासकीय अधिकारी, एक (एका) विद्यापीठाचे कुलसचिव व महासंघातर्फे प्रा.बी.टी.देशमुख व प्रा. संभाजीराव जाधव असे आम्ही दोघे प्रतिनिधी होतो. उच्च शिक्षण संचालक या समितीचे निमंत्रक होते. ६ नोव्हेंबर १९८७ पासून तर २४ नोव्हेंबर १९८८ पर्यंतच्या काळात समितीच्या १४ बैठकी झाल्या व त्यानंतर "कृषीतर विद्यापीठे व त्यांना संलग्नित अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान व शिक्षण महाविद्यालयांतील शिक्षकांना सेवेमध्ये संरक्षण देण्याच्या दृष्टीने अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या पाच सदस्य समितीचा अहवाल." या मथळ्याचा अहवाल शासनाला सादर करण्यात आला. मुळ प्रश्नाबाबत तपशिलवार कारण मिमांसा नमूद करून या अहवालाच्या परिच्छेद १२ मध्ये समितीने पुढील प्रमाणे शिफारस केली होती. :-

"निर्बाध रिक्त (Substantive Post) (सबस्टँटिव्ह पोस्ट) पदावर काम करीत असलेल्या आणि त्या पदावर एकूण दोन वर्षे सेवा झालेल्या शिक्षकांना कायम किंवा मानीव कायम समजले जावे (डीम्डकन्फर्मड्) आणि अशा प्रकारचा शिक्षक अतिरिक्त होत असेल तर, अशा अतिरिक्त शिक्षकांची यादी विद्यापीठीय पातळीवर तयार ठेवली जावी आणि कोणत्याही महाविद्यालयामध्ये त्या विषयाची जागा भरावयाची असल्यास अशा अतिरिक्त शिक्षकाला त्या जागेवर सामावून घेतले जावे. विद्यापीठ कायद्यांमध्ये करावयाच्या दुरूस्तीचे प्रारूप पुढीलप्रमाणे असावे, असे समितीला वाटते.:-

"The Management shall before proceeding to fill in such vacancies in accordance with the prescribed procedure shall ascertain from the University whether there is any suitable person available on the list of Surplus persons maintained by the University for absorbtion in other colleges and in the event of such person being available the Management shall appoint that person."

कायद्यांमध्ये उपरोक्त तरतुद समाविष्ट करीत असताना काही अनुषंगिक तरतुदीसुद्धा त्या सोबत कायद्यामध्ये अंतर्भुत कराव्या लागतील असे समितीला वाटते."

**१९.७** या अहवालावर पुढे दोन चार वर्षे काहीच कारवाई झाली नाही. पण १९९४ चा विद्यापीठ कायदा तयार होत असतांना "उभय सभागृहाच्या संयुक्त चिकित्सा समिती"वर विधानपरिषदेने माझी एक सदस्य म्हणून नेमणूक केली होती. त्या समितीत काम करतांना मला उपरोक्त अहवालाचा खूपच उपयोग झाला. आज १९९४ च्या विद्यापीठ कायद्याचा खंड ७९(४) मध्ये पुढील प्रमाणे तुरतुद आहे. :-

"The management of any affiliated college, shall before proceeding to fill in vacancies of teachers and other employees in accordance with the prescribed procedure shall ascertain from the university and the Director of Higher Education whether there is any suitable person available on the list of surplus persons maintained by the university for absorption in other colleges and in the event of such person being available the management shall appoint that person."

**१९.८** १९९४ च्या कायद्यात ही तरतुद आल्यामुळे सेवेला संरक्षण प्राप्त झाल्याचा हा जो कळस सेवा सुरक्षिततेच्या मंदिरावर उभारलेला दिसतो त्या मंदिराचा 'पाया' भरण्याचे काम उपरोक्त अहवालाने केले व त्यामध्ये संभाजीरावांचा सहभाग अत्यंत मोलाचा होता. संघटनेच्या कितीतरी समित्यांवर संभाजीराव यांनी काम केले. त्याचे सर्व तपशील, अतिशय महत्वपूर्ण असले तरी, आज नमुद करणे शक्य नाही. दोन अतिशय महत्वाच्या राज्यस्तरीय समित्यांवर त्यांनी केलेल्या कामाचा मी निकटचा साक्षीदार असल्याने ती माहिती वर थोडक्यात नमूद केली आहे.

**२०.१** प्रा. पुरुषोत्तम शेठ यांनी त्यांच्या लेखामध्ये "**असा हा माझा विद्यार्थीदशेपासूनचा मित्र संघटनेच्या बांधणीतला, आमचा सहकारी अतीश्रमाने गेला.**" असे त्यांच्याविषयी लिहिले आहे. आज गेली अनेक वर्षे हे मी पहात आहे. गेल्या दोन वर्षात संघटनेसाठी त्यांनी उपसलेले कष्ट व केलेले श्रम चटकन डोळ्यासमोर येतात व मन भरून येते. ४४ दिवसाच्या संपकाळामध्ये केंव्हाही फोन केला की "मी आता साताऱ्याला निघालो आहे. साताऱ्याची सभा आटोपल्यावर पुन्हा फोन करतो." दोन चार दिवसांनी पुन्हा फोन केला की, "मी सांगलीची सभा आटोपून आताच कोल्हापूरला परत आलेलो आहे. **लोकांचा 'रिस्पॉन्स' चांगला आहे. शासन एकतर्फी पत्र देऊन संघटनेची बोळवण करीत आहे. याचा लोकांना राग आहे. लोक म्हणतात 'ॲग्रिमेंट' झाल्याशिवाय मागे हटू नका**" नंतर केंव्हातरी त्यांचाच फोन येणार "आमची कोल्हापूरातील सभा

चांगली झाली. परवा सोलापूरला जाण्याचा विचार आहे. नवा शासन निर्णय काही लोकांना वेबसाईटवरुन मिळालेला आहे. त्यामुळे लोक संतप्त झालेले आहेत. **नेटसेटग्रस्त प्राध्यापकांच्या मध्ये थोडीशी घबराट निर्माण झालेली आहे.** "या नविन शासन निर्णयामुळे सहाव्या वेतन आयोगातील कोणतीच वेतनश्रेणी आपल्याला मिळणार नाही" अशी भावना त्यांच्या मनामध्ये निर्माण झाली आहे. "सिनियर स्केल, सिलेक्शन ग्रेड ही नंतरची गोष्ट आहे. पण आमच्या सध्याच्या वेतनश्रेणीशी सहाव्या वेतन आयोगातील समतुल्य वेतनश्रेणी आम्हाला निश्चितपणे मिळाली पाहिजे. यासाठी संघटनेने ठाम रहावे." असा विचार काही नेटसेटग्रस्तांनी आजच्या आमच्या सभेत मांडला. "संघटना ठामपणे तुमच्या सोबत आहे." असे मी त्यांना सांगितले. मुद्दाम तुमच्या कानावर असावे म्हणून तुम्हाला फोन केला." एक नव्हे अनेक, सतत दौरे, सतत सभा, सतत श्रम व परिश्रम.

**२०.२** सन २००९ मधील आंदोलन सुरु झाल्यानंतरच्या पहिल्या आठ दहा दिवसातील गोष्ट. "प्रधान सचिवांनी उद्या बैठक बोलविली आहे." असा निरोप अगोदरच्या दिवशी माझ्या मुंबईतील सहकाऱ्यांनी फोनवरुन मला सांगितला. मी त्यांना म्हणालो "प्रधान सचिवांची ही काय पद्धती आहे? साऱ्या महाराष्ट्रातून प्रतिनिधी उद्या कसे पोचू शकतील? मी काही उद्याच्या बैठकीला येणार नाही. त्यांना आंदोलन सुरु झालेले आहे याचे काहीच गांभिर्य दिसत नाही." अर्ध्या तासाने कोल्हापूरहून संभाजीरावांचा मला फोन आला. "**प्रधान सचिवांची कृति गांभिर्य त्यांना कळलेले नाही असे दाखविणारी आहे. हे तुमचे म्हणणे बरोबर आहे. पण ते चर्चेला बोलावताहेत व आपण चर्चेला जात नाही असा 'मेसेज' जाता कामा नये. आंदोलनकर्त्यांच्या मनोधैर्यावर त्याचा विपरित परिणाम होतो.** शिवाय समाजात सुद्धा आपण चर्चेला नकार देत आहोत अशी भावना निर्माण होते. शिवाय 'निगोशिएटींग टीम'मधील कोणीही एक सदस्य अनुपस्थित असेल तर आपल्या "मांडणीचा घाट" बिघडतो. मला रेल्वेचे रिझर्व्हेशन मिळालेले नाही. पण सायंकाळच्या 'बस'चे तिकिट आताच कन्फर्म झाले आहे. सकाळी ५ वाजेपर्यंत पोचतो. ९ वाजता 'मॅजेस्टिक'ला आपण बसू" मी निमुटपणे 'होय' म्हणालो व डॉ.प्रविण रघुवंशी यांना फोन करून आम्ही दोघांनीही सांयकाळची मुंबईकडे जाणारी गाडी धरली.

**२०.३** प्रा. सुधाकर मानकर यांच्या लेखामध्ये आलेला संभाजीरावांबद्दल "प्राध्यापकांचा संप सुरु असतांना शासनाशी चर्चा करण्याचे अनेक प्रसंग आलेत. ३-४ तास चर्चा चालत असूनही योग्य मतैक्य होत नसायचे. काहीवेळा रात्री १०-११ वाजता चर्चेसाठी जाण्याचा प्रसंग येत असे तर काहीवेळा चर्चेसाठी वेळ देऊनही मंत्री महोदय ४-५ तास उशिराने येत असायचे. अशावेळी चर्चेला जाऊ या, अशी त्यांची भूमिका असायची. एम्फक्टोच्या सदस्यांची नाराजी असतानाही चर्चा टाळू नये ही त्यांची भूमिका सकारात्मक दृष्टीकोनच दर्शविते. दोन पक्षांमध्ये संवाद होणे आवश्यक आहे. त्याद्वारेच प्रश्न सुटतात असा त्यांचा ठाम विश्वास होता. म्हणूनच चर्चेची दारे बंद करु नका, असे त्यांचे मत होते." आलेला हा उल्लेख संभाजीरावांच्या विचारांचे यथार्थ दर्शन घडविणारा आहे व त्यांच्या त्या विचाराने संघटना दरवेळी बहूबाजूने लाभान्वित झालेली आहे.

**२०.४** नेटसेटचा प्रश्न त्यांच्या मनाला खूपच लागलेला होता. "२ ऑगस्ट २०१० च्या दिल्ली येथील धरणे आंदोलनाला व २ डिसेंबर २०१० च्या दिल्ली येथील निदर्शनांच्या कार्यक्रमाला ते स्वतः जातीने हजर होते. २ मार्च ते ५ मार्च या "तीन दिवसाच्या धरणे आंदोलनांत" ते सहभागी होते. प्रत्येक वेळी गेलेल्या डेलीगेशनमध्ये ते सहभागी होते. १० जून २०११ रोजी केंद्रीय शिक्षणमंत्र्यांना भेटायला जाणाऱ्या महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या शिष्टमंडळासोबत येण्याचे त्यांनी मान्य केले होते." हे सर्व उल्लेख महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने १० जुलै २०११ रोजी सम्मत केलेल्या शोक प्रस्तावात नमुद आहेत. *(सहपत्र : ५)*

**२०.५** दिनांक २ ते ५ मार्च या दिल्लीच्या ३ दिवसाच्या मुक्कामात ते मला म्हणाले. "बी.टी. नेटसेटग्रस्त प्राध्यापकांच्या एका सभेला तुम्ही चार पाच वर्षापूर्वी एकदा आमच्या भागात येवून गेलात. त्यानंतर पुन्हा तुम्ही त्या भागात आला नाहीत. २-३ दिवसाच्या, किमान २ दिवसाच्या मुक्कामाने तुम्ही या! एक तुमची सभा ठेवू, एक दिवस निवांत गप्पा होतील." मी ती गोष्ट मान्य केली. दिल्लीच्या या मुक्कामातच २४ व २५ एप्रिल ही तारीख ठरली. २४ एप्रिल २०११ रोजी सकाळी मी सांगलीला पोचलो. त्यादिवशी दुपारी ३.०० वाजता सांगली येथे ठरल्याप्रमाणे सुटाच्या सभेमध्ये माझे व्याख्यान झाले. ते स्वतः अध्यक्षस्थानी होते. माझ्या भाषणानंतर अध्यक्ष या नात्याने त्यांचे भाषण झाले. सुटाचे माजी अध्यक्ष श्री.एस.जी.पाटील यांच्या मित्राच्या पन्हाळा येथील एका फॉर्महाऊसवर आम्ही रात्रौ मुक्कामाला पोचलो. श्री.एस.जी.पाटील हेही सोबत होते. २५ एप्रिलला सकाळच्या चर्चेत त्यांनी "**युजीसी रेग्युलेशनचा कायदेशीर दर्जा**" हा विषय काढला. बराच वेळ चर्चा झाली. त्याची माहिती पुढील परिच्छेदात दिलेली आहे. २५ एप्रिलला रात्री कोल्हापूर येथील त्यांच्या निवासस्थानी जेवणाचा कार्यक्रम त्यांनी ठेवला होता.

**२०.६** दिनांक २५ एप्रिल रोजी रात्रौ महालक्ष्मी एक्सप्रेसने मी मुंबईसाठी परत निघणार जेवण झाल्यावर ताबडतोबच कपडे चढवून रेल्वे स्टेशनवर मला सोडण्यासाठी श्री. संभाजीराव तयार झाले. सांगलीच्या सभेमध्ये त्यांचे भाषण ऐकतांना, पन्हाळ्याच्या संपूर्ण मुक्कामामध्ये, संभाजीराव मला थकल्यासारखे वाटत होते. जेवण झाल्यावर निघतांना त्यांच्या चेहऱ्यावर हा थकवा मला एकदम खूप जाणवत होता. सोबत सुटाचे माजी अध्यक्ष श्री.एस.जी.पाटील, प्रा.सुधाकर मानकर, प्रा.आर.डी.धमकले हे होते. या सर्वांच्या समक्ष त्यांच्या निवासस्थानीच मी त्यांना म्हणालो. "संभाजीराव! तुम्ही खूप थकलेले दिसता, तेंव्हा तुम्ही आता आराम करा, स्टेशनवर येण्याची आवश्यकता नाही. हे लोक मला स्टेशनवर सोडतील" सोबत असलेल्या या तीन सहकाऱ्यांनीसुद्धा त्यांना तशीच विनंती केली. ती त्यांनी मान्य केली. मला या तिघांनी स्टेशनवर सोडले. मे महिनाभर त्यांची प्रकृती पाहिजे तशी जाग्यावर आली नाही. २७ मे रोजी त्यांना 'अपेक्स हॉस्पीटल'मध्ये दाखल करावे लागले. तेथे ते ५ जूनपर्यंत होते.

**२०.७** खुद्द महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या शोकप्रस्तावात "In fact, in the recent meeting that took place on 10th June 2011 with the Union HRD Minister Shri Kapil Sibal and with the UGC Secretary, he was to remain present in New Delhi. However, a few days prior to that he took ill and was advised complete rest that prevented him from attending the meeting." १० जुन २०११ रोजी दिल्लीला आमची केंद्रीय शिक्षणमंत्र्यांशी नेटसेटच्या प्रश्नावर भेट ठरलेली होती. प्रा. सदाशिवन व मी दिल्लीला एकाच खोलीमध्ये थांबलो होतो. सकाळी मला राहवले नाही. मी दिल्लीवरून संभाजीराव जाधवांच्या कोल्हापूर निवासस्थानी फोन लावला. फोन त्यांच्या मुलीनी उचलला. मी म्हणालो "मी बी.टी.देशमुख, दिल्लीवरून बोलत आहे. संभाजीरावांची प्रकृती कशी आहे?" त्यांच्या मुलीनी सांगितले "काका! बाबाची प्रकृती आता चांगली आहे. त्यांना ५ तारखेलाच घरी आणले आहे. ते आराम करीत आहेत. देवू कां त्यांना फोन? तुमचा फोन आहे म्हटल्यावर त्यांना आनंद वाटेल." मी म्हणालो "नको नको, त्यांना फोन देऊ नकोस. ते मला नेटसेटच सारच विचारतील. त्यांना आरामाची आवश्यकता आहे. ते घरी आलेत त्यांची प्रकृती उत्तम आहे ही आनंदाची गोष्ट आहे. मी नंतर शांततेने फोन करीन" दुसऱ्या दिवशी ११ जुन रोजी त्यांना पून्हा अॅपेक्स हॉस्पीटलमध्ये भरती करावे लागले. १५ जून २०११ रोजी त्यांनी इहलोकाची आपली यात्रा संपविली.

**२०.८** सबंध आयुष्य किर्तनाच्या माध्यमातून समाज प्रबोधनात घालविलेल्या संत गाडगे महाराजांची प्रकृती बरी नसतांना त्यांनी आयुष्यातले शेवटचे किर्तन मुंबईच्या वांद्रा पोलीस स्टेशनच्या आवारात "पोलीस मंडळी"च्या विनंतीवरून केले होते. त्याची ध्वनिमुद्रीत प्रत उपलब्ध आहे. त्यात ते म्हणतात. "किर्तन आटपल! माझं हे शेवटच किर्तन आहे. आता इथून जाव लागीन, माही तब्येत बरी नाही. संध्याकाळपासून पडून होतो. आखीन कोनत किर्तन असत तर नसतो गेलो. हे किर्तन आहे पोलीस मंडळीचं. एवढ्या लोकांइच मले दर्शन झाल. पडलो असतो. पण माझ्या मुखानं देवाच नाव घ्यायला लावल हे आमच्या पोलीस मंडळीचे उपकार आहेत. किर्तन आटोपल."

**२०.९** सांगलीला मराठा मंडळाच्या सभागृहात माझ्या व्याख्यानाच्या सभेत अध्यक्ष या नात्याने त्यांनी २४ एप्रिल २०११ रोजी केलेलं भाषण हे त्यांच शेवटच भाषण होय. अत्यंत थकलेल्या शरीराने त्यांच्या भाषणामध्ये संघटनेच्या महत्तेवर त्यांनी जे विचार मांडले ते ऐकतांना त्यावेळी काही वाटले नाही पण आता मला असे वाटते की,

"माझ आता हे शेवटच व्याख्यान आहे. माझी प्रकृती बरी नाही. घरी पडून राहीलो असतो, दुसरीकडे कुठे व्याख्यान असत तर गेलो नसतो. पण ही पडली संघटनेची सभा, बीटींच व्याख्यान माझ्या अध्यक्षतेखाली आहे म्हणून आलो. संघटनेच्या सामर्थ्य संकिर्तनाचे दोन शब्द माझ्या तोंडून तुम्ही ऐकले. तुम्हा सर्व लोकांची भेट झाली. संघटनेमुळे आपल्याला हे दिवस दिसले हे विसरू नका" असा संदेश देण्यासाठीच त्यांच ते व्याख्यान होत की काय?"

**२०.१०** "पाचा भुतांच हे शरीर, ते शेवटी ज्याच त्याला परत करावं लागते.... बाबु रे! हे शरीर भाड्यान घेतलेल घोड आहे. जितके त्याचे लाड कराल तितल ते लाडावते आणि जितल त्याले रिंगणात धावडवाल, तितल ते काम करते" हजारो लोकांना किर्तनात गाडगे महाराज हा जो संदेश देत असत तो आपल्या कानांनी ऐकलेल्या पिढीचा मी प्रतिनिधी आहे. जीवनभर संभाजीरावांनी आपल हे घोड आपल्या प्राध्यापकीसाठी व संघटनेसाठी धावविल. निवृत्त झाल्यावर तर त्या घोड्याला संघटनेच्या कामात अस काही जूंपून दिल की ज्याच नाव ते. गेल्या दोन वर्षात तर त्या घोड्याला त्यांनी जोरात पिटाळणच

सुरु ठेवल होत. पिटाळायच ते सुद्धा किती? वर सर्व तारखा दिल्या आहेत. त्यावर कडी म्हणजे २४-२५ एप्रिलच्या सांगली, पन्हाळा-कोल्हापूर दौऱ्याच्या एक आठवडा अगोदर १७ एप्रिल २०११ रोजी ते कर्नाटकातील हुबळी येथे झालेल्या अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या राष्ट्रीय कार्यकारीणीच्या बैठकीला हजर होते, हे आता मला महासंघाच्या मुखपत्रातील शोकसंदेशातून कळले. अतिश्रमाने हे शरीर थकल आहे हे पुरुषोत्तम शेठ यांच्या लक्षात आल म्हणून मी त्या बाजूकडे त्यादृष्टीने जरा जास्त लक्ष देऊन पाहिल तर नुसत्या तारखांच्या वाचनांनी सुद्धा दम लागावा असा त्यांच्या कामाचा एकूण क्रम आहे. या अपार श्रमान थकलेल हे शरीर त्यांनी १५ जून २०११ रोजी पंचतत्त्वांच्या स्वाधीन केलं.

**२१.१** गेल्या ४-६ महिन्यामध्ये नेटसेटच्या प्रश्नामुळे दोनदा दिल्ली येथे, एम्फक्टोच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीसाठी एकदा मुंबई येथे व माझा दौरा म्हणून दोन दिवस कोल्हापूर/पन्हाळा येथे संभाजीरावाच्या सोबत मुक्काम करण्याची संधी मिळाली. प्रत्येक मुक्काम किमान दोन दिवसाचा होता. त्यामुळे औपचारिक कामकाज आटोपले की संघटनेसमोरील समस्यांबाबत चर्चा होत असे. गेल्या चार सहा महिन्यामध्ये एक विचार सतत त्यांच्या डोक्यात होता. पन्हाळ्याच्या मुक्कामात २५ एप्रिल रोजी सकाळी न्याहारी आटोपल्यावरच्या निवांत वेळी ते मला म्हणाले "बी.टी. इतर कोणी या विषयात लक्ष घालत नाही. पण घटनात्मक मुद्दे त्यामध्ये अंतर्भूत असल्याने तुम्ही त्यामध्ये लक्ष घालावे असे मला वाटते. अनेक दिवसापासून निवांतपणे तुमच्याशी या विषयावर बोलावे असे माझ्या मनांत होते. आम्ही 'सुटा' तर्फे आता ११२ पृष्ठांची एक पुस्तिका प्रकाशित केली आहे. "**शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) : महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांसाठी युजीसी रेग्युलेशन २०१०**" असा त्या पुस्तिकेचा मथळा आहे.

**२१.२** संभाजीराव पुढे म्हणाले "त्या पुस्तिकेत युजीसीचे रेग्युलेशन आपण प्रकाशित केलेले आहे. "UGC REGULATIONS ON MINIMUM QUALIFICATIONS FOR APPOINTMENT OF TEACHERS AND OTHER ACADEMIC STAFF IN UNIVERSITIES AND COLLEGES AND MEASURES FOR THE MAINTENANCE OF STANDARDS IN HIGHER EDUCATION, 2010" असा त्या रेग्युलेशनचा मथळा आहे. व त्या रेग्युलेशनच्या सुरुवातीलाच "In exercise of the powers conferred under clause (e) and (g) of sub-section (1) of Section 26 of University Grants Commission Act, 1956 (3 of 1956), and in pursuance of the MHRD O.M.No.F.23-7/2008-IFD dated 23rd October, 2008, read with Ministry of Finance (Department of Expenditure) O.M.No.F.1-1/2008-IC dated 30th August, 2008, and in terms of the MHRD Notification No.1-32/2006-U.II/U.I(1) issued on 31st December, 2008 ..... the University Grants Commission hereby frames the following Regulations," असे म्हटलेले आहे. **सेवानिवृत्तीचे वय ६५ वर्षे असावे असेही त्या रेग्युलेशनमध्ये आहे."**

**२१.३** ते पुढे म्हणाले "आता असे असतांना राज्य सरकार सेवानिवृत्तीचे वय ६५ करीत नाही. निवृत्तीचे वय ६५ केले नाही म्हणून केंद्र सरकार थकबाकीची रक्कम देत नाही. यामध्ये देशाची घटना कुठे राहीली? कायदा कुठे राहीला? कायद्याच्या राज्याची कल्पना कुठे राहीली" असे म्हणून पन्हाळ्याच्या मुक्कामामध्ये त्यांनी सुटाने प्रकाशित केलेली ११२ पानांची पुस्तिका माझ्या हातात ठेवली. त्यावर माझे म्हणणे असे की, "**सुरुवातीपासूनच घटनात्मक तरतुदीमुळे विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांसाठी राज्यस्तरीय वेतन आयोग नव्हता.** "Co-ordination of standards and determination of standards in higher education" हा विषय भारतीय संविधानाच्या परिशिष्ट सात मधील पहिल्या केंद्र सूचित ६६ व्या क्रमांकावर केंद्र शासनाच्या अखत्यारित दिलेला असल्यामुळे पूर्वीच्या काळात सुद्धा विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केलेल्या व केंद्र शासनाने मान्य केलेल्या वेतनश्रेण्या थेट लागू केल्या जात असत. या घटनात्मक तरतुदीमुळे राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना १९७६ पासून वेतनश्रेण्या लागू करण्यात आल्या असल्या तरी त्यावेळी विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना मात्र त्या १९७३ पासून लागू करण्यात आल्या होत्या. जी स्थिती उच्च शिक्षणाची तीच तंत्र शिक्षणाची. भारताच्या घटनेने केंद्र शासनास जे अधिकार दिले आहेत त्याचा वापर करुन "विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम १९५६" हा केंद्राचा कायदा करण्यात आला आहे. त्या कायद्यातील तरतुदींचा वापर करुन युजीसीचे हे रेग्युलेशन भारत सरकारच्या राजपत्रात प्रसिद्ध झालेले आहे. त्यामुळे ते पूर्णपणे बंधनकारक आहे."

**२१.४** मी त्यावर त्यांना एक माझ्या माहितीतले उदाहरण सांगितले. "आयुर्वेद विद्याशाखेमध्ये डेमॉन्स्ट्रेटरर्सचे पद संपुष्टात आणण्याचा निर्णय सी.सी.आय.एम. या केंद्रस्थ मंडळाने घेतला. त्यावेळच्या सर्व पात्र डेमॉन्स्ट्रेटर्सना अधिव्याख्याता म्हणून पदोन्नत करण्याचा निर्णयही त्यात होता. सी.सी.आय.एम. कायद्यातील तुरतुदींचा वापर करुन रेग्युलेशन 'गॅझेट ऑफ इंडिया'मध्ये प्रकाशित केले. "हे रेग्युलेशन्स बंधनकारक आहेत ही गोष्ट खरी आहे काय?" असा प्रश्न सभागृहात विचारला तर तत्कालीन वैद्यकीय शिक्षणमंत्री श्रीमती पुष्पाताई हिरे यांनी "होय" असे उत्तर दिले व पुढे या सर्व डेमॉन्ट्रेटर्सना पदोन्नत करण्यात आले."

**२१.५** मी पुढे म्हणालो "आता तर विकास कदम या नावाच्या कार्यासन अधिकाऱ्याच्या सहीने महाराष्ट्र शासनाचा आदेश (१५ फेब्रुवारी २०११) निघतो. व त्या आदेशामध्ये 'गॅझेट ऑफ इंडिया'मध्ये प्रकाशित झालेल्या रेग्युलेशनला चक्क "विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारशी" असे संबोधिले जाते व त्यातील एक एका परिच्छेदावर राज्य शासनाचे मान्य, अमान्यतेचे अभिप्राय दिले जातात. ही सारी उलटी गंगा आहे. 'गॅझेट ऑफ इंडिया'ची काय इज्जत राहीली? माझे तर असे स्पष्ट मत आहे की हे रेग्युलेशन पूर्णपणे बंधनकारक अशा प्रकारचे आहे. यापूर्वी वेतन आयोगाच्या अम्मलबजावणीसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कायद्यातील तरतुदींचा वापर करून गॅझेट ऑफ इंडियामध्ये रेग्युलेशन कधीही निघाले नव्हते. ते २०१० मध्ये निघालेले आहे." एवढ्या चर्चेनंतर संभाजीरावांचा प्रश्न असा राहत असे की, "यावर आपण संघटना म्हणून काय करु शकतो? ते पाहिले पाहिजे." त्यावर माझे मत असे की, "हा केंद्र व राज्यशासनातील घटनात्मक अधिकारांचा प्रश्न आहे. AICTE Act च्या बाबतीत असाच प्रश्न तंत्रशिक्षण खात्यात निर्माण झाला होता. तो काही वर्षे चालला. **त्याबाबत केंद्राचे नियम अंतिम राहतील हे आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे अंतिम झालेले आहे.** एकतर हा अखिल भारतीय स्तरावर लढल्या जाणारा प्रश्न आहे. शिवाय तो अनेक महिने चालणारा संघर्ष असेल."

**२१.६** "कोर्टकचेरीच्या माध्यमातून उठाव करतो म्हटले तरी मग आपला त्यात बराच वेळ जातो. आज नेट सेट चा संघर्ष अंतिम टप्प्यात आलेला असतांना ती लढाई संपल्यावरच दिर्घकाळ चालणाऱ्या नव्या संघर्षात हात घालणे योग्य राहील" यावर आम्हा दोघांचे एकमत होत असे.

**२१.७** परवा पन्हाळ्याच्या या मुक्कामामध्ये ही सर्व चर्चा झाल्यावर ते मला म्हणाले "**ही बाब 'हलेश'नी कर्नाटक हायकोर्टात नेलेली आहे.**" प्रा.डॉ.आर.हलेश हे गेले अनेक वर्षे अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या राष्ट्रीय कार्यकारीणीचे सदस्य आहेत. पदाधिकारीहि होते. संभाजीराव स्वतः या महासंघाचे अनेक वर्षे उपाध्यक्ष होते. प्रा. हलेश हे कर्नाटक प्राध्यापक महासंघाचे ज्येष्ठ नेते आहेत. कायद्याच्या मुद्यावरून त्याप्रकारची प्रकरणे न्यायालयात पाठवून अनेक प्रकरणी त्यांनी तेथील शिक्षकांना यापूर्वी न्याय मिळवून दिला आहे. न्यायालयात प्रकरणे पाठवून न्याय मिळवून घेण्याच्या गुणाबाबतच बोलायचे झाले तर प्रा.डॉ.हलेश यांना संभाजीरावांची कर्नाटक आवृत्ती म्हटले तरी चालेल. माझा संभाजीरावांसमवेत पन्हाळ्याचा मुक्काम २४ व २५ एप्रिल २०११ रोजीचा. त्यांची व डॉ.हलेश यांची भेट केंव्हा व कुठे झाली होती? झाली होती किंवा नाही? हा विषय आमच्या चर्चेत आला नाही. पण अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या मुखपत्रातील शोकसंवेदनेतील एका लहानशा मजकुरावरून संभाजीराव १७ एप्रिल २०११ रोजी कर्नाटकात हुबळी येथे झालेल्या 'एआयफक्टो'च्या राष्ट्रीय कार्यकारीणीच्या बैठकीला हजर होते हे स्पष्टपणे दिसून येते. एकतर तेथे त्यांचे डॉ. हलेश यांच्याशी बोलणे झाले असेल किंवा डॉ. हलेश यांच्या कर्नाटकातील कोण्या सहकाऱ्यांने त्यांना ही माहिती दिली असेल.

**२१.८** डॉ. हलेश यांनी कर्नाटक उच्च न्यायालयासमोरच्या या संघर्षामध्ये नेत्रदिपक यश मिळविले असे दिसून येते. "Writ Petition No. 13449-453 of 2011 (S-RES) 2077 of 2011" या प्रकरणामध्ये डॉ. हलेश स्वतः याचिकाकर्ते असून कर्नाटक सरकार, कर्नाटक सरकारचे उच्च शिक्षण आयुक्त व उच्च शिक्षण संचालक हे प्रतिवादी आहेत. **दिनांक २२ जून २०११ रोजी कर्नाटक उच्च न्यायालयाने या प्रकरणी दिलेले मुळ निकालपत्र** एकूण १५३ पृष्ठांचे असून १५२ व १५३ पृष्ठावर मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयातील आदेश समाविष्ट असलेला परिच्छेद ७.१६ व ७.१७ आहे. तो मी खाली जसाच्या तसा उधृत करीत आहे. तो पुढील प्रमाणे :-

"7.16 It is evident from the above that the Scheme framed by the Government of India vide letter dated 31.12.2008 provides for a common revision of pay scales of teachers of Universities and Colleges (affiliated or constituent) es-

tablished under the Central, State or Provincial Acts, **with enhancement of age of Superannuation to 65 years.** The said Scheme has been incorporated as part and parcel of the UGC Regulations 2010. The said Regulations are framed in exercise of power under the UGC Act and would hence over ride any executive government orders issued contrary to the same. In other words the **denial by the State Government of the enhancement of the age of superannuation to teachers working in the Government and Aided, affiliated colleges drawing the UGC Scales of pay is repugnant to the UGC Act and the UGC Regulations, 2010 and is hence void.**

7.17 In the result, **the impugned Orders/Annexures, in the respective petitions,** which have the effect of denying the enhancement of the age of superannuation to 65 years, as provided under the UGC Regulations 2010, **are hereby quashed. The petitioners shall be continued in service in the posts held by them as on the date of the petitions, or immediately prior thereto, till they attain the age of superannuation at 65,** in accordance with the UGC Regulations 2010, with all consequential benefits."

**२१.९** अखिल भारतीय स्तरावरच्या एका मोठ्या संघर्षाची ही सुरुवात आहे. आज कर्नाटक उच्च न्यायालयाचा निर्णय झाला. त्यानंतर आता इतर हायकोर्टामध्ये प्रकरणे जातील. सर्व निर्णय एकाच तऱ्हेचे झाले किंवा अन्यथा झाले तरी सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण जाईल. वयाच्या ६० व्या वर्षी प्राचार्य व प्राध्यापकांना सेवानिवृत्तीची वयोमर्यादा ६२ किंवा ६५ पर्यंत वाढवून पाहिजे असेल तर दारोदार भिक मागायला लावणारा "विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारसीनुसार राज्यात उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्रात कार्यरत पदवी,पदव्युत्तर व पदविका संस्था तथा अकृषि विद्यापीठे, तंत्रशास्त्र विद्यापीठ यातील अध्यापक व प्राचार्यांच्या पदांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबत." या मथळ्याचा एक शासन निर्णय दिनांक ५ मार्च २०११ रोजी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने काढला आहे. महाराष्ट्र शासनाला लाजेने मान खाली घालायला लावणारा हा निर्णय रद्द करण्यासाठी "न्यायालयीन संघर्ष" उभा करण्याची मजबूत पायाभरणी कर्नाटक उच्च न्यायालयाच्या या निर्णयाने केली आहे. दरम्यानच्या काळांत विशिष्ट वयोगटातील शिक्षकांनी एकत्र येवून उत्तम विधिज्ञांची मदत घेतली तर महाराष्ट्रात ६० व्या वर्षी निवृत्त होण्यावर स्थगनादेश सुद्धा मिळू शकेल.

**२१.१०** नियतीचा खेळ कसा गमतीदार असतो पहा. परवा अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या "TEACHERS MOVEMENT" या मासिक मुखपत्राचा जुलै २०११ चा अंक (Volume 13 issue 7) माझ्याकडे आला. एकूण २० पृष्ठांचा हा अंक आहे. पहिले व दुसरे पृष्ठ मुखपृष्ठ असल्यामुळे त्याला पृष्ठ क्रमांक दिलेले नाहीत. २० पृष्ठांच्या अंकाच्या बरोबर मधोमध आमोरे सामोरे आलेली पृष्ठे म्हणजे पृष्ठ ८ व ९. पृष्ठ ९ वर शिर्षभागी पुढील मजकूर आहे.

**"Landmark judgement : Karnataka High Court**

**UGC Regulations are mandatory**

**TEACHERS TO RETIRE AT 65 YEARS**

**In the High Court of Karnataka at Bangalore**

**Dated 22nd June 2011**

Before

**The Hon'ble Mr. Justice ANAND BYRAREDDY.**

**Dr. R. Halesh & Others - Petitioners**

**VS.**

(1) State of Karnataka, Represented by Principal Secretary, Higher Education (2) The Commissioner for Collegiate Education (3) The Director for Collegiate Education (4) SJR College of Science, Arts & Commerce and other Colleges - Respondents."

शिर्षभागीच्या या मजकुरानंतर कर्नाटक उच्च न्यायालयाचा हा पूर्ण निकाल या अंकात छापलेला आहे. त्याची सुरुवात पृष्ठ ९ वरून झालेली आहे. पृष्ठ ८ वर संभाजीरावांचा फोटो अर्धा पानभर छापलेला असून त्याच्या खाली

**"TEARFUL ADIEU, PROF. SAMBHAJI JADHAV"**

असा मथळा व मथळ्याखाली पुढील मजकूर आहे. :- "A life of completest dedication to teacher welfare is over, Prof. Sambhaji Jadhav is no more. He died at the age of 74, in Kolhapur, Maharashtra on 15th June, 2011 after a brief illness. For over 35 years Prof. Sambhaji led the Maharashtra University and college teachers' movement with great dedication. For 8 years he was Vice President of the AIFUCTO. He was President of the MFUCTO ,The Shivaji University Teachers Association (SUTA) was founded by Prof. Sambhaji in 1975. Under his guidance SUTA has become one of the strongest unit of AIFUCTO. Retirement from service meant for him whole time work to strengthen teachers movement and he plunged into forming retired college and university teachers unions. He played a key role in the movement to ensure justice to the non NET/SLET teachers of Maharashtra.

He had been relentlessly espousing teacher demands and won countless rights for them, from the Maharashtra Government during the 3rd, 4th, 5th and 6th Pay Commissions. He would build up pressure on the State Government by marshalling the strength of teachers and then engage it in deft negotiations. Thus was obtained Pension for college teachers, Medical Reimbursement, 100% salary grant for teaching and non teaching staff, and absorption of so-called surplus teachers. Under his guidance the SUTA ran a benevolent fund and credit society for home loans for the teachers. He attended all the AIFUCTO conferences and played key role in maintaining unity of the organization along with our other great leaders. He left behind him three married daughters, son-in-laws and nephews of University and College Teachers Organizations. "

**२१.११** याच अंकात संभाजीरावांबद्दल आणखी पुढील मजकूर समाविष्ट आहे. :- "**OBITUARY** : Teachers' Movement condoles the sudden demise of Prof. Sambhaji Jadav, a Life Member of AIFUCTO and Ex. Vice President of AIFUCTO on 15.06.2011 at Kolhapur. He was 74. By his death, University and College Teachers Movement of the country in general and of Maharashtra in particular lost a trusted friend and philosopher. He was President of Sivaji University Teachers Association - SUTA. Prof. Jadav taken initiative in the formation of All India Federation of Retired University and College Teachers Association (AIFRUCTA). He even actively participated in the meeting of NEC of AIFUCTO held at Hubli, Karnataka on April 17, 2011. Teachers' Movement conveys deepest condolences to his bereaved family and friends in SUTA."

**२१.१२** अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या मुखपत्राच्या या अंकातील पृष्ठ ८ वरील त्यांच्या अर्धपृष्ठभर छायाचित्राकडे जेव्हा मी निरखून पाहिले, तेव्हा एकदा मला असे वाटले की ते प्रसन्न चित्ताने त्यांच्या डाव्या बाजूच्या पानावर छापलेल्या या कर्नाटक हायकोर्टाच्या निर्णयाकडे पहात आहेत. थोडा वेळ पहातच राहिलो तर दुसऱ्यांदा मला असे वाटले की ते माझ्याकडे निरखून पहात मला असे म्हणताहेत की, **"बी.टी.! आपण बसून राहिलो. हलेश चालत राहीला व त्याने बाजी मारली. कर्नाटक उच्च न्यायालयात चांगले नेत्रदिपक यश मिळविले. आपल्या सर्व लोकांना सांगा. "चालत राहा म्हणावं, जो सतत योग्य दिशेने चालत राहतो त्याचे भाग्य फळफळते. बसून राहतो त्याचे भाग्य सुद्धा बसुनच जाते."**

*****

*सहपत्र : १*

# सतत सार्वजनिक हिताची दृष्टी ठेवल्यास, पदे केवळ कामांसाठी आहेत, हे आपोआप कळते, पदांचे ग्लॅमर वाटण्याऐवजी कामाचे ग्लॅमर वाटू लागले पाहिजे

**- प्रा. संभाजीराव जाधव**

('सुटा' बैठक कोल्हापूर ०१.०५.२००५ : टीपण : कामकाज आढावा व कार्यपद्धत)

१. **कोणत्याही संघटनेच्या कार्यपद्धतीत खरोखर सतत सुधारणा करावयाची असेल, तर ते काम करणाऱ्या व्यक्तींत ती अगोदरच व्हावी लागेल.** पुरेशी इमारत, फर्निचर, संगणक, दूरध्वनी, इत्यादी साधनभूत असतात. ती कमी जास्त आणखी करता येतात. खरा बदल करावयास हवा, तो तेथील संबंधित व्यक्तीमध्ये, व्यक्तिव्यक्तीतील संबंधामध्ये, तरच सुधारणा व विकास होऊ शकतो. "स्वभावाला औषध नाही" असे म्हणून व्यक्तिव्यक्तीमधील संबंध सुधारणे शक्य नाही, असे मानणे वा म्हणणे योग्य व आधुनिक स्वरूपाचे नाही. शेकडो लोक आपला स्वभाव बदलताना दिसतात, तेवढे लोक प्रसंगानुरूप आपला दिर्घकालीन असणारा स्वभावही एकदा व अनेकदा बदलतानाही दिसतात. आपण कशावर विश्वास ठेवणार? हा खरा प्रश्न आहे. जी माणसं इतरांच्या स्वभावाबद्दल बोलतात, त्यांनी प्रथम आपला स्वतःचा स्वभाव तपासणे जरुरीचे असते. स्वभाव हा अखेरीस आपल्या दृष्टीकोनावर, आपण इतरांकडे कसे पाहतो, यावर अवलंबून असतो. आज लहान मोठ्या कोणत्याही प्रकारच्या संघटनांमध्ये यशस्वी होणारी माणसे आपला स्वभाव सतत बदलत असतात. **आजच्या जीवनातील स्पर्धा, लोकशाही सारखी समानता व स्वातंत्र्यावर आधारलेली मूल्ये व सहकाराचे तत्व अशा संघटनात्मक काम करणाऱ्या व्यक्तीत, म्हणजे त्यांच्या स्वभावात, त्यांच्या दृष्टीकोनात सतत बदल घडवून आणतात.**

२. हे **समजण्यासाठी स्वतःचीच वारंवार पाहाणी करणे, निरिक्षण करणे जरूरीचे असते. आत्मनिरिक्षणाची आवश्यकता असते, त्याकरिता मात्र दुसऱ्याच्या दृष्टीची गरज असते. स्वतःकडे दुसऱ्यांच्या, प्रसंगी विरोधकांच्या, दृष्टीने पाहिले पाहिजे.** तसेच, इतरांकडे स्वतःकडे जसे पाहातो, तसे त्याच दृष्टीने पाहिले पाहिजे. एक पाऊल पुढे जाऊन, असे म्हणता येते की, माझे यश, केवळ माझे नाही, ते आपल्या सहकाऱ्यांचे आहे, तसेच, इतर सहकाऱ्यांचे अपयश, केवळ त्यांचे नसून, त्यात आपलाही वाटा आहे, यशापयश हे सामुदायिक असते, ते सर्व सहकाऱ्यांचे असते. आत्मनिरिक्षण प्रामाणिकपणे करून, स्वतःमध्ये बदल घडविता येतात, आत्मविश्वास शक्य होतो, इतरांच्या विकासासही साह्य करता येते. व्यक्तिंचा विकास झाला, तरच त्यांच्या संघटनांचाही विकास होतो. **आधुनिक व्यवस्थापन शास्त्रात आत्मनिरिक्षण, बदल, निकोप वाढ, सहकार्य या तत्वांना ह्यामुळेच महत्व आले आहे. पाहिजे तर इतरांनी बदलावे, मी बदलणार नाही, अशा दृष्टीचे लोक हळूहळू बाजूला पडतात, मागे राहतात.**

३. **आत्मनिरिक्षणाबरोबर इतरही काही पथ्ये आपण जाणीवपूर्वक पाळली पाहिजेत. आपण व्यक्तीबद्दल फार, सतत बोलतो, त्यामुळे आपली मानसिक शक्ती व वेळ वाया जातो.** व्यक्तीपलीकडे जाऊन, आपण मूळ प्रश्नांबाबत विचार करीत नाही; व्यक्तीतच अडकून पडतो. आमचे व्यक्तीबद्दल असणारे पूर्वग्रह अधिक प्रबळ ठेवतो, व्यापक दृष्टीने एखाद्या गोष्टीचा विचार करण्याऐवजी, आपल्या व्यक्तीगत आवडीनिवडीमध्ये आपण संघटनेचा विचार करतो, त्यामुळे आपल्या व्यक्तिमत्वाच्या मर्यादा संघटना विकासावर पडतात. सतत व्यक्तिबाबत विचार करणे, बोलणे म्हणजे संघटनेच्या माध्यमातून आपले व्यक्तिगत राग, लोभ भागविणे होय. **सतत सार्वजनिक हिताची दृष्टी ठेवल्यास, पदे केवळ कामांसाठी आहेत, हे आपोआप कळते, पदांचे ग्लॅमर वाटण्याऐवजी कामाचे ग्लॅमर वाटू लागले पाहिजे.** सतत आपण नवीन काय काम केले, असे प्रत्येक दोन तीन महिन्यांने पाहिले पाहिजे, त्यासंबंधी विचार केला पाहिजे. अन्यथा, आपण प्रवाह पतीत होतो, इतरांनी काही केले नाही, हे पुन्हा पुन्हा सांगत राहातो. सतत चिकित्सक व समीक्षात्मक दृष्टीने स्वतःच्या कामाचे मुल्यमापन केले पाहिजे, ते इतरांकडून करूनही घेतले पाहिजे. ह्यासाठी जबाबदाऱ्या वाढवून घेतल्या पाहिजेत.

४. **स्वतःच्या महाविद्यालयात संघटनेचे प्रथम काम केले पाहिजे. मग बाहेरील महाविद्यालयातील प्राध्यापकांकडे तसे काम करावे, हे उचित होय.** आपल्या जवळच्या शंभर टक्के सहकाऱ्यांचा आपणास शंभर टक्के पाठिंबा असला पाहिजे, आपल्या संघटनात्मक कामाची ती खरी कसोटी आहे, पुरावा आहे, त्यात कसलीही तडजोड केली, की विसंगती आलीच म्हणून समजावे. आपण जर आपल्या महाविद्यालयात संघटनेचे महत्व समजून सांगत नसू, आणि तेथील सर्व प्राध्यापकांना एकत्रित करी नसू, तर बाहेरील प्राध्यापकांना आम्ही एकत्रित करतो, असे कसे म्हणू शकणार? 'प्रथम स्वगृही, नंतर शेजारी' हे सुसंगत आहे. स्वतःच्या महाविद्यालयातील हजारो रुपये वर्गणी स्थगित असतांना, तसेच तेथील प्राध्यापकांच्या समस्या न सोडविता, त्यांना विश्वासात न घेता, आपण संघटनेचे काम करतो असे म्हणण्याला काय अर्थ राहतो? संघटनेची पदे वर्षानुवर्षे धारण कशी करतो, हेही पाहिले पाहिजे. **घरातील ताणतणाव अगोदर संपुष्टात आणल्यानंतरच बाहेरचे ताणतणाव कमी करणे योग्य होईल, न्यायाला धरून होईल. पण संघटनेतील आणि विद्यापीठातील पदे धारण करणारे हळूहळू आपल्या मूळ महाविद्यालयातील प्राध्यापकांपासून दूर गेलेले दिसतात,** त्यांच्यासंबंधी असणाऱ्या आपल्या कर्तव्यापासून च्यूत होतात, हे दृष्य संघटना विकासाचे आहे, असे म्हणता येत नाही. फार तर काही प्राध्यापकांचेच ते प्रतिनिधीत्व करतात. आपले मन व व्यक्तिमत्व पुरेसे सांघिक न झाल्याचे हे लक्षण आहे. आपल्या मनाची व्यक्तिगत ठेवण बदलणे, ते अधिकाधिक सांघिक करणे, ही कोणत्याही संघटना कार्यकर्त्यांची प्रथम जबाबदारी आहे. अन्यथा, आपण संघटनेचे जेवढे काम करतो, त्यावरून आपणच पूर्णपणे पाणी फिरवितो, असे झाल्याशिवाय राहत नाही. आपल्या व्यक्तिमत्वाबाबत मग अनेक प्रवाद निर्माण होतात. **यात संघटना व स्वतः आपण अशा दोघांचीही अपरिमित हानी होते, दोघांचाही विकास खुंटतो. प्राध्यापक वर्गातील आपली प्रतिमा उजळ राहात नाही. इतरांना मग आपल्याबद्दलची उत्तरे आपल्या सहकाऱ्यांना द्यावी लागतात. ही बाब प्रशस्त अशा सदरात मोडत नाही.**

५. सर्व, म्हणजे सर्व, प्राध्यापकांबाबत काही किमान सहानुभूती आपल्या ठिकाणी हवी आहे. त्याशिवाय त्यांचे प्रश्न आपणांस मुळी कळणारच नाहीत, त्यामुळे योग्य उपाय योजनाही समजणार नाही. अखेरीस, प्राध्यापकांच्या समस्या संपल्या तरी आपली त्यांच्याबद्दलची सहानुभूती कधी संपू नये. प्राध्यापक संघटनेमधील कार्यकर्ते - प्राध्यापक वाढत जाणारी जबाबदारी टाळू शकत नाहीत, स्वतः आपण स्वखुषीने हे काम स्वीकारलेले आहे. तरी पण आपण ही कधी कधी जबाबदारी टाळण्यासाठी काही 'मेकॅनिझम' वापरीत आहोत, असे दिसते. **दुसऱ्यांकडे बोट दाखविणे, पुरेसा प्रयत्न न करणे, कितीही उशीर झाला, तरी प्रकरणे आणखी पुढे पुढे ढकलणे, प्राध्यापकांना आपल्याकडे व सुटा ऑफीसमध्ये वारंवार येण्यास लावणे, वेळेवर स्वतः हजर नसणे, तक्रार आणणाऱ्या प्राध्यापकांनाच दोष देणे, यासारख्या बाबी दिसू नयेत, हे सर्वांनी कटाक्षाने पाळले पाहिजे.** आपण प्राध्यापकांच्या सेवेसाठी आहोत, ही जाण खोलवर रुजली पाहिजे.

६. कोणत्याही सार्वजनिक संस्थेत व संघटनेत अंतिमतः लांबचा मार्ग फायदेशीर व परवडणारा असतो, त्याऐवजी जवळचे मार्ग (शॉर्ट कटस्) शोधल्यास अखेरीस तोटा व गुंतागुंत होते, सर्वांचाच गोष्टींवरील विश्वास कमी होतो, अडथळे वाढतात. लांबच्या योग्य मार्गाने गेल्यास त्याचा परिणाम दिर्घकाळ राहतो, काम करण्याची सवय जडते, कामात सातत्य राहते, वाईटपणा येत नाही, काम केल्याचे खरे समाधान लाभते, अधिकचे काम करण्यासाठी आपणांस प्रोत्साहन लाभते. चांगुलपणावरील विश्वास वाढतो. मूळ कादंबरी वाचणे व केवळ तिच्यावरील टीका वाचणे यातील अंतरच लांबचे मार्ग व जवळचे मार्ग यातही आहे. **विद्यापीठातील कामकाजांचा अथवा संघटनेच्या बैठकांतील कामकाजांचा अजेंडा पुरेसा वाचून, अभ्यासून, संदर्भ पाहून, इतरांशी चर्चा करुन, आपण किती मांडतो, आणि कॉमन सेंन्सवरती किती अवलंबून असतो, हे त्या संदर्भात पाहण्यासारखे आहे. पूर्व तयारीवर, आपण प्राध्यापक असूनही, आपला पुरेसा विश्वास नसतो,** हे काय दर्शविते? संघटनेत सुतळ्या बांधण्यापासून ते तत्वज्ञान सांगण्यापर्यंत सर्व प्रकारची कामे असतात. पण बहुतेक लोक तत्वज्ञान सांगण्यापर्यंत कधी पोचतच नाही, ते सुतळ्या बांधण्या भोवतीच घुटमळत असतात. आपण सर्वजण डबल ग्रॅज्युएट असल्यामुळे सर्वांनी सर्व प्रकारची कामे करणे उचित होईल. संघटनेच्या बैठका हा एक उपचार राहता कामा नये, ती आज यांत्रिक बाब झालेली आहे.

७. आज देखील 'सुटा' संघटनेपुढे अनेक प्रश्न व बाबी दीर्घकाळ आहेत, ह्यांना सोडविण्याची निकड आहे. तातडीने तिकडे लक्ष दिले पाहिजे. प्राध्यापकांचे नवे सेवा नियम अंमलात आणले पाहिजेत, 'प्राध्यापक विश्व' नियमित निघेल व ते घरपोच होईल, अशी यंत्रणा उभी केली पाहिजे, त्याचे आर्थिक गणितही योग्यरित्या बसविले पाहिजे, कोल्हापूर जिल्हा संघाची इमारत/कार्यालय स्थापन झाले पाहिजे, महिला विभाग नव्याने ठाकठीक केला पाहिजे, वर्गणी/पैसे यांची वसुली केली पाहिजे, खर्चावर व टेलीफोनवर नियंत्रण ठेवले पाहिजे, **नवीन सभासद करून घेतले पाहिजेत,चांगल्या कार्यांची वृत्तपत्र प्रसिद्धी झाली पाहिजे. सर्वसामान्य प्राध्यापकांचे नेमके कोणते प्रश्न आहेत, हे पाहिले पाहिजे, महाविद्यालये व प्राध्यापक यांची एका सत्रात एकदा तरी भेट झाली पाहिजे, प्रत्येक ऑगस्ट-सप्टेबर मध्ये नवीन प्राध्यापकांचे शिबीर आयोजित केले पाहिजे,** प्राध्यापकांच्या गुणवत्ता वाढीसाठी व्याख्याने/ कार्यशाळा/ शिबीर घेतली पाहिजेत, सेट-नेट साठी वर्ग घेण्याची सोय केली पाहिजे, युजीसी व इतर संस्थांचे अभ्यास अहवाल आणि

लिटरेचर्स वाचून, मार्गदर्शन करणारा एक गट तयार केला पाहिजे, इतर संघटनांशी सातत्याने जवळकीचे व्यवहार व संबंध ठेवले पाहिजेत, प्रत्येक दोन महिन्यांनी पदाधिकाऱ्यांनी आपल्या झालेल्या व राहिलेल्या कामांचा स्वतंत्रपणे आढावा घेतला पाहिजे. पदवीधर व विद्यार्थी यांच्या प्रश्नांचा अभ्यास करणारा/सोडविणारा एक गट तयार करणे आवश्यक आहे. 'सुटा'चा इतिहास लिहिला पाहिजे, ही कामे लवकरच हातावेगळी केली पाहिजेत.

८. प्राध्यापक संघटनेत काम करणाऱ्या प्रतिनिधीने आपले सर्व व्यवहार पारदर्शक ठेवले पाहिजेत, वागण्यात मोकळेपणा ठेवला पाहिजे, तरच इतरांचे सहकार्य मिळेल, परस्परात विश्वासार्हता वाढेल, त्याने सतत काळजीपूर्वक वाचन केले पाहिजे, उत्तरे शोधण्याची वृत्ती त्याला जोपासावी लागते, मूलभूत समस्यांच्या मुळाशी जाण्याची सवय त्याने करून घेतली पाहिजे, इतरांशी सतत चर्चा विनिमय केला पाहिजे. प्रश्नांची - अगदी वर्गणी गोळा करण्याची बाब घेतली तर सकारात्मक बाजू प्रथम ध्यानात घेतली पाहिजे, आपण जर केवळ नकारात्मक बाजूच पाहाणार व वारंवार मांडणार असू, तर मग संघटनेची गरज नाही, असेही म्हणता येईल (आणि त्याबरोबरच नकारात्मक बाबी मांडणारांचीही काही गरज नाही, असेही म्हणता येईल.) आपलाही सकारात्मक बाजूवर पूर्ण विश्वास असला पाहिजे. लोकशाही तत्वे, समानता, स्वातंत्र्य, बंधुत्व, सहकार, प्रामाणिकपणा, कष्ट करण्याची व जबाबदाऱ्या आपणहून वाढवून घेण्याची वृत्ती, इतरांना आपणहून साह्यभूत होण्याची सवय ठेवली पाहिजे. अशा कार्यकर्त्याने बदलीची भीती मनात ठेवून काही अनावश्यक रचना व कार्ये करू नयेत. **उच्च पदस्थांच्यामुळे आपल्या मतांवर विपरित परिणाम होऊ देऊ नये. शासन, प्रशासन, तसेच विद्यापीठ प्रशासन, तेथील अधिकारी यांचे प्रेशर, त्याप्रमाणेच तेथील कामगार - कर्मचारी संघटना पदाधिकारी, वा संस्थाचालक, प्राचार्य यांपैकी कोणाचेही प्रेशर आपली बाजू मांडतांना आपल्यावर राहू देऊ नये. निःशंकपणे विषयाच्या गुणावगुणांवरून आपली बाजू आपण शंभर टक्के वस्तुनिष्ठ पद्धतीने, मला काय अडचणी येतील, कोणाचा काय ग्रह होईल, ह्या बाबी पूर्णतः गौण मानून, मांडली पाहिजे.** ती सवय मनाला जाणिवपूर्वक लावली पाहिजे. आपण कोणाची अकारण निंदा करू नये, तशीच अकारण प्रशंसाही करू नये. आपण आपल्या अडीअडचणी, रागलोभ या संकुचित बाबी मानल्या पाहिजेत.

९. जर का आपण व्यक्तिपेक्षा विचार, पदापेक्षा तत्व अधिक महत्वाचे आहे, असे मनोमन मानले, आणि **पूर्ण अभ्यास करून आपली बाजू मांडली, तर ऐकणाऱ्या समोरच्या माणसास - मग तो कुलपती, कुलगुरू, मंत्री, सचिव वा संचालक असो - वाटू लागते की, बोलणाऱ्या व्यक्तीने आपल्यापेक्षा जादा विचार केलेला आहे आणि त्याचे म्हणणे मान्य करणे भाग आहे. एवढी आपली सर्व बाजूंनी तयारी (इक्विपमेंट) व्हावयास हवी आहे. तरच, प्राध्यापक संघटनेचे प्रश्न सुटतील आणि त्यांच्या संघटनेचे कार्य उठावदारपणे दिसू लागेल. अशा अभ्यासाला अन्य कसलाही पर्याय नाही, हे सतत ध्यानात ठेवले पाहिजे.**

१०. 'सुटा' या संघटनेत काही वर्षे सक्रीय काम केलेल्या प्राध्यापकांनी स्वतःस संघटनेच्या कामापासून कधीही अलीप्त ठेवू नये. पद असो वा नसो, आपले हे एक धर्मकृत्य आहे, असे मानून निरलसपणे वयाच्या सत्तराव्या वर्षापर्यंत काम करावे. काम सतत जास्त असते व काम करणारे कमी असतात. संघटनेस सर्वांची गरज असते. ती सर्व प्राध्यापकांनी भागविली पाहिजे, त्यासाठी वाटेल ते काम करण्याची निरपेक्ष बुद्धीने तयारी ठेवली पाहिजे. त्यात एक प्रकारचे दुर्मिळ समाधान निश्चित आहे. तथापि वयाच्या सत्तरीनंतर मात्र ह्या कामापासून आपण पूर्णपणे अलिप्त राहावे, कसलाही संबंध पुढे राहू देणे म्हणजे इतरांच्या हक्कावर आक्रमण करणे होय, हेही ध्यानात घ्यावे लागेल.

***सहपत्र : ५***

## CONDOLENCE RESOLUTION ADOPTED AT THE MEETING OF THE EXECUTIVE COMMITTEE OF MFUCTO

## held in Mumbai on Sunday, the 10 th July 2011

### PROF. SAMBHAJIRAO JADHAV OUR VETERAN LEADER IS NO MORE

It is with a deep sense of sorrow that teachers in Maharashtra learned of the sudden and sad demise of Prof. Sambhajirao Jadhav in Kolhapur on 15th June 2011. **He was one of the stalwarts of the teachers' Movement not only in Maharashtra but all over the country.** He played a stellar role during the most testing and crucial times in the long history of the movement. Prof. Jadhaw worked at the All India level and made it a point to attend all the meetings of the Executive Committee and General Council of the AIFUCTO along with the full contingent of delegates from SUTA. It was through his personal efforts that several lakhs of rupees came to be collected from SUTA towards the AIFUCTO Struggle Fund.

**Prof. Jadhav's contribution to the teachers's movement in Maharashtra will remain unparalleled in our history.** In the big struggle with government of Maharashtra for constituting Tribunals for teaching and non teaching staff in the schools and colleges, Prof. Jadhav played a leading role. After constitution of such tribunals all over Maharashtra he took upon himself the role of judicially organizing the same. He prepared a compilation of his own consisting of GRs, Statutes, Ordinances, Rules and Regulations and used them to the advantage of teachers. By this he earned the nick-name of being a 'moving encyclopedia' of Government and University Circulars, Rules and Regulations.

He ceaselessly worked through out the period of the emergency between 1975 and 1977 when MFUCTO had just come into existence. The biggest achievement of the MFUCTO during this period was the signing of the consensus of 1977 between MFUCTO and the Government of Maharashtra which has survived till date in which his contribution was immeasurable. He held important positions such as President and General Secretary in the MFUCTO and left an indelible mark as a frontline committed leader during the crucial moments in the history of teachers' movement. He undertook visits to the different districts in Maharashtra in order to ensure that teachers in Maharashtra participated in the 1987 All India indefinite strike called by the AIFUCTO. Thereafter in the indefinite strike in Maharashtra in December 1988 - January 1989 for the implementation of the fourth pay commission scales of pay, he worked as an important member of the Negotiating Team. As General Secretary of the MFUCTO in December 1999 he was one of the signatories to the Agreement between MFUCTO and the Government of Maharashtra that led to the implementation of the fifth pay commission revised pay scales for university and college teachers from 1.1.1996. **During the last historic 44 day strike in July-August 2009. through out the negotiations with the government involving Shri Rajesh Tope, our Education Minister and Shri. Ashok Chavan, our Chief Minister, he contributed by his sagacious presence.**

Prof. Jadhav displayed unstinted commitment till his last breath to the cause of 10,000 teachers affected by the government's arbitrary and illegal orders on NET/SET. He remained **present on 2nd August and 2nd December 2010** at the Jantar Mantar and participated in the massive Demonstration organized by the MFUCTO of teachers from Maharashtra. Shri. Sambhajirao Jadhav **took part in the three day Dharna from 2nd to 5th March 2011** and joined the MFUCTO delegation in the meeting between MFUCTO and the HRD Ministry officials. In fact, in the recent meeting **that took place on 10th May 2011** with the Union HRD Minister Shri Kapil Sibal and with the UGC Secretary, he was to remain present in New Delhi. However, a few days prior to that he took ill and was advised complete rest that prevented him from attending the meeting. He was an intellectual, a democrat and a social activist and fought uncompromisingly to enhance the dignity and status of the teaching community. The young teachers have many lessons to learn from his life and living for the cause of teachers and education.

In his death, we have lost a friend, philosopher and a guide. His death has left a big void that will take years to fill. The ideals that he set before the teachers and his personal involvement in the struggles from the college level of the HRD Ministry and the UGC will surely act as a beacon light to us in the future. MFUCTO expresses its deep condolences to the members of his family long live Prof. Sambhajirao Jadhav, Long Live, Long Live.

**Prof. Shivajirao Patil (President) : Dr. Tapati Mukhopadhyay (General Secretary)**

*सहपत्र : २*

# *एखाद्यात सचोटी आहे, हे कळावयास काहीसा वेळ लागतो, पण ती नाही, हे कळावयास फार वेळ लागत नाही, ती नाही, ही बाब तात्काळ स्पष्ट होते.*

**- प्रा. संभाजीराव जाधव**

(प्रा.संभाजीराव जाधव यांनी पदाधिकाऱ्यांसाठी तयार केलेले टिपण : 'सुटा' बैठक कोल्हापूर १२ जून २००५ : तिसरे टीपण : नेतृत्व पात्रता)

**११. नेतृत्व पात्रता ही संघटना विस्तार व बळकटीसाठी आवश्यक बाब आहे आणि ही पात्रता जाणीवपूर्वक व प्रयत्न साध्य आहे. ती सचोटी, कष्ट, निर्णयाची अचूकता, किमान सहानुभूती, किमान वाचन या बाबींवर मुख्यत्वेकरून अवलंबून असते.** ह्या सर्व बाबी स्वतंत्र असूनही, त्या परस्पर पूरक असल्यामुळे एकमेकीवर अवलंबूनही आहेत; परस्परांची परिघे छेदणारी ही सर्व वर्तुळे आहेत आणि ह्या स्वतंत्र वर्तुळांतून अखेरीस नेतृत्व पात्रतेचे एक व्यापक वर्तुळ निर्माण होते. नेतृत्व पात्रता, जर किमान स्वरुपात नसेल तर, अनुयायांचा गोंधळ उडतो, त्यांच्या नेतृत्वावरील विश्वासास तडा जातो, आणि मग संघटनेचा विस्तार व बळकटी होणे दुरापास्त होत जाते.

**१२. दुसरी एक तितकीच महत्वाची गोष्ट म्हणजे संघटना विस्तार व बळकटीसाठी एखाद्याची नेतृत्व पात्रता, ती कितीही असली तरी, अखेरीस अपुरी पडते. संघटनेच्या त्या त्या पातळीवरही नेतृत्वाच्या पात्रतेची तितकीच गरज असते.** एखाद्याच्या नेतृत्व पात्रतेमुळे संघटना काही विशिष्ट परिघापर्यंत विस्तारत जाते. तशीच ती काही पातळीपर्यंतच बळकट होते, त्यापुढे ती नेण्यासाठी त्या त्या पातळींवर नेतृत्व पात्रता निर्माण व्हावी लागते. कार्यकर्त्यांचे, त्यांच्या नेतृत्व पात्रतेचे एक मोहोळच निर्माण झाल्याशिवाय संघटनेच्या विस्तार व बळकटीचा पुढचा टप्पा गाठला जात नाही, अशी ही पुढची आणि आणखी पुढची वाटचाल झाली नाही तर, संघटना एका ठराविक चाकोरीतून फिरत राहते अन् तिचा परिघ तसाच संकुचित राहत जातो. ज्यांना काहीही नवीन करावयाचे नसते, अशा नेतृत्त्वाची भरती मग संघटनेच्या पदांवरती होत जाते, असे नेतृत्व केवळ नाममात्र राहते, संघटना मग कोणाच्या तरी 'दावणी'ला पुढे बेवारशी जनावराप्रमाणे बांधली जाते. हे होऊ द्यायचे नसेल, तर स्पर्धेतील, क्रीडा-ज्योत ही सतत तेवत असताना जशी एका कडून दुसऱ्या रनरकडे द्यावी लागते, आणि नवा रनर अधिक जोमाने पळून ती पुढच्या रनरच्या हाती सुपूर्द करतो, **तसे संघटनेतील नेतृत्त्वाचे एक जाळेच तयार व्हावे लागते. देवमासा पकडण्यासाठी व्यापक व बळकट जाळ्याची गरज असते, नाही तर चिंगळ्या पकडण्यात कसला पुरुषार्थ? अन कसले समाधान?**

१३. सचोटी हे ऐच्छिक संघटनेचे व्यवच्छेदक लक्षण होय, तो मूलाधारच आहे. ह्या गुणामुळेच संघटनेचा विकास व विस्तार होतो. वर्गात मुलांना शिकविणे, हे सचोटीचे उत्तम उदाहरण आहे. त्यामुळे हा गुण शिक्षक संघटनांना व्यापून राहिला पाहिजे. वर्गात मुलांना उत्तम शिकविणे हा चांगल्या शिक्षकाचा स्वार्थ आहे, त्यामुळे वेतन तर मिळतेच, पण त्याहून अधिक ज्ञान सतत मिळते आणि ते इतरांना दिल्यामुळे आत्म्याला समाधान मिळते, हा शिक्षकाचा मोक्षच आहे, प्रत्यक्ष परमेश्वराशीच त्याची एकरुपता आहे. **सर्व बैठकांना हजर राहणे, ही एक सचोटी आहे, पण अशा बैठकांना पूर्ण तयारीनिशी जाणे, आणि विषय पत्रिकेवरील विषयांबाबत ऐकणारांना काही नवी माहिती व दिशा देणे हीही सचोटीच आहे. आपण पहिल्या सचोटीस उतरतो, पण दुसऱ्या सचोटीत नापास होतो.** अजेंड्याचा पुरता अभ्यास करुन बैठकीस जाणे, ही बाब संघटनेच्या दुसऱ्या टप्प्यापासून सुरु होणाऱ्या विकासास व बळकटीस साह्यभूत होते, इथे सचोटीचा खरा कस लागतो. सर्व सामान्य अनुयायी हा कस सतत लावत असतो, ही बाब सतत नेतृत्वाने ध्यानात ठेवावी लागते. नेतृत्व हे सतत अनुयायांपूढे दोन पाऊले असावे लागते, ही दोन पाऊले पुढे नसतील, तर अनुयायी अडखळू लागतात. एकमेकांच्या पायावरच पाय टाकतात. दिशाहीन वाटचाल करतात. सचोटी पुरेशी नसेल, तर इतके अनर्थ होतात, अशिक्षित गृहिणीला देखील प्रपंच्याबाबत अशीच सचोटी बाळगावी लागते आणि ती त्यात यशस्वीपण होते. सचोटी, प्रामाणिकपणा नसेल, तर एकूण व्यवहारालाच उभा तडा जातो. मग आत्म्याचे समाधान कसे साधणार? जे विषयांचे तेच संघटनेतील जमाखर्चाचे आणि इतर विषयांचे देखील. सचोटी सर्वत्रच हवी, ती सर्व व्यापी हवी, अन ती अढळही हवी. **एखाद्यात सचोटी आहे, हे कळावयास काहीसा वेळ लागतो, पण ती नाही, हे कळावयास फार वेळ लागत नाही, ती नाही, ही बाब तात्काळ स्पष्ट होते.**

**१४. जी गोष्ट सचोटीची, तीच गोष्ट परिश्रमाची, अचूक निर्णयाची, किमान सहानूभूतीची आणि वाचनाची देखील असते. सचोटी, प्रामाणिकपणा, प्रांजळपणा असेल, तर व्यक्ती संघटनेच्या कामासाठी श्रम आनंदाने करते, कितीही परिश्रम झाले, तरी त्यातून त्यास अधिकाधिक आनंदच होतो,** अशा कामासाठी लागतील तेवढे श्रम तो करू शकतो, मग ते श्रम शारीरिक असो, वा मानसिक वा बौद्धिक, किंवा ह्या तिनही प्रकारचे एकत्रित असो, तो करतोच. त्याच्या लेखी असे श्रम हे श्रम नसतात, ते आनंददायक असतात. आपण सर्वजण शारीरिक श्रम करतो पण बौद्धिक श्रम शक्यतो टाळतो. त्यामुळे एखाद्या प्रश्नाचं संपूर्ण दर्शनच अगदी त्याच्या मुळांपासूनचे दर्शन घेण्यासाठी लागणारे सातत्य, चिकाटी आपण मध्येच सोडतो, प्रश्नाची तड लावण्याच्या भानगडीत पडत नाही, आपल्या अनुयायांच्या पातळीवरच आपण राहातो. दोन पाऊले पुढे राहत नाही, हे अनुयायांनाही तात्काळ जाणवते **आणि ते नेतृत्वाचे पाणी जोखतात, ते किती खोल आहे, हे त्यांना जाणवते त्यांचाही मग तेवढाच प्रतिसाद मिळतो आणि मग पदाधिकारी अशा अनुयायांना दोष देऊ लागतात. इथे प्रथम कमी कोण पडतो हे पाहणे जरूरीचे आहे.**

**१५. व्यक्तीच्या कष्ट करण्याच्या प्रवृत्तीमागे जशी सचोटी असते, तशीच त्याच्या ठिकाणी तो कष्ट ज्यांच्यासाठी करतो, त्यांच्याबद्दल असणारी सहानुभूतीदेखील असते. ती किमान स्वरुपात नसेल, तर तो समोरच्या व्यक्तीचे म्हणणेही पुरेसे ऐकून घेत नाही, त्याची समस्याही समजून घेत नाही, त्यासाठी कष्ट करण्याचे तर लांबच राहते.** ऐच्छिक स्वरुपाच्या संघटनेत काम करताना जर तुम्ही पदासाठी वा नाव होण्यासाठी काम करीत नसला तर समोरच्या व्यक्तीबद्दल अफाट सहानुभूती वाटली पाहिजे, त्याची खरी समस्या ही आपण आपली समस्या आहे, असे मनोमन मानले पाहिजे. सह अनुभूती (अनुभवा) च्या जोरावर तुम्ही त्याची समस्या मुळांपर्यंत समजून घेऊ शकता, तिची तड लावू शकता, त्याच्यावरील अन्याय आपला मानला, तर त्याच्यावर कसलाही अन्याय होणार नाही, हे पाहू शकता, त्यासाठी सर्व ती आवश्यक धडपड करू शकता, हे निश्चित.

**१६. जी गोष्ट सहानूभूतीची, तीच गोष्ट आपल्या वाचनाची देखील आहे. संघटनेतील कामांसाठी कायदेकानून व पुरेशी माहिती असल्याशिवाय अनुयायांच्या समस्यांची उकलच होत नाही, त्यांची तड कशी लावता येते, हे कळत देखील नाही,** हवेत वार करणारे, शेकडो शासकीय/ विद्यापीठीय पदाधिकारी आपण नित्य गमतीने सध्या पाहात आहोत. इथेही आपण अशा पदाधिकाऱ्यांच्यापुढे चार पाऊले असणे गरजेचे असते. आपणांस विषयांचे पुरेसे ज्ञान केवळ इतरांचे म्हणणे ऐकून नव्हे, तर स्वतः मुळातून वाचून 'फर्स्ट हँड' मिळविलेले ज्ञान खरोखरच आपणांस, ज्याला इंग्रजीत "करेज (धाडस) ऑफ कन्व्हिक्शन (खात्री)" म्हणतात, ते आवश्यक धाडस प्राप्त करून देते, हे हत्यार फार धारदार, तीक्ष्ण व परिणामकारक असते. खरी जादू ह्या हत्यारातून निर्माण होते. विषयाचे, समस्यांचे ज्ञान हा प्रकाश आहे. ह्याची पुरेपूर प्रचिती इथे येते, ते ज्ञान नसेल, तर सर्वजण अंधाराची लढाई खेळत असतात. कोण कुणाला मारतो हे कोणासही मुळी अखेरपर्यंत कळतच नाही, लढाई होते, दिर्घकाळही होते, पण परिणाम मात्र काय झाला, हे कोणासही कळत नाही, म्हणून तर एकाच बैठकीचे निवेदन भिन्न भिन्न होते. **'डोळस' नेतृत्व म्हणजे काय ते इथे समजते. अशा नेतृत्वावरील इतरांचा विश्वास दुणावतो. पण ह्या जादूसाठी अखंड वाचीत जाणे अत्यावश्यक आहे. केवळ कायदेकानून तर लागतातच, पण आपले सर्वसामान्य, जनरल व व्यक्तिगत वाचन देखील आवश्यक असते, त्यामुळे आपली दृष्टी सकारात्मक- पॉजिटिव्ह होते, कटूता येत नाही, निराशाही जाणवत नाही, काहीशा अलिप्तपणे आपण सतत सक्रिय राहतो,** काळाबरोबर राहतो, आपण एकटे असलो तरी, आपणास एकटेपणा जाणवत नाही, बहुतांश निर्णय अचूक होतात, दिशा बरोबर सापडते, आत्मा समाधानी राहतो, अन् आरोग्यही उत्तम राहते. एका वाचनाने इतके फायदे होतात!

१७. नेतृत्वाची पात्रता ही कष्टसाध्य गोष्ट आहे, तिचा व्यक्तीच्या जन्माशी काही संबंध नाही. **संघटनेच्या कामांसाठी पुरेसा वेळ देणे, ही बाब महत्वाची आहे. निदान, सर्वसामान्य प्राध्यापकांचा विश्वास असेपर्यंत तरी संघटनेत काम करणे, खरोखरच आनंददायक आहे, त्यासाठी वेळेची मर्यादा असता कामा नये. शिकविण्याचे काम संपल्यावर, संघटनेत काम करण्यास भरपूर वेळ मोकळा मिळतो. जो खरोखरच संशोधन करीत असेल, नियमित लेखन करीत असेल अथवा सामाजिक, सांस्कृतिक कार्य करीत असेल, तर त्याने संघटनेत काम नाही केले तरी चालेल. पण इतरांना जर आपल्या जीवनास काही दिशा द्यावयाची असेल, वेळेचा सदुपयोग करावयाचा असेल, काही स्नेही मंडळी जोडावयाची असतील, काही आत्मिक समाधान मिळवायचे असेल, इतकेच काय पण आरोग्य नीट ठेवायचे असेल, तर त्यांनी संघटनेत अवश्य सहभाग घ्यावा.** आपण केवळ काही प्राध्यापकांसाठी तेथे

*सहपत्र : ३*

# महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ (एमफक्टो) प्रारंभ व घडामोडी

**प्रा. संभाजीराव जाधव**

*माजी अध्यक्ष, एमफक्टो*

"महाराष्ट्र फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटी ॲण्ड कॉलेज टीचर्स ऑर्गनायझेशन्स' (एमफक्टो) या महाराष्ट्र राज्यव्यापी संघटनेस सध्या (एप्रिल-मे) २००५ मध्ये तीस वर्षे पूर्ण होत आहेत, ही एक विशेष घटना आहे. ही संघटना स्थापन होण्यास काही घटनाक्रमामधून जावे लागले आहे. महाराष्ट्रातील त्यावेळी असणाऱ्या सहाही अकृषि विद्यापीठातील सर्व प्राध्यापकांनी (सुमारे ३०-३२ हजार) विद्यापीठ परीक्षा बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला, तो जानेवारी - फेब्रुवारी १९७५ मध्ये, पण प्रत्यक्ष बहिष्कार सुरु झाला तो मार्च १९७५ पासून आणि तो शासनाने मागण्या मान्य केल्यावर एप्रिल १९७५ च्या अखेरीस मागे घेतला. या काळात प्रथम अनौपचारिकपणे एमफक्टोचा जन्म झाला आणि 'एमफक्टो' अस्तित्वात आली. याची अधिकृत व औपचारिक घोषणा एप्रिल १९७५ च्या पहिल्या आठवड्यात मुंबई विद्यापीठाच्या पदवीदान समारंभ हॉलमध्ये झालेल्या राज्यातील प्राध्यापकांच्या व्यापक मेळाव्यात झाली. **त्यावेळी पहिले अध्यक्ष म्हणून डॉ. लिलाधर बी. केणी, प्रमुख कार्यवाह म्हणून प्रा. किशोर ठेकेदत्त व खजिनदार म्हणून प्रा.व्ही.बी.कामत हे आणि इतर पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य निवडले गेले.**

**२. मुंबई विद्यापीठ शिक्षक संघ (त्यावेळी 'बुट्ट' आता 'बुक्टू') आणि नागपूर विद्यापीठ शिक्षक संघ ('नुटा') ह्या दोन संघटना सन १९७५ च्या वरीच वर्षे अगोदरपासून कार्यरत होत्या.** दिनांक १ एप्रिल १९६६ पासून लागू झालेल्या विद्यापीठ अनुदान मंडळाच्या वेतनश्रेणी महाराष्ट्रातील प्राध्यापकांना द्याव्यात, म्हणून ह्या प्राध्यापक संघटनांनी विशेष प्रयत्न केले होते. केवळ त्यांच्या प्रयत्नामुळे त्यावेळचे शिक्षणमंत्री नामदार मधुकरराव चौधरी यांनी नागपूर येथे प्राध्यापकांच्या मोर्चास तो सुरु होणाऱ्या ठिकाणी स्वतः जाऊन ह्या नव्या वेतनश्रेण्या मान्य केल्या होत्या, हे विशेष होय! तथापि, पुढे विद्यापीठ अनुदान मंडळाच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनांतर्गत दि. १ जानेवारी, १९७३ पासून लागू होणाऱ्या नव्या वेतनश्रेणी प्राध्यापकांकरिता त्यावेळचे केंद्र शासनामधील शिक्षण मंत्री नामदार प्रा. एस. नरूल हसन यांनी लोकसभेत दि. २९ मार्च १९७५ रोजी जाहिर केल्या, पुढे त्याप्रमाणे आदेश दि. २ नोव्हेंबर ७४, १६ जानेवारी, ७५ व २०.२.७५ रोजी निघाले, आणि त्यावेळचे महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री नामदार नामजोशी यांनी मात्र औरंगाबाद येथे जानेवारी १९७५ मध्ये प्राध्यापकांना जाहिरपणे सांगितले, "**युजीसी वेतनश्रेणी तुम्ही विसरा, त्या तुम्हाला मिळणार नाहीत.**" त्याची प्राध्यापक वर्गात तीव्र प्रतिक्रिया उमटली, सर्वत्र जिल्हास्तरावर भराभर प्राध्यापक एकत्र आले, बुट्ट संघटनेने त्यासाठी आपले प्रतिनिधी ठिकठिकाणी पाठविले. त्या संघटनेचे अध्यक्ष डॉ.लिलाधर बी. केणी स्वतः सांगलीला आले होते. प्रत्येक जिल्हास्तरावर प्राध्यापक संघटना लगेच स्थापन झाल्या, मुंबईतील प्राध्यापकांनी विद्यापीठ परीक्षा बहिष्कार घालण्याचा ठराव पास केला. तसा तो ठराव इतर जिल्ह्यांत भराभर मंजूर झाला आणि विद्यापीठांना प्राध्यापकांनी आपला बहिष्कार तातडीने कळविला. **महाराष्ट्रातील प्राध्यापकांचा हा पहिला बहिष्कार आंदोलन कार्यक्रम होता.**

३. मधल्या काळात महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री बदलून वर्ध्याच्या श्रीमती प्रभा राव ह्या शिक्षणमंत्री झाल्या आणि मिलिटरीमधून आलेले श्री. के. के. मोघे हे त्यांचे सेक्रेटरी झाले. **महाराष्ट्रव्यापी विद्यापीठ परीक्षा बहिष्कार पाहून शासनाने सर्व प्राध्यापक संघटनांना चर्चेसाठी निमंत्रणे लेखी पाठविली. त्यांना मार्च १९७५ मध्ये वेगवेगळ्या वेळी व दिवशी बोलाविण्यात आले होते. त्यावेळीच डॉ. एल.बी.केणी व डॉ. किशोर ठेकेदत्त यांनी ह्या सर्व प्राध्यापक संघटनांना पत्रे पाठवून मरिन लाईन्स स्टेशनजवळ असलेल्या 'किमत रॉय बिल्डिंग'मध्ये एका वेळी एकत्रित येण्याचे आवाहन केले. ह्याप्रमाणे सर्व प्राध्यापक संघटनांचे पदाधिकारी तेथे एकत्रित आले. डॉ.केणी व डॉ.ठेकेदत्त यांनी सर्व परिस्थिती समजून सांगितली आणि सर्व संघटनांनी शासनाबरोबरच्या चर्चेसाठी एकत्र जाण्याचा ठराव प्रथम तेथे मंजूर झाला आणि त्याप्रमाणे शिक्षणमंत्र्यांना कळविण्यात आले.** त्यावेळी 'एमफक्टो' प्राध्यापक महासंघ प्रथम अनौपचारिकपणे व जाहीर न करताच अस्तित्वात आला. डॉ.केणी व डॉ.ठेकेदत्त यांनी असे प्राध्यापकांनी एकत्रित येण्याचे प्रयत्न केले नसते, तर त्यानंतर व आजही त्यांच्यामधील ऐक्य कदाचित दिसले नसते. अनेक प्राध्यापक संघटना महाराष्ट्र पातळीवर दिसल्या असत्या. त्यावेळचे कॉंग्रेसचे श्री. रजनी पटेल यांनी पुढे लगेच आलेल्या राजकीय आणिबाणीत (जून १९७५ मध्ये) आजच्या 'एमफक्टो' प्राध्यापक महासंघास पर्यायी प्राध्यापक संघटना निर्माण करण्यासाठी मुंबई येथे चर्च गेटजवळील पाटकर हॉलमध्ये प्राध्यापकांची बैठक बोलाविली होती. पण जेमतेम १५-२० प्राध्यापकच त्यास उपस्थित राहिल्यामुळे हा रजनीसाहेबांचा प्रयत्न पूर्ण फसला. त्यामुळे त्यांना ह्याबाबतीत गप्प बसावे लागले, ही गोष्ट इथे ध्यानात घ्यावी लागेल.

**४. किमत रॉय बिल्डिंगवरील बैठकीत जसे सर्व संघटनांनी एकत्रित चर्चेस जावयाचे ठरले तसेच आपणाबरोबर कोणीही राजकीय पुढाऱ्यास आमदारांस व खासदारांस न्यायचे नाही, आपण आपले प्रश्न व मागण्या चांगल्या रीतीने मांडू शकतो, असेही ठरले.** ती प्रथा एमफक्टोने गेल्या तीस वर्षाच्या इतिहासात पाळलेली आहे. त्यामुळे सर्व राजकीय विचारांचे प्राध्यापक, तसेच तटस्थ असणारेही प्राध्यापक ह्या एकाच संघटनेत सदस्य आहेत. वाटचालीमध्ये पुढेही बहुतांश वेळा एखादा दुसरा अपवाद वगळता एमफक्टोचे सर्व निर्णय एकमताने झालेले आहेत, केवळ लोकशाही प्रथा सतत सांभाळल्यामुळेही हे घडू शकले आहे. फूट पडण्याची साधी शक्यता देखील कधी निर्माण झालेली नाही. ह्या विचाराने कोणी कधी गेले देखील नाही.

५. बहिष्कारामुळे विद्यापीठ परीक्षा पुढे ढकलाव्या लागल्या, शासनाबरोबर मार्च-एप्रिल १९७५ मध्ये चार पाच वेळा प्रदीर्घ चर्चा झाल्या. शासन युजीसी वेतनश्रेणी देण्यास तयार नव्हते, रु. ७००-१६०० च्या ऐवजी रु. ६८०-१५०० ही दुसरी नवीन वेतनश्रेणी त्यांनी देऊ केली. पण युजीसी वेतनश्रेणीचा आग्रह प्राध्यापकांनी सतत धरल्यामुळे आणि संपही शंभर टक्के चालू असल्यामुळे शासनास अखेरीस युजीसी वेतनश्रेण्या जशाच्या तशा मान्य कराव्या लागल्या. तसेच प्री-डिग्रीचा वर्ग नवीन शैक्षणिक आकृतीबंधात (१०+२+३) महाविद्यालयातून जाणार असल्यामुळे सुमारे १/३ प्राध्यापक म्हणजे १०-१२ हजार प्राध्यापक अतिरिक्त ठरणार होते. त्यांना पूर्ण संरक्षण दिले पाहिजे, हीही आणखी एक महत्वाची मागणी एमफक्टोने केली होती, तीही मागणी, "**नवीन आकृतीबंधामुळे प्राध्यापकांच्या ७.२.७५ रोजी स्पष्ट रिक्त पदावर असलेल्या संख्येत कपात**

---

काम करीत नाही, तर उच्च शिक्षण क्षेत्र अधिकाधिक निकोप होण्यासाठी शिक्षक चळवळीत भाग घेत असतो. इतर कोणत्याही संघटनेत काम करण्यापेक्षा 'सुटा', 'एम्फक्टो' व 'एआयफक्टो' या संघटना मालिकेत काम करणे अनेक अर्थाने अर्थपूर्ण व लाभदायक आहे. व्यक्तीगत विकासास खूपच वाव इथे मिळत असतो, यात शंका नाही. जवळ जवळ सर्व प्राध्यापकांनी त्याद्वारा आपली उन्नती करवून घेतल्यास ह्या संघटनांचीही उन्नती आपोआप होत राहील, हे निश्चित.

१८. 'सुटा' इतिहास - लेखन : **नोव्हेंबर २००५ मध्ये 'सुटा' स्थापन होऊन बरोबर तीस वर्षे पूर्ण होतील. या प्राध्यापक संघटनेच्या इतिहासाचे लेखन आता होणे आवश्यक आहे. पुरेसा कालावधी झालेला आहे. त्या काळातील सक्रिय प्राध्यापक येव्हाना सेवानिवृत्त होत आलेले आहेत. काळ जसजसा जाईल. तसतसा हा इतिहास अधिकाधिक पुसट होत जाईल. शिवाय, 'सुटा'ची कागदपत्रेही आता क्रमवार, विषयवार लावून झालेली आहेत. लेखन करण्यास दिर्घकाळ लागणार आहे. काळ व परिस्थिती अधिक प्रतिकुल होण्याअगोदर हे काम सुरु होणे आणि संपणेही आवश्यक आहे, निदान पहिला मसुदा तरी तयार होणे जरुरीचे वाटते. हे काम संभाजी जाधव यांना करावे लागणार आहे. असे दिसते. तेंव्हा, सप्टेंबर, २००५ पासून हे काम करण्यासाठी, त्यांना संघटनेच्या दैनंदिन कामातून मुक्त करावे लागेल. व्यक्तिगत प्रकरणे व समस्या, विद्यापीठ/ शासन पातळीवरील वरिष्ठांच्या भेटी/ बैठका / चर्चा, 'प्राध्यापक विश्व' सल्लामसलत, आणि सुटा संघटनेपर्यंतच्या बैठका / चर्चा या सर्वांतून त्यांना ह्या कामासाठी आता मुक्त होणे जरुरीचे आहे. संभाजी जाधव यांचे सध्याचे काम इतर सर्वांनी सांघिकपणे करण्याचे ठरविले पाहिजे, त्याची योग्य रीतीने विभागणी करून घेतली पाहिजे. म्हणजे कोठेही पोकळी जाणवणार नाही, कामही अडून पडणार नाही.**

*****

**होणार नाही,**" असे म्हणून शिक्षणमंत्र्यांनी मान्य केली. तसेच, प्राध्यापकांना सेवेत कायम करु नये असा एक अध्यादेश (ऑर्डीनन्स) नवीन शैक्षणिक आकृतीबंध येणार म्हणून शासनाने ३१ मे १९७३ मध्ये अगोदरच काढला होता, तो पूर्णतः मागे घ्यावा व विद्यापीठ नियमांप्रमाणे ह्या अध्यादेश कालावधीमध्ये (३१ मे, ७३ ते १२.२.७५ मध्ये) अन्यथा सेवेत कायम करावे, अशीही एक मागणी होती, ती शासनाने मान्य केली. शिवाय डेमॉस्ट्रेटर्स/ट्यूटर्स/मेथड मास्टर्स यांना प्राध्यापक (तशी आवश्यक अर्हता असल्यास) म्हणून पदोन्नती द्यावी आणि त्याबरोबरच ह्या चार प्रकारच्या शिक्षकांचे कामही समान मानावे (म्हणजे एकास एक प्रमाण) **अशी चौथी मागणी होती.** युजीसीच्या शिफारशींवर ही मागणी आधारलेली असल्यामुळे शासनास ती मान्य करावी लागली. **शेवटची पाचवी मागणी** होती, प्राध्यापकांना ट्रेजरीमधून नियमित व पूर्ण वेतन देण्याची व्यवस्था शासनाने करावी ही होय! तीही शासनाने मान्य केली. याप्रमाणे ह्या पाचही प्रमुख मागण्या एकमेकींशी सेवा व वेतन शाश्वती या एकच मुख्य मागणीशी निगडीत होत्या. कोणत्याही कामगार संघटनांना ह्या मुलभूत मागण्या प्रथम मांडाव्या लागतात, तशा त्या 'एमफक्टो'या प्राध्यापक महासंघाने परीक्षा बहिष्काराच्या माध्यमातून सरकार व जनतेपुढे प्रथमच मांडल्या आणि सुमारे दीड महिना हा बहिष्कार यशस्वी करून ह्या सर्व मागण्या शासनास मान्य करावयास लावल्या.

**६.** त्यावेळी अखेरीस शासन व एमफक्टो यांच्यात ह्या मान्य मागण्यांबाबत एक लेखी करार करावा, अशीही मागणी प्राध्यापक प्रतिनिधींनी शासनाकडे केली, तथापि, त्यावर **"मी महाराष्ट्र शासनाच्या वतीने शिक्षण मंत्री म्हणून आपणाबरोबर प्रदिर्घ चर्चा केली आहे आणि लवकरच त्यासंबंधीचे सविस्तर निवेदन मी महाराष्ट्र विधानसभेत करणार आहे,**" असे श्रीमती प्रभा राव म्हणाल्या. तसे निवेदन शिक्षणमंत्र्यांनी प्रथम दिनांक ४ एप्रिल, १९७५ नंतर लगेच दि. ५ एप्रिल, १९७५ रोजी असे दोन वेळा केले. पण **शासनाकडून लेखी करारास मान्यता न मिळाल्याने त्याचे बरेवाईट, बहुतांश वाईट परिणाम पुढे झाले.** लगेच नंतर देशात राजकीय आणीबाणी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी दि. २६ जून १९७५ रोजी पुकारली आणि त्यानंतर **महाराष्ट्र शासनाने युजीसीच्या नव्या वेतनश्रेणी व इतर मान्य मागण्यांबाबत जो आदेश दि. ४ ऑक्टोबर, १९७५ रोजी काढला त्यात अगोदर मान्य केलेल्या मागण्या मोठ्या प्रमाणात बदलून टाकल्या. स्वतः शिक्षणमंत्र्यांनी विधानसभेत अगोदर केलेल्या निवेदनाप्रमाणे सुद्धा आदेश** काढला नाही. **शासनाबरोबर लेखी करार करणे कसे आवश्यक असते याचा प्रत्यक्ष अनुभवच 'एमफक्टो' संघटनेस आला. त्यामुळे पुढील काळात असे अनेक करार करण्यास 'एमफक्टो'ने शासनास भाग पाडले आहे. त्यामागे हा विदारक अनुभव आहे. शासनातील मंत्री व त्यांचे सचिव हे किती प्रमाणात विश्वासास पात्र आहेत, हेच त्यातून स्पष्ट झाले.**

७. वरील मागण्याबाबत आदेश महाराष्ट्र शासनाने दि. ४ ऑक्टोबर, १९७५ रोजी राजकीय आणिबाणीच्या प्रारंभी काढला. त्यात प्राध्यापकांनी आपली नवीन श्रेणी स्वीकारल्याचा ऑप्शन दिनांक ३० नोव्हेंबर, १९७५ पर्यंत विहित नमुन्यात देणे आवश्यक आहे, असे नमूद केले होते. रयत शिक्षण संस्था (सातारा) व श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था (कोल्हापूर) या दोन मोठ्या संस्थांनी हा ऑप्शन फॉर्म्स भरून देण्याची घाई सुरु केली आणि तेथील प्राध्यापकांना नाईलाजाने तो भरून देणे भाग पडले. 'एमफक्टो' कार्यकारिणीने ह्या शासन आदेशाबाबत आंदोलन करण्याचे व तसेच मुंबई उच्च न्यायालयात **एक याचिकाही सादर करावी आणि त्यात शासनाने वचनभंग केल्याचेही नमूद करावे, असे ठरविले.**

**८. ह्या शासन आदेशात एम.फिल.पदवी सर्वच प्राध्यापकांना नवीन वेतनश्रेणी (रु. ७००-१६००) देताना आवश्यक केली होती, त्यावेळी केरळ सोडल्यास देशातील इतर कोणत्याही राज्यात ही पदवी दिली जात नव्हती.** नव्या प्राध्यापकांना ही पदवी घेण्यास पाच वर्षाची मुदत दिली होती. हे शासनाचे कृत्य पूर्णतः बेकायदेशीर होते. कोणत्याही नोकरीत अर्हता ही प्रथम नेमणुकीच्या वेळची असणे आवश्यक असते. (म्हणून तर आय.ए.एस. अधिकाऱ्यांना वेतनश्रेणी सुधारतांना आपल्या अर्हतेत भर घालावी लागत नाही), शिवाय, युजीसीने नवीन अर्हता, नवीन भरती होणाऱ्या प्राध्यापकांसाठी लावली होती आणि त्यांनी ती अर्हता पुढील पाच वर्षात प्राप्त करावयाची होती. पण ही अर्हता सर्वच नव्या व जुन्या प्राध्यापकांना आवश्यक आहे, असे ह्या शासन आदेशात नमूद केले होते. शासनाने राजकीय आणीबाणीचा दुरूपयोग उघडपणे ह्याबाबत केला, हे स्पष्ट आहे. शिवाय, **प्राध्यापकांचे आठवड्याचे काम वीस घड्याळी तास (म्हणजे २५ तासिका) इतके केले. मुळात हे काम १५ तासिका व ३ ट्युटोरियल्स/डेमॉ. असे होते.** तसेच तीन महिने उन्हाळी सुटी व एक महिना दिपावलीची सुटी होती. **त्या चार महिन्याऐवजी एकूण परीक्षांचे सर्व काम प्राध्यापकांना विनामुल्य करणे आहे. ही देखील आणखी एक अट घातली.** तसेच, प्राध्यापकांचे "कोड ऑफ कॉन्डक्ट", नवीन वेतनश्रेणीत रु. १३०० च्या वेळी सर्व प्राध्यापकांच्या कामाचे मूल्यमापन करणे इत्यादी बाबी त्या त्या विद्यापीठावर सोपविल्या होत्या. म्हणजे ह्या सर्व बाबीत एकसूत्रता आणण्याच्या नावाखाली शासनच प्रथम विद्यापीठाच्या कुलगुरु- कुलसचिव यांना आदेश काढणार व नंतर तेच विद्यापीठ आपल्या नियमांत आणणार हेही स्पष्ट होते. **प्रामुख्याने ह्या कारणांसाठी 'एमफक्टो' या प्राध्यापक महासंघाने ह्या दि. ४ ऑक्टोबर, १९७५ च्या शासन आदेशावर अनेक मार्गांनी बहिष्कार करून त्यास तीव्र विरोध केला.**

९. त्यावेळी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू टी.के.टोपे हे होते. त्यांच्या सूचनेवरून एमफक्टोचे अध्यक्ष डॉ.लिलाधर बी.केणी व प्रा.किशोर ठेकेदत्त यांना महाराष्ट्र शासनाने मिसाखाली अटक केली आणि येरवडा तुरूंगात त्यांना पंधरा महिने ठेवले. आणिबाणीच्या काळात ह्या 'एमफक्टो' प्राध्यापक संघटनेच्या नेत्यांना दि. १ नोव्हेंबर, १९७५ रोजी अटक केली. आणीबाणीचा हा उघड उघड दुरूपयोग होता. आणीबाणीच्या अखेरीस दिनांक २६ जानेवारी, १९७७ रोजी ह्या नेत्यांना तुरूंगातून सोडले, दुसऱ्या दिवशी हे दोघे व्ही.टी. ह्या रेल्वे स्टेशनवरून 'एमफक्टो'च्या ऑफिसमध्ये प्रत्यक्ष आले व दोघांनीही आपापली पदे स्विकारली, आणि प्रा. किशोर ठेकेदत्त हे सरळ विल्सन कॉलेजमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना वर्गात शिकवू लागले व डॉ. केणी यांनी आपल्या विद्यापीठातील ग्रंथालयात जाऊन संशोधनाची टिपणे काढण्यास प्रारंभ केला. **दोघेही पंधरा महिने तुरुंगात असूनही आपल्या व्यवसायातील कर्तव्यास यत्किंचितही विसरले नव्हते! तसेच एमफक्टोचे पदाधिकारी म्हणूनही त्यांना विसर पडला नव्हता.**

१०. डॉ. केणी व प्रा. ठेकेदत्त येरवडा येथे तुरुंगात असतांना पाठीमागे प्रा.व्ही.बी.कामत हे अध्यक्ष व प्रा.एकनाथ मांजरेकर हे जनरल सेक्रेटरी झाले होते, **त्यांना अटक झाली तर, पुढे कोणी कोणी एकानंतर एकाने अध्यक्ष व जनरल सेक्रेटरी व्हायचे यांच्या जोड्या प्रा. कामत यांनी एका कागदावर लिहून तो कागद आपल्या पत्नीजवळ दिला होता,** त्यांच्या पत्नी सांगतील त्या दोघांनी ही जबाबदारी पार पाडावयाची, ही नावे फक्त प्रा. कामत यांनाच माहित होती. संघटनेचे सर्व पैसै व दप्तर बाई येथे प्रा. राजर्षी यांनी आपल्या वयोवृद्ध मातोश्रींकडे ठेवले होते. अन्यथा, शासनाने कदाचित ते जप्तही केले असते. आदेश/निरोप/सूचना येताच 'एमफक्टो' कार्यकारिणी सदस्य मुंबईत प्रत्येक वेळी वेगवेगळ्या ठिकाणी जमत, बहुतेक वेळा शिवाजी पार्कला प्रा. कामत यांच्या घरी जमत असत, तेथे आंदोलनाचे ठराव होत आणि त्यांची अंमलबजावणी आपापल्या विद्यापीठ क्षेत्रात होत असे. **इतर सर्व संघटना शांत असताना एकटी 'एमफक्टो' प्राध्यापक संघटना मात्र आणीबाणीची परिस्थिती असूनही आंदोलनात्मक कार्यक्रम करीत आहे, याचे आश्चर्य अनेकांना वाटत होते.**

११. सन १९७५ मधील नोव्हेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात महाराष्ट्रातील सर्व प्राध्यापकांनी "आमच्या नेत्यांना ताबडतोब सोडा" असा बॅज लावून काम केले, दि. १७.११.७५ रोजी श्रीमती प्रभा राव यांना निवेदन दिले, दि. १७.११.७५ रोजी श्रीमती प्रभा राव यांना निवेदन देऊन 'एमफक्टो' ने शासन आदेशास तीव्र विरोध दर्शविला, **आमच्या नेत्यांना सोडा म्हणून सर्व प्राध्यापकांनी दि. २२.११.७५ रोजी राष्ट्रपतींना पत्रे पाठविली, त्याचवेळी "प्राध्यापकांना सेवामुक्त करु नका" म्हणून विद्यापीठांच्या कुलगुरूंना पत्रे दिली, विद्यापीठाच्या अधिकार मंडळाच्या बैठकींमधून तसे ठरावही मांडले, ते सर्वत्र मंजूर करूनही घेतले, फक्त पुणे शहरातील प्राचार्यांनी कोणाही प्राध्यापकास सेवामुक्त करणार नाही, असे आश्वासन दिले आणि ते त्यांनी पाळले देखील, हे विशेष होय.** दिनांक ९.२.१९७६ रोजी 'एमफक्टो' कार्यकारिणीच्या सर्व सदस्यांनी मुंबई येथे चोवीस तास उपोषणाचा कार्यक्रम डॉ. केणी व प्रा. ठेकेदत्त यांच्या सुटकेसाठी केला, त्याच वेळी येरवडा तुरुंगातही अटक झालेल्या एकूण वीस शिक्षकांनीही उपोषण केले, **विद्यापीठ परीक्षांवर पुन्हा बहिष्कार करण्याचा निर्णय दि. २५.२.१९७६ रोजी बुक्टू व एमफक्टोने संयुक्तपणे घेतला,** पण त्याच वेळी उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे महाराष्ट्र शासनाने ऑक्टोबर १९७५ व एप्रिल मे १९७६ पासून परीक्षांचा मेहनताना देण्याचा निर्णय घेतला, त्यामुळे परीक्षा बहिष्काराचा निर्णय स्थगित ठेवला. तसेच, नवीन शैक्षणिक आकृतीबंधा (१०+२+३) मुळे सुमारे १२-१३ हजार प्राध्यापकांना सेवामुक्त व्हावे लागले असते, ते सेवामुक्त तसे होऊ नये, म्हणून 'एमफक्टो'ने अगदी निकराचे प्रयत्न त्यावेळी केले. महाराष्ट्र शासनाने ह्या नवीन आकृतीबंधाच्या विशेष अभ्यासासाठी श्री.डी.एम. सुकथनकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली होती. त्या समितीस दि. ३०.३.७६ रोजी एक सविस्तर निवेदन एमफक्टोने दिले. त्याचवेळी अनेक पक्षांच्या आमदारांना व कुलपतींनाही ही प्राध्यापकांची सेवामुक्ती होऊ नये, म्हणून काही पर्यायी उपाययोजना सादर केल्या. ह्यासाठी दि. १२.६.७६, २१.६.७६ व १०.९.७६ रोजी शिक्षणमंत्र्याबरोबर 'एमफक्टो' ने सविस्तर व दीर्घकाळ चर्चा

केली. **ह्या सर्व प्रयत्नांचा परिणाम म्हणून राज्यात त्या निकराच्या प्रसंगी एकाही प्राध्यापकांची सेवामुक्ती झाली नाही. ही एक विशेष घटना होय! एकजुटीचा हा परिणाम होता.**

१२. याप्रमाणे एका बाजूला 'एमफक्टो' ने आपले आंदोलन सतत ह्या ना त्या स्वरुपात चालू ठेवले आणि त्याच वेळी दुसरीकडे मुंबई उच्च न्यायालयात दि. ४ ऑक्टोबर, १९७५ मधील शासन आदेशातील काही असमर्थनीय, अशैक्षणिक व अन्याय बाबी पूर्णतः रद्द व्हाव्यात म्हणून एक याचिकाही (रिटपिटीशन) दि. १०.११.१९७५ रोजी सादर केली. लगेच, **दि. १५.११.१९७५ रोजी उच्च न्यायालयाने दि. ४ ऑक्टोबर, १९७५ रोजीच्या शासन आदेशा (जी.आर.ला) च्या अंमलबजावणीस स्थगिती दिली. त्यावेळी प्रसिद्ध कामगार वकील के.टी.सुळे, ॲड. के.के. संघवी, ॲड. मदन फडणीस इत्यादींनी 'एमफक्टो' प्राध्यापक महासंघाची बाजू उच्च न्यायालयात समर्थपणे मांडली, राजकीय आणिबाणीच्या एकूण वातावरणात महाराष्ट्र शासनास प्रचंड धक्का देणारा हा स्थगितीचा निर्णय होता, यात शंका नाही,** सबंध प्राध्यापक वर्गाने तर एका मोठ्या संकटातून वाचलो म्हणून एक दीर्घ निःश्वास सोडला महाराष्ट्रातील तीस बत्तीस हजार प्राध्यापक मनाने एकमेकाजवळ आले. **आपण सांघिक प्रयत्न केले. आणि ह्या प्रयत्नांचे नेतृत्व करणारी प्राध्यापक मंडळी समर्थ असतील, तर संकटाचा महासागरही आपण ऐक्याच्या जोरावर पार करु शकतो, याचा प्रत्यक्ष अनुभवच राज्यातील सर्व प्राध्यापकांनी घेतला, सर्व शिक्षण संस्थामधील प्राध्यापकांना आत्मविश्वास वाटू लागला.**

**१३. ॲड. के.टी.सुळे यांनी महाराष्ट्रातील सर्व प्राध्यापक वर्गास उच्च न्यायालयाच्या माध्यमातून एकाहून एक श्रेष्ठ दर्जाच्या सवलती मिळवून दिल्या, त्या कामात त्यांचे भाचे ॲड. मदन फडणीस यांचेही सहकार्य अभूतपूर्व लाभले, ह्या दोघा ॲडव्होकेट असणाऱ्या मामा भाच्यांनी 'एमफक्टो'या प्राध्यापक संघाच्या निम्म्याहून जादा लढाया पूर्ण यशस्वी केल्या त्यावेळी राजकीय वातावरण आणिबाणीमुळे दहशतीचे होते.** उच्च न्यायालयाच्या न्यायधिशांवरही कधी कारवाई होईल, हे सांगता येत नव्हते. लाखोने लोकांच्या अटका होत होत्या, वृत्तपत्रांवर कमालीची नियंत्रणे होती. बातम्या/लेख शासनास दाखवून छापाव्या लागत होते. जवळ जवळ सर्व राजकीय विरोधक देशभरच्या तुरुंगात ठेवले होते. **अशा आणिबाणीने पूर्णतः ग्रासलेल्या प्रतिकुल वातावरणात ॲड सुळे व ॲड. फडणीस यांनी प्रथम दि. ४ ऑक्टोबर, १९७५ च्या शासन आदेशास स्थगिती मिळविली.** पुढे लगेच ऑक्टोबर, १९७५ व मार्च एप्रिल १९७६ च्या विद्यापीठ परीक्षांचा मेहनताना दि. ६.३.१९७६ रोजी उच्च न्यायालयातून मिळवून दिला. असा मेहनताना देण्याची शंभर वर्षाहून अधिक काळ चालत आलेली प्रथा, विद्यार्थ्यांकडून विद्यापीठांनी अगोदरच घेतलेली परीक्षा फी आणि सर्व प्राध्यापकांना परीक्षेच्या कामाचे समान वाटप करण्यातील व्यवहार्य अडीअडचणी इत्यादी मुद्यांच्या आधारे प्राध्यापकांना कायमचा मिळवून दिलेला विद्यापीठ परीक्षांच्या कामांचा मोबदला आणि त्याहूनही असे परीक्षा काम प्राध्यापकांना सक्तीचे करता येत नाही असा न्यायालयाचा निर्णय ही फार महत्वाची बाब ठरलेली आहे. **नंतरच्या एका तारखेस ॲड. सुळे साहेबांनी दि. १ जानेवारी १९७३ पासून मिळणाऱ्या रु. ७००-१६०० या नव्या वेतनश्रेणी पोटी रु. ७५० आगाऊ (ॲडव्हान्स) वाढ सर्व प्राध्यापकांना मिळवून दिली. (त्यावेळी रु. ७५० ही रक्कम प्राध्यापकांच्या दीड ते दोन महिन्यांचे वेतनाइतकी होती)**

१४. ॲड. के.टी. सुळे हे आपल्या व्यवसायात ज्येष्ठ ॲडव्होकेट्सपैकी एक होते. त्यांच्या व्यक्तिमत्वाचा आणि त्यांच्या केस मांडण्याच्या पद्धतीचा न्यायाधिशांवर आपोआपच गंभीर परिणाम होत असे. एका रविवारी देखील न्यायाधिशांनी ॲड. सुळेसाहेबांचे ह्या केस संदर्भातील म्हणणे ऐकण्यासाठी तारिख दिली आणि म्हणणे ऐकून घेतल्यावर निर्णयही दिला होता. तो निकाल म्हणजेच परीक्षेचा मेहनताना देण्यासंबंधीचा होय. वकिलांच्या व्यक्तिमत्वाचा न्यायाधिशांवर इतका परिणाम झाल्याची उदाहरणे अगदी दुर्मिळच होत. **अखेरीस एकदा न्यायाधिशांनी महाराष्ट्र शासनाचे त्यावेळचे शिक्षण सचिव श्री. डी.एम. सुकथनकर यांना स्पष्टपणे सांगितले. ॲड.सुळे यांनी प्राध्यापकांसाठी जे जे मांडले आहे, ते ते सर्व युजीसीच्या म्हणण्यानुसारच मांडलेले आहे. युजीसीच्या मार्गदर्शक तत्वाबाहेर जाऊन काहीही सांगितलेले नाही.** महाराष्ट्र शासनास २० टक्के रक्कम प्राध्यापकांच्या नव्या वेतनापोटी द्यावी लागत आहे. म्हणून महाराष्ट्र शासनास यूजीसी बाहेरील अटी नव्याने घालता येणार नाहीत, युजीसीचा जन्मच मुळी प्राध्यापकांच्या सेवाशर्ती व इतर बाबी संबंध देशभर समान करण्यासाठी झालेला आहे. भारतीय लोकसभेने तसा कायदा सन १९५६ मध्ये केलेला आहे. तो शासनाने प्रथम अभ्यासावा. सद्यपरिस्थित म्हणजे आणिबाणीच्या काळात शासनाने 'एमफक्टो'या प्राध्यापक महासंघाबरोबर तातडीने चर्चा करावी आणि तडजोड घडवून आणावी, अन्यथा ह्या याचिकेचा निकाल आजच लागल्यासारखा आहे, असे स्पष्टपणे महाराष्ट्र शासनास सुनावले. **त्यामुळे शासनास आपण केलेल्या गंभीर चुका ध्यानात आल्या आणि म्हणून शासनाने**

*सहपत्र : ४*

# FORMATION OF THE MFUCTO

**By Prof. CR. Sadasivan, President, MFUCTO**

(Extract from the article written by Prof. C.R. Sadashivan then president of MFUCTO. )

### TOWARDS TEACHERS' UNITED STRUGGLE

"In October 1974, Prof.B.T.Deshmukh had called a meeting of teachers from different units which was held at the residence of Prof. Phansalkar. From the BUCTU, Prof. Theckedath and the Late Prof. Sudhir Yardi attended the meeting. It was this meeting which led the foundation for unity of all teachers in the State because in that meeting it was decided to have some kind of coordination among the university and College teachers. **In the face of severe attacks on the teaching community from various quarters, from January 1975 onwards. One by one the University and College Teachers' Organizations declared Boycott of University Examinations and by March 1975, the University and College teachers were on their agitational** course with the State Government. The boycott was so successful that examination work came to a grinding halt in the Universities through out the State. The unity and solidarity of the teaching community in the entire State came to be witnessed. In March 1975 Smt. Prabha rao the then Education Minister, Finally had to invite the organizations for discussion. **However, even at this stage what was done by the Government was to call the different Organizations for discussion on different dates. A Two day Seminar was arranged in the last week of March 1975 and a Steering Committee was formed which met on 1st April 1975 under the Chairmanship of Prof. V.B.Kamath, one of our veteran leaders. At this meeting a decision was taken not go to the Minister for any discussion separately.** A demand was made that all the organizations should be called by the Minister for discussion on the same date and at the same time.

### THE BIRTH OF MFUCTO

On 2nd April 1975, the Maharashtra State Federation of University & College Teachers Organizations (MFUCTO) was formed. Later on the word 'State' was dropped and it became MFUCTO. In the meantime, Unilateral announcement was made by the Minister that everything was agreed and that the teachers should withdraw the boycott. In order that this play of the Minister did not lead to a confusion among the teachers, Prof. Theckedath, after holding consultations with the leadership declared that the strike would continue till an agreement was reached. It was this that finally led to reaching an understanding by the end of April 1975"

**दि. ६.९.१९७६ रोजी 'एमफक्टो'बरोबर बोलणी करण्याचे मान्य केले आणि याचिकेचे कामकाज स्थगित ठेवले गेले,** 'एमफक्टो' या प्राध्यापक संघटनेने मिळविलेले हे एक अपूर्व यश होते, ह्यात शंकाच नाही. **ॲड सुळे आणि ॲड मदन फडणीस यांची ह्या कामातील कामगिरी केवळ शब्दातीत अशीच मानावी लागते, दोघांनीही आपले काम विना मोबदला केले, हे तर आणखी शब्दांतीत आहे, ह्यात कसलीच शंका नाही! महाराष्ट्रातील प्राध्यापकांवरील ह्या दोघांचे ऋण कधी फिटणार देखील नाही, अशा कायम स्वरूपाचे ते आहे.** नंतर १.१.१९८६ व १.१.१९९६ पासून इतकेच काय पण इथून पुढे सुद्धा येणाऱ्या नवीन वेतनश्रेणींमधील वाढींचा एक कायमचा व्यापक पायाच ॲड.सुळे व ॲड.फडणीस यांनी प्राध्यापक वर्गासाठी घातलेला आहे. ह्या दोघांचे सहकार्य एमफक्टो या प्राध्यापक संघटनेस लाभले नसते, तर महाराष्ट्रातील प्राध्यापकांची कायमस्वरुपी काय काय हानी झाली असती, ह्याची केवळ कल्पनाच करावी लागेल.

**१५.** पुढे नोव्हेंबर-डिसेंबर १९७६ मध्ये वाटू लागले, की लवकरच आणीबाणी संपुष्टात येणार असे वातावरण संबंध देशभर निर्माण झाले. त्या सुमारास शिक्षणमंत्र्यांबरोबर 'एमफक्टो' ची बोलणी सुरु झाली. शासनाने एक प्रस्ताव उच्च न्यायालयातील याचिकेसंदर्भात 'एमफक्टो'स दिला, पण तो 'एमफक्टो'ने अमान्य केला. पुन्हा मोर्चे काढण्यास शासनाने प्राध्यापकांना भाग पाडले दि., ७.३.१९७७ रोजी एमफक्टोने एक हजार प्राध्यापकांचा एक मोर्चा मंत्रालयावर काढला आणि ५३०० शिक्षकांच्या सह्यांचे निवेदन मंत्र्यांना सादर केले. दि. २३.३.१९७७ रोजी राजकीय आणीबाणी उठविण्यात आली. **लगेच 'एमफक्टो' ने नव्याने विद्यापीठ परीक्षांवर बहिष्कार घालण्याचा निर्णय दि. ४.४.१९७७ रोजी घेतला, त्याची सबंध राज्यात दि. १५.४.१९७७ पासून अंमलबजावणी करण्याचेही जाहीर केले.**

**१६.** मधल्या काळात श्री. शंकरराव चव्हाण यांचे मंत्रिमंडळ संपुष्टात येऊन त्यांच्या जागी श्री. वसंतराव दादा पाटील महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. त्याच दिवशी चर्चगेट येथील "रित्झ हॉटेल"मध्ये 'एमफक्टो'ने आपल्या मागण्यांचे व परीक्षा बहिष्कार घालण्याच्या निर्णयाचे सविस्तर निवेदन श्री. दादा यांना दिले. तिथेच त्यांनी एमफक्टो प्राध्यापक संघटनेस तीन दिवसानंतरचे म्हणजे दि. २३.४.१९७७ रोजी चर्चेस येण्याचे निमंत्रण दिले, त्या दिवशी मंत्रालयात दीर्घ चर्चा झाली. त्या चर्चेस शिक्षणमंत्री, सचिव व अर्थमंत्री त्यांचे सचिव हजर ठेवावेत, असे मूळ निवेदनातच एमफक्टोने घातले होते पण मंत्र्यांचे खातेवाटपही तोपर्यंत झालेले नव्हते, तरी श्री. दादांनी श्री. यशवंतराव मोहिते व श्रीमती प्रतिभा पाटील यांना ह्या चर्चेस बोलाविले आणि बैठकीच्या प्रारंभी त्यांनी ह्या दोन मंत्र्यांना एमफक्टो प्रतिनिधी देखतच त्यांची अर्थ व शिक्षण खाती आहेत असे जाहिरपणे सांगितले. चर्चेनंतर 'एमफक्टो' प्रतिनिधींनी लेखी करार करण्याची सूचना केली. ती श्री. दादांना आवडली आणि तसे आदेश शिक्षण सचिव श्री.डी.एम.सुकथनकर यांना दिले. त्यामुळे जी एकूण तीन मतैक्य (सहमती) पत्रके महाराष्ट्र शासन व एमफक्टो यांच्यामध्ये तयार झाली. त्यातील पहिले पत्रक दि. २३.४.१९७७ रोजी तयार झाले आणि विद्यापीठ परीक्षा बहिष्कार दि. २४.४.७७ पासून मागे घेतला. पुढील बैठक मुख्यमंत्री, सर्व कुलगुरू व एमफक्टो प्रतिनिधी यांची दि. ४ जून १९७७ रोजी मंत्रालयात झाली. दुसरे मतैक्य पत्रक दि. १५ जुलै, १९७७ व तिसरे पत्रक दि. २२ ऑगस्ट, १९७७ रोजी तयार झाले. ह्या सर्व पत्रकांवर एमफक्टोच्या वतीने डॉ. केणी, प्रा.ठेकेदत्त व प्रा. कामत यांनी पदाधिकारी म्हणून आणि शासनाच्या वतीने श्री.डी.एम.सुकथनकर, शिक्षण सचिव यांनी सह्या केल्या. 'एमफक्टो' संघटनेच्या वतीने सर्व चर्चेसाठी तिचे कार्यकारिणी सदस्य सतत हजर होते.

**१७.** याप्रमाणे दि. २३ एप्रिल १९७७ ते २२ ऑगस्ट, १९७७ या चार महिन्यांच्या कालावधीत ज्या असंख्य घडामोडी झाल्या त्यामुळे एमफक्टो संघटनेचा पाया भक्कम होत गेला. ह्या काळात जी तीन मतैक्य (सहमती) पत्रके तयार झाली, त्यात अनेक गोष्टी निश्चित स्वरुपात ठरल्या. **एम.फिल ही पदवी फक्त नवीन भरती प्राध्यापकांना लागू राहील, ती अस्तित्वात असणाऱ्या प्राध्यापकांना लागू राहणार नाही,** प्राध्यापकांचा आठवडी कार्यभार १३ घड्याळी तासांचा म्हणजे १७ तासिकांचा (पूर्ववत ४५ मिनिटांचा एक तासिका) असा राहील, त्यात बदल केला जाणार नाही, प्राध्यापकांना विद्यापीठ परीक्षांच्या कामाचा मोबदला मिळत राहील, म्हणजेच हे काम सक्तीचे राहणार नाही, प्राध्यापकांना दिपावली सुटी ३० दिवसांची आणि उन्हाळी सुटी मात्र ९० दिवसांऐवजी युजीसीने सुचविल्याप्रमाणे ६० दिवसांची असेल, वर्गात विद्यार्थी संख्या प्रथम १०० इतकी मुंबई विद्यापीठाबाबत असेल इतर विद्यापीठात ती प्रथम ८० व नंतर ६० इतकीच असेल (आता मधल्या काळात ही संख्या हळूहळू एकतर्फी शासनाने १२० इतकी केली आहे, ती एमफक्टोस अमान्य असून, तिच्या संबंधी पुन्हा आंदोलनात्मक निर्णय घेणे आवश्यक झाले आहे,) तसेच प्राध्यापकांच्या सेवामुक्तीचा विचार करुन निर्णय देण्यासाठी न्यायाधिकरणे (वेगळी कोर्टस) स्थापन केली जातील आणि **प्राध्यापकांचे वेतन नियमित व पूर्ण अदा करण्यासाठी एक शासन स्तरावर समिती नेमली जाईल आणि त्यात एमफक्टोचे प्रतिनिधी घेतले जातील, प्राध्यापकांचा प्रोबेशन कालावधी २४ महिन्यांचा असेल. इतक्या सर्व एमफक्टो या प्राध्यापक संघटनेच्या मागण्या तीन मतैक्य पत्रकांद्वारे शासनाने मान्य केल्या आणि ही तीन पत्रकेच पुढे उच्च न्यायालयात सादर करून एमफक्टोने जी याचिका (क्र. २६३०/ १९७६) दाखल केली होती.** तिचा रितसर निर्णय म्हणून न्यायालयाने ती मान्य केली. (एमफक्टोने पहिली याचिका दि. १५.११.१९७५ रोजी सादर केली होती, ती तांत्रिक कारणास्तव मागे घेऊन तिच्या जागीच दुसरी याचिका दि. २४.४.१९९६ रोजी सादर केली होती)

**१८. प्राध्यापकांना वेतन नियमित व पूर्ण मिळण्यासाठी महाराष्ट्र शासनाने एक समिती नेमली आणि त्यात एमफक्टो तर्फे प्रा. सौ नलिनी तारळेकर (धुळे) प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती) प्रा. संभाजी जाधव (कोल्हापूर) व प्रा. वसंत पुंजारी (औरंगाबाद) तसेच श्री. शंकरराव काळे (रयत शिक्षण संस्था) , प्राचार्य पी.बी.पाटील (सांगली) इत्यादी सदस्य होते आणि उच्च शिक्षण संचालक श्री. स. द.वाळ हे अध्यक्ष होते.** ह्या समितीने तीन चार बैठका घेऊन आपला अहवाल शासनास सादर केला. तो जशाच्या तसा मान्य करुन त्यातील शिफारशींप्रमाणे शासनाने आपला आदेश २१ सप्टेंबर, १९७७ रोजी प्रसृत केला आणि त्याप्रमाणे महाराष्ट्रातील सर्व प्राध्यापकांना नियमित प्रत्येक महिन्याच्या एक तारखेस व पूर्ण वेतन बँक खात्यावर जमा होऊन मिळू लागले. त्याला पूरक म्हणून शासनाने पुढे लगेच दि. ३ ऑक्टोबर, १९७९ मध्ये आणखी एक आदेश काढून आपल्याकडेच कमी पडणाऱ्या सर्व वेतनाची जबाबदारी घेतली. त्यावेळी सर्व विद्यार्थ्यांकडून येणारी फी ही सर्व प्राध्यापकांच्या वेतनापेक्षा अधिक होती.

**१९. बँकेमार्फत प्राध्यापकांना वेतन व न्यायाधिकणामुळे सेवा या दोन मुलभूत बाबींना शाश्वती प्रथम आली,** प्राध्यापकांची वेतनश्रेणी रु. ७००-१६०० अशी ही एकच झाली, प्राध्यापकांना दि. १ जानेवारी, १९७३ पासून लागू झालेल्या नवीन वेतनातील फरक रक्कम एकरकमी सन १९७८ मध्ये मिळाली, जरी शैक्षणिक नवीन आकृतीबंध आला तरी प्राध्यापकांच्या संख्येत कपात होऊ दिली नाही, काही प्राध्यापकांना काही काळ कनिष्ठ महाविद्यालयात काम करावे लागले, पण कोणाही प्राध्यापकाचे वेतन कमी झाले नाही. एकाच वेळी नवीन वेतनश्रेणी व नवीन शैक्षणिक आकृतीबंध झाल्यामुळे सन १९७५ च्या प्रारंभीच काही मूलभूत प्रश्न सर्वच प्राध्यापकांपुढे निर्माण झाले. एकत्र येण्याशिवाय अन्य मार्गही नव्हता. एमफक्टो प्राध्यापक संघटना यातून जन्म पावली आणि पुढे लवकरच राजकीय आणिबाणीची बिकट परिस्थिती निर्माण झाली. **संकटासह संकटे व संकटानंतर संकटे एकाच वेळी येऊनही एमफक्टो प्राध्यापकांचे बळकट ऐक्य, त्यांच्या नेतृत्वावरील दृढ विश्वास, संघटनेचे अभ्यासपूर्ण व प्रगल्भ नेतृत्व, ॲड. के.टी.सुळे व ॲड. मदन फडणीस ह्यांचे अमूल्य साह्य आणि तसेच तत्कालीन मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील व शिक्षण सचिव श्री.डी.एम.सुकथनकर यांची व्यापक दृष्टी आणि तशीच सर्वांभूती दुर्मिळ सहानुभूती या सर्व बाबी प्रसंगोत्पात एकत्रित आल्यामुळे महाराष्ट्रातील समस्त प्राध्यापक वर्ग सर्व संकटातून सहीसलामत बाहेर पडला, त्यास एमफक्टो सारखी एक प्रगल्भ संघटना उभी करता आली. खरोखरच हे एक दुर्मिळ व दुर्लभ असे दृश्य आहे!**

**२०.** सन १९७७-७८ मध्ये एमफक्टोने एक घटना समिती स्थापन केली. त्यात प्रा. सौ. नलिनी तारळेकर, प्रा.एन.डी शिरोळकर, प्रा.एकनाथ मांजरेकर, प्रा. संभाजी जाधव, प्रा.दिपा महानवर इत्यादींनी सतत काम करुन एक घटना तयार केली. त्याप्रमाणे निवडणूका होऊन डॉ. लिलाधर बी. केणी हे अध्यक्ष, प्रा.किशोर ठेकेदत्त हे प्रमुख कार्यवाह आणि प्रा. व्ही.बी. कामत हे रीतसर खजिनदार झाले. महाराष्ट्र स्तरावरील एक नवीन कार्यकारिणी अस्तित्वात आली. सन १९८० मध्ये प्रा. संभाजी जाधव (कोल्हापूर) हे डॉ. केणी यांच्यानंतर अध्यक्ष व डॉ. दिपा महानवर (नगर) हे प्रमुख कार्यवाह झाले. **तेव्हापासून ही एमफक्टोची लोकशाही निवड प्रक्रिया प्रत्येक दोन वर्षांनी बदलत पण सतत एकसारखी चालू आहे, त्यात कधीही खंड पडलेला नाही, हेही एक विशेषच आहे.**

२१. एकदा सेवा व वेतन शाश्वतीची समस्या मिटल्यावर एमफक्टोने सन १९८१ ते १९८५ पर्यंत इतर तितक्याच महत्वाच्या मागण्यांसाठी सतत संघर्ष, आंदोलन कार्यक्रम, शासनाबरोबर वारंवार अभ्यासपूर्ण चर्चा आणि एकामागून एका प्रश्नाची व मागण्याची सोडवणूक करून घेतली. या नवीन मागण्यापैकी अति महत्वाची मागणी होती, ती सेवानिवृत्ती लाभांची, पेन्शन, ग्रॅच्युइटी व कम्युटेशन यांची होय. शासनाने प्रथम दि. १ ऑक्टोबर, १९८२

नंतर निवृत्त झालेल्या प्राध्यापकांना निवृत्ती वेतनाचे सर्व लाभ देणारा आदेश दि. २१ जुलै १९८३ रोजी प्रसृत केला आणि महाराष्ट्र शासनाची पेन्शन योजना जशीच्या तशी खाजगी शिक्षण संस्थामधील प्राध्यापकांना लागू केली. ह्या मागणीची चर्चा करतांना त्या वेळचे शिक्षण सचिव श्री.के.जी.परांजपे यांना एमफक्टोने आकडेवारीनिशी पटवून दिले की, प्राध्यापकांचे वेतन आता रु. ७००-१६०० इतके झाल्यामुळे प्राध्यापकांना पेन्शन देण्यासाठी शासनावर आर्थिक बोजा काहीही पडणार नाही. प्राध्यापकांचे वेतन आता आय.ए.एस. ऑफिसरच्या वेतनासमान झाल्यामुळे भविष्य निर्वाह निधीची रक्कम (त्यातील सार्वजनिक हिस्सा) आता कितीतरी पटींनी वाढलेली आहे, त्यामुळे प्राध्यापकांना पेन्शन योजना लागू केली तर प्राध्यापक व शासन अशा दोघांचाही फायदा होणार आहे. पुढे काही काळाने दि. १ ऑक्टोबर, १९८२ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या प्राध्यापकांनाही ही पेन्शन योजना शासनाने लागू करावी, असे प्रयत्न एमफक्टोने केले व त्यातही पूर्ण यश आले.

२२. त्याच सुमारास एमफक्टोने शिक्षण मंत्री व सचिव यांच्याशी सतत चर्चा करुन रजा प्रवास योजना सवलत (एलटीसी) व वैद्यकीय खर्चाची परिपूर्ती सवलत योजना अनुक्रमे दि. ३० नोव्हेंबर, १९८२ व दि. ४ जून १९८५ पासुन लागू करून घेतली. पेन्शन, एल.टी.सी. बोनस व मेडिकल रिइम्बर्समेन्ट प्राध्यापकांना लागू करून घेताना प्रा.बी.टी.देशमुख हे आमदार झालेले होते. त्यांनी विधान परिषदेत सतत प्रश्न उपस्थित करुन या योजनांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीस अपूर्व स्वरुपाची गती दिली. शासनाने चर्चेअंती एमफक्टो बरोबर करार करताच आमदार देशमुख ह्या करारांच्या अंमलबजावणीसाठी सातत्त्याने तड लागेपर्यंत पाठपुरावा करीत, त्यासाठी ते आपल्याठायी असणाऱ्या सर्व कौशल्यांचा यथायोग्य उपयोग करीत. ते सतत म्हणतात, “प्रश्न समस्या व मागण्या आंदोलनांद्वारेच मान्य होतात आणि त्यांची तातडीने अंमलबजावणी विधान परिषदेद्वारेच होत असते.” तेव्हा **एमफक्टो या प्राध्यापक संघटनेचा सततचा आंदोलनात्मक कार्यक्रम आणि शासनाबरोबर चर्चा व त्यानंतर आमदार प्रा.बी.टी.देशमुखांचे विधान परिषदेतील शब्दयुद्ध यांचा सुरेख मेळ गेली पंचवीस वर्षे वारंवार होत गेल्याने प्राध्यापकांचे अनेक मूलभूत प्रश्न एकामागून एक सुटत गेले आहेत आजही ते सुटत आहेत, आणि पुढेही ते तसेच सुटणार आहेत.**

२३. महाराष्ट्र शासनाबरोबर एमफक्टोच्या ज्या चर्चा होतात त्याचा फायदा दोघांसही होतो. शासनाला, त्यातील मंत्र्यांना, सचिवांना व इतर शासन अधिकाऱ्यांना प्राध्यापकांचे प्रश्न तर कळतातच पण अशा चर्चेमुळे शासनास उच्च शिक्षणातील प्रश्न व समस्याही नेमक्या काय आहेत, त्यावर कोणता उपाय काय आहे व तो कसा करावा, हे नेमके कळते. नाहीतरी प्राध्यापकांचे प्रश्न हे अखेरीस उच्च शिक्षणाचेही प्रश्न आहेतच! एमफक्टोचा यात फायदा म्हणजे शासनाकडून अनेक सवलती मिळवता येतात, त्यामध्येच एखादा नवा शासन अधिकारी अशा सवलतींना विकृत रुप देतो, अंमलबजावणी करीत नाही, अथवा ती केली तरी अर्धवट करतो, हे सर्व पुन्हा दुरुस्त करता येते, शिवाय, एमफक्टो प्रतिनिधींना शासन चर्चेवेळी पूर्ण तयारीनिशी जावे लागते, सबंध महाराष्ट्रातील एका स्तरावरील एखाद्या प्रश्नाची पूर्ण व अद्यावत माहिती एमफक्टोच्या एका बैठकीत अधिकृतपणे मिळते, त्याच प्रश्नांची शासनाकडील माहिती अपुरी व जुनी असते, शिवाय केंद्र शासन, युजीसी व त्यासारख्या राष्ट्रीय पातळीवरील मध्यवर्ती संस्था, तसेच जागतिक पातळीवरील अनेक संस्था, विद्यापीठे यांच्यामधून निर्माण होणारे नवनवीन लिटरेचर्स (माहिती, धोरणे, अहवाल, अभ्यास, नियम इत्यादी) शिक्षण क्षेत्रातील एकूण प्रश्न व समस्या, इतकेच काय पण अगदी महाराष्ट्र शासनाचे जुने आदेश देखील एमफक्टो प्रतिनिधींना उपलब्ध करून, ते सर्व बारकाईने वाचून, त्यावर आपापसात चर्चा करुन, धोरणे ठरवून, शिवाय, **कोणी कोणते मुद्दे मांडावयाचे हे देखील अगोदर बैठकीत ठरवून शासनाबरोबर चर्चा करावी लागते व अखेरीस करारही करावे लागतात. त्यामुळे असे संघटना प्रतिनिधी अभ्यासू, प्रगल्भ जाणिवेचे असावे लागतात, तसेच एखादा मुद्दा एकंदर राष्ट्रीय अथवा जागतिक पातळीवरून मांडावा लागत असल्यामुळे त्यांना खूप वाचन, अभ्यास व तयारी करावी लागते. करारांचे प्रारूप (ड्रॉफ्टस) तयार करण्याची सवय व सराव असणारे हे प्रतिनिधी असतात, असे हे प्रतिनिधी प्राध्यापक संघटनेचा एक अमूल्य ठेवा ठरतात, यात शंकाच नाही. ते तसे एमफक्टोच्या प्रारंभापासून आजपर्यंत सतत लाभले, हे ह्या संघटनेच्या भाग्याचे लक्षण आहे!**

**२४. आज एमफक्टो ही प्राध्यापक संघटना अनन्य साधारण अशी आहे, ती एकमेव आहे, तिला स्पर्धक निर्माण करण्याचे प्रयत्न झाले, पण एकही प्रयत्न यशस्वी झाला नाही, तिचे धोरण व कामकाज पक्षातीत आहे, सर्व राजकीय पक्षांच्या धोरणाचे, इतकेच काय पण प्रत्यक्ष राजकारणात दैनंदिन काम करणारे प्राध्यापक कार्यकर्ते ह्या एकाच संघटनेत गेली तीस वर्षे काम करीत आहेत,** त्यांच्याबरोबरच कोणत्याही राजकीय पक्षांचे सभासद वा कार्यकर्ते नसलेलेही प्राध्यापक ह्याच संघटनेत पदाधिकारी व सदस्य झालेले आहेत. लोकशाही पद्धतीने सर्व कारभार होत असल्यामुळे ह्या प्राध्यापक महासंघात पुरेशी पारदर्शकता आहे. सर्वांना मोकळेपणाने आपली भूमिका व विचार स्पष्टपणे मांडता येतात. त्यामुळे एक दोन प्रसंग सोडता कधी बैठकीत मतदान घेण्याचा प्रसंग आला नाही, ज्याला गटबाजी म्हणतात ती कधीही जन्मालाच आली नाही, निवडणूका प्रत्येक दोन वर्षांनी होतात, पदाधिकारी चार वर्षानंतर बदलतात, सर्व दहा अकृषि विद्यापीठांतून कार्यकारिणीचे सदस्य निवडून येतात, प्रत्येक खेपेस काही नवीन सदस्य निवडले जातात, एमफक्टो संघटना शासनाकडे कामगार कायद्या (द ट्रेड युनियन ॲक्ट, १९२६) प्रमाणे रितसर नोंदविलेली आहे. प्रत्येक वर्षी अहवाल व जमाखर्च तसेच अंदाजपत्रक जनरल कौन्सीलपुढे विचारार्थ आणि मंजूरीसाठी नियमांप्रमाणे ठेवले जाते, त्याचे अहवाल शासन अधिकाऱ्यांना विहित नमुन्यांत नियमितपणे सादर केले जातात. त्यामुळे सर्वसाधारण सदस्यांचा (सुमारे ४५ हजार) एमफक्टोवर सर्व बाबतीत पूर्ण विश्वास आहे. खऱ्या अर्थाने ज्याला फॉलोईंग आहे अशी ही संघटना आहे, महाराष्ट्र शासनाला, संस्थाचालकांना, समाजाला याची जाण आहे. सर्व कामाची उत्तम घडी गेल्या तीस वर्षात बसलेली आहे. ही संघटना प्रथमपासूनच अखिल भारतीय प्राध्यापक महासंघास (एआयफक्टो) संलग्न झालेली आहे. एमफक्टोचे डॉ. किशोर ठेकेदत्त, प्रा. संभाजी जाधव, प्राचार्य डॉ. क्रांती जेजुरकर, प्रा.सी.आर.सदासिवन, डॉ.अरूण दिक्षित, प्रा.एस.जी.पाटील हे वरील दोन्ही राष्ट्रीय व जागतीक महासंघाचे पदाधिकारी व प्रतिनिधी झालेले आहेत, त्यातील काही आजही आहेत.

२५. ‘एमफक्टो’ संघटनेची कार्यपद्धत तटस्थ व वस्तुनिष्ठ स्वरुपाची राहिलेली आहे. आजपर्यंतच्या तिच्या मागण्या युजीसीच्या धोरणामध्ये, मार्गदर्शक तत्वांमध्ये व शिफारशींमध्ये बसणाऱ्या आहेत. फक्त गुणावगुणांवरूनच (मेरिटस्) सर्व बाबींचा विचार होत आला आहे. त्यात व्यक्तिगत हितसंबंध, राग, लोभ, इत्यादी संकुचित बाबी कोणीही मांडल्या नाहीत, त्यामुळे तीव्र मतभेदास मुळी कधी वावच मिळालेला नाही. प्रारंभीच्या सन १९७५ ते १९८५ या दशकात डॉ.लिलाधर बी. केणी, प्रा.व्ही.बी.कामत, प्रा.डॉ.किशोर ठेकेदत्त, प्रा.एकनाथ मांजरेकर, प्रा.बी.टी.देशमुख, प्रा.संभाजी जाधव इत्यादींनी आपल्या कामाच्या पद्धतीद्वारे ‘एमफक्टो’चा घातलेला पाया भक्कम झालेला आहे. त्या **ह्या संघटनेची पुढे झालेली वाढ व विकास निकोप, निरोगी, नैसर्गिक व स्वाभाविक स्वरुपाची झालेली आहे. काही पथ्ये जाणीवपूर्वक पाळल्यामुळे आज एमफक्टो ही राज्यव्यापी प्राध्यापक संघटना आदर्शवत बनलेली आहे. असे दिसून येते.**

*****

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Dr.A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. Dhote D.S., 4C, 'Rajdatta', Mahalaxmi Colony, Near Shankar Nagar, Amravati-444 606. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/ 2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/78/ 2009-11 WPP Registration No. NR/ATI/WPP-01/ 2009-11 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting :**10.08.2011**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

---------------------------------------------------

To,.........................................................................

...............................................................................

...............................................................................

...............................................................................

...............................................................................